0153

कांचनगडची मोहना.

अंक पहिला.

प्रवेश १ ला.

स्थळः—कांचनगडावरील बाग.

(मोहना व यमुना हार गुंफीत गुंफीत येतात.)

मोहना—गडे यमुने, तुझ्याप्रमाणें माझेंही लग्न मोऱ्यांच्याच वाड्यांत झालें.—तुझ्या ध्यानांत ही गोष्ट आली नसेल; पण मी लहानपणापासून पाहतें आहे, जसें जसें आपलें माझें होत जातें तसेंच हुबेहूब तुझेंही होतें.—मला त्या वाड्याचा लहानपणापासून तिटकारा होता, तुला तो वाडा आवडतो कां?

यमुना—मला देखील त्या वाड्याचें भयच वाटतें. माझ्या मनानें खास घेतलें आहे, कीं त्या वाड्याचा माझ्या लग्नाला अपशकूनच झाला. आज लग्न होऊन तीन वर्षें होऊन गेलीं, सुख म्हणून कसें तें मला माहीत नाहीं.—मोहने, पांच वर्षें झालीं नाहींत तुझीन् माझी गांठ पडून?

मो०—शहांजी झाला त्या वेळीं काय ती तुझी माझी गांठ. आज पांच वर्षें मी कांहीं विजापूर पाहिलें देखील नाहीं. मग गांठ ग कशानें पडणार?

झाला, हंबीरराव (दचकल्या सारिखें करून) हंबीरराव–तुला दिसत ना-हींत,–ते पहा लांब, आपल्या कडेच येत आहेत.

य०—(पाहून) होय गडे, होय! मला जलदी हार गुंफूं दे.–स्वारी येईतों हाराला कांहीं रूप तरी आलें पाहिजे.

मो०—(स्वगत) हिरव्या महालांत मला एकटीला गांठलें त्या दिवशीं सारखाच आजही हिरवा पोषाखच हंबीररावांनीं केला आहे! यमुना म्हणते त्याप्रमाणें हंबीररावांच्या मनास मोह पाडणारी अवदसा कोण–कोण–मोहना तर नसेलना? (भ्याल्यासारिख करून) अगबाई हे अगदींच जवळ येत चालले! ह्यांना कसें चुकवूं? येथें मी एकटी! (यमुनेकडे पाहून) खरें–यमुना आहे येथें.– मी अगदींच घाबरून गेलें होतें.–तिकडच्या कटाची बातमी विजापुरला समजली नसेलना? ही मोहना या कारस्थानाचें कारण—जगदंबे, माझ्या कल्पना, सर्व खोट्या ठरीव. (हंबीरराव येतो.)

(उघड) अग यमुने, ते अगदीं जवळ आले ना!

हं—[स्वगत] जें नशिबीं पाहिजे म्हणून इतका उद्योग, तेंच नशिबीं आले आहे; पण नशिबीं जें नको, तेंही पण त्याच्याबरोबरच आहे. लांबून मोहनेला तेव्हांच ओळखली म्हणून इकडे यावयास निघालों, पण आम्हीं होऊन आमच्या गळ्यांत बांधलेली धोंड मोह-नेच्या शेजारी आहे, हें मला कसें दिसलें नाहीं कोण जाणे!–आतां इतक्या जवळ आल्यावर ह्यांच्याशीं बोलल्याशिवाय जाणें गैरच.

(जवळ जातो.)

मो०—यमुने, तूंच त्यांच्याशीं अगोदर बोल गडे; अशी एकाएकीं गांठ पडली, म्हणून मी अगदीं गोंधळून गेलें आहें!

हं०—प्रतापरावांशीं बराच वेळ राजकारस्थानासंबंधानें बोलत बसल्यानें माझें मस्तक अगदीं तापून गेलें होतें, म्हणून असाच बागेंत जरा हिंडत होतों. अनायासें आपल्या दर्शनाचा लाभ झाला मैत्रिणी-मैत्रिणींच्या गोड भाषणात माझ्या येण्यानें व्यत्यय तर नाहींना आला?

य०—गोड भाषण कसलें! स्वारी जवळ आलेली पाहून मोहना-बाईनीं मला विचारावयास सांगितलें कीं भाऊजींना बयनींची गांठ घ्या-वयाला कालपासून वेळ नाहीं का मिळाला?

हं०—राजकारस्थानामुळें फावलें नाहीं, त्याची माफी असावी.

मो०—पांच सहा दिवस मुक्काम आहेना?

हं०—सात आठ दिवस निदान येथें रहावें लागेल, असा रंग दि-सतो.—खरोखर पादशहाच्या खास बागेंतही असलीं सुंदर फुलझाडें मीं पाहिलीं नव्हतीं!

य०—प्रतापरावांना सुवासिक फुलांची फार आवड आहे; तेव्हां या बागेस तर ते जीव का प्राण करितात—

हं०—त्यांत मोहनाबाईची व्यवस्था, मग नन्दनवनाचा थाट येथें दिसावा, हें रास्तच आहे. [यमुनेकडे] वा! आपण हार गुंफण्यांत गुं-तलेल्या दिसत आहां!

मो०—यमुनाबाईस येथें माळ्याचें काम करण्यास लावलें, त्याबद्दल राग-बिग नाहींना आला?

ह०—आपल्या सारिख्या कुशळ गुरूच्या हाताखालीं काम शिकण्याची संधि मिळाली. हें तिचें भाग्यच समजलें पाहिजे!

मो०--मी कां त्यांना शिकविणार!–गेंदेबाज हार कसे गुंफावेत हें शिकण्याकरितां तर त्यांना बागेंत घेऊन आलें.

हं०—असें असेल तर गुरूहून शिष्याचीच चलाखी अधिक दिसते. कारण हिचा हार तर अद्याप अर्धासुद्धां गुंफलेला दिसत नाहीं.

य०--मोहनाबाई, मला नुसतें गुरू ह्मटल्यानें मी कांहीं गुरू होत नाहीं. स्वारीलाच परीक्षा करूं दे, शिष्य कोण व गुरू कोण ? (मोहनेच्या हातांतील हार घेऊन) ही माझी अर्धीमुर्धी झालेली गुंफण पहा--नाहीं तर ही वीण कशी सुन्दर पडत गेली आहे पहा!

हं०--(निरखून पहात). हा बायकोचाच हार पडला, तेव्हां त्याला नांवें ठेऊन सोय नाहीं! (दुसरा घेऊन) खरें बोलावयाचें म्हणजे तारीफ करण्याच्या योग्यतेचा हाच हार.

य०—कां झालें मोहने, कोण शिष्य व कोण गुरू तें ठरलें! तुला कीं नांहीं, दुसऱ्यांची उगीच प्रशंसा करण्याची फार संवय!

मो०—तुझा हार पुरा झाला नाहीं, ह्मणून तसा दिसतो. पुरा झाल्यावर माझ्याहून कितीतरी चांगला दिसेल.

हं०--(यमुनेस तिचा हार देऊन) हं, होऊंद्या एकदां पुरा.–जसा हा हार मोहक दिसतो,-तसा-ह्याचा सुवासहीं अत्यंत गोड आहे (वास घेत) माझें चढलेलें मस्तक ह्याच्या सुवासानें अगदीं शांत झालें. (मोहनेस हार परत देतांना) कोणचीही वस्तू झाली तरी ती योग्य स्थानींच शोभते!

(हार पुढे करतो.)

मो०—तर मग आपल्या हातांतच तो असूं द्या.

हं०—येथें आल्यानें हा अलभ्य लाभच झाला म्हणावयाचा,–मला येथें बराच वेळ झाला, कामाची तसदी फार असल्यामुळें मला आतां रजा असावी.

मो०—यमुनाबाईचा हार तयार होईतों रहावयाचें होतेंना ?

हं०—त्याला फार वेळ लागेल. तयार झाल्यावर मी मग पाहीन. (जाऊं लागतो) (स्वगत) ह्या लतामंडपाच्या आड जर गेलों, तरमी येथेंच आहें असें ह्यांना कांहीं वाटावयाचें नाहीं. (आड जातो.)

मो०—यमुने, गडे, आपण आणखीं फुलें तोडूं या. स्वारीकरितां मला आणखी एक हार गुंफला पाहिजे. मग मी गुंफायला लागलें म्हणजे माझें पाहून तूंही तशीच गुंफ, म्हणजे तुझाही हार सुंदर होईल.

य०—मी त्यांच्या हातांत हार पहावयास दिल्यामुळें तुला हा दुप्पट त्रासच झाला. (जातात.)

हं०—(पुढें येऊन) मोत्यांच्या हिरव्या महालांत मी धरावयास धावल्यामुळें रागावलेल्या मोहनेच्या सुंदर शरीरावर जी लावण्याची लकाकी त्या वेळीं दिसली, त्या मोहक तेजांत ह्या शांत वेळी जरा तरी कमीपणा असावयाचा होता!–मोहक मोहने, तुला आपलीशी करण्याची संधी येईल म्हणून आज पांच वर्षें वाट पहात बसलों, अखेरीस आज तुझ्या हातचा हार माझ्या गळ्यांत लटकला! –देवगडच्या स्वारीचा बाहेर बहाणा करून कांचनगडचा हा मोल्यवान खजिना ताब्यांत घेण्याच्या माझ्या गुप्त बेतास शकून तर उत्कृष्ट झाला म्हणावयाचा!– मोहने, पिलाजीचें मुत्सदी बोलणें जर मला काल खोडून टाकतां आलें अस-

तें, तर आतां माझ्या छातीवर रुळणारा हा हार मजकारितां म्हणूनच तुझ्या कोमल हातांनीं गुंफिला असता!—(हार हातांत घेऊन) किती सुबक!— किती गोड!—मोहनेच्या मऊ हातांनीं गुंफलेला!—ह्या फुलांच्या प्रत्येक पाकळींत जादू ओतप्रोत भरलेली असली पाहिजे!—विश्वामित्र ब्रह्मर्षी बनल्यानंतरही जर ह्या हारावरचा वारा त्याच्या आंगावरून गेला असता, तर तो कुत्र्याहूनही अतिनिंद्य असें रूप धारण करून मोहनेच्या पायांत घुटमळत राहण्यास खात्रीनें तयार झाला असता! ह्या फुलांहूनही मृदु अशा हांतत हा हार धरून पुष्पवाटिकेंतून फिरतांना मोहनेस जर शुकमहामुनींनीं पाहिलें असतें, तर रंभेपुढें केलेल्या पांडित्यांतील एक शब्दही त्यांच्या तोंडातून निघाला नसता!—मोहना दांडगाईनें आपलीशी केली तर सरदार मंडळी नांवें टेवतील ह्या क्षुल्लक भीतीनें मीं चार वर्षे उगीच व्यर्थ दवडलीं. सरदारांना कोण विचारीतो म्हणा—पण दांडगाई केल्यानें मोहनेला आवडणार नाहीं.—सध्या मला या कामीं पिलाजीच्या तंत्रानें वागलें पाहिजे.

[जातो]

अंक १—प्रवेश दुसरा.

स्थळ—प्रतापरावाचा वाडा

(प्रतापराव, दवलतराव, व दादासाहेब कोठारे)

द०—प्रतापराव, माझा सल्ला मीं पूर्वी सांगितलाच आहे. आजच्याच प्रसंगीं भांडण उकरून काढूं नये.

दा०—प्रतापराव म्हणतात तेंही खरें आहे, आणि दवलतरावांचें हीं खोटें नाहीं. खरें आणि खोटें निवडीत बिवडीत बसण्यानें माझें काम

नाहीं. शास्त्राभ्यास ज्यांनीं केला असेल, त्यांनीं असल्या पोंकळ वाद्यांत शिरावें.

म०—तुमचें पांडित्य नको—

दा०—तुमच्या वडिलांना देखील मी मांडीवर खेळविलें आहे. काय त्यांची चतुराई! प्रत्येक गोष्ट मला येऊन विचारावयाची!—शिवाय असें असतें, वृद्धांचा उपदेश तरुणांना रुचत नाहीं; म्हणून जेव्हां तेव्हां मसलत देण्याचे भानगडींत मजसारख्या बुढ्यांनीं पडूं नये.—पण लावून खेळण्याचे वेळीं म्हाताऱ्या भीष्माचार्यांनीं कौरवांना किंवा पांडवांना कोणालाच दोन कानगोष्टी सांगितल्या नाहींत!

म०—ह्यांचें पुराण सुरू झालें!—थोडक्यांत सांगा, माझा बेत तुमच्या मनास येतो ना?

दा०—त्याही पक्षाचें मी मंडन करीत नाहीं, आणि याही पक्षाचें खंडन करीत नाहीं. शहाणपणाचा हाच मार्ग आहे. द्रौपदीला भर सभेंत जेव्हां ओढली, तेव्हां भीष्म, द्रोण, कृपाचार्य, वगैरे मजसारखी बुड्ढी मंडळी सभेंत काय कमी होती? पण कोणाच्या तरी तोंडांतून ह्याला रागाचा किंवा त्याला लोभाचा ब्र तरी निघावयाचा होता? कृष्णशिष्टाईचे वेळीं हीच कथा; सभेतले सगळे थेरडे गुपचुप होते!

म०—तें नको आहे आतां,—

द०—पादशहाचा वकील केव्हां येणार आहे?

म०—हबीरराव आले म्हणजे केव्हां येणार तें समजेल.

द०—खंडणी द्यावयाची नाहीं हें तर ठरलेंच, पण देत नाहीं असेंही म्हणूं नये. आतांची वेळ कशी तरी मारून न्यावी; म्हणजे

सगळ्या व्यूहवाल्यांना इषारा देऊन जय्यत तयारी ठेवावयास सांगेन, आणि देवपुराहून खंडणी घेऊन पादशहाचें लष्कर परत आल्यावर, कांहीं तरी मधाचें बोट दाखवून, एकदम छापा घालून, त्यांचा खजिना लुटण्यास ठीक पडेल.

प्र०—द्रव्यासाठीं, दौलतराव, त्या पांढऱ्या फटफटीत रुपड्यासाठीं आजचा अपमान सोसावा काय? अहो, दसदहाहजारींना सतत दहा वर्षे पुरेल एवढा प्रचंड खजीना कशाला गोळा केलांत? सतत दहा वर्षे लढाईच्या वादळाशीं झुंजण्यास हा गड लायक व्हावा म्हणून कशाला ह्या कांचनगडावर एवढी खस्त खाल्लीत?– ह्या हरामखोर पादशहाचे पुढें मस्तक केसभरही वाकवावयाचें नाहीं अशा सर्वांनीं घेतलेल्या आणा शपथा, दौलतराव, आपण विसरलांत काय?

द०—शपथ विसलों नाहीं, माझें इतकेंच बोलणें कीं गनिमीकाव्यानें कार्यभाग साधावा.

प्र०—मानगुटीवर बसून शत्रूचें नरडें दातांनीं कडाकड फोडण्याची जी वेळ, त्या वेळीं कसला गनीमीकावा!– खानाच्या छावणींत एकटा सांपडलों असतों, तरी देखील आमचें रक्त शोषण करून फुगलेल्या ह्या विजापुरच्या दुष्मानापुढें माझें डोकें केसभरही लवलें नसतें!– गनिमीकावा लढवून ह्या चोरांना पंचवीस तीस वर्षे विजयानगरचे उरावर थयाथया नाचूं दिलेंत— बस्स झाली इतकी गुलामगिरी!

द०—व्यूहाचे मुख्य आपण आहां तेव्हां आपले हुकूम केव्हांही आम्हाला शिरसा वंद्य आहेत. बाकी मी जर प्रतापराव असतों, तर ह्या वेळेस गनिमीकावा करण्यास चुकतोंना!

प्र०—आणि मी जर दवलतराव असतों, तर युगानुयुगें गनीमी कावा करीत, यवनांच्या लाथाबुक्या खात, सर्व जन्म घालविला असता!

[हंबीरराव व पिलाजी येतात.]

दा०—हे आले हंबीरराव!

[सर्वांचे रामराम, या बसा, झाल्यावर]

प्र०—काय हंबीरराव, खानसाहेबांनीं पाठविलेले हे वकील वाटतें?

हं०—छे नव्हेत,—माझ्या हाताखालचे पंचहजारी व माझ्या लष्करांतील मुख्य मुत्सद्दी आहेत.—आपल्या वडिलांचा व पिलाजीराव मान्यांच्या घराण्याचा फार परिचय होता.

पि०—प्रतापरावांना मान्यांच्या घराण्यानें जाधवांकरितां काय काय केलें हें माहीत नसेल, पण त्यांच्या पदरच्या कोणाही वृद्ध सरदारास जाधवांकरितां मान्यांचे किती बळी पडले आहेत, हें माहीत असलें पाहिजे.

दा०—संभाजीराव मान्यांचे नातू पिलाजीराव तेच आपण वाटतें!—चेहरा तर अगदीं तसा आहे!—हं हं हं— संभाजीरावांनीं ह्या गडाची हवालदारी पंचवीस वर्षें केलेली आहे. गडकऱ्यांचें काम त्यांच्या हाताखालीं वीस वर्षें मी केलेलें आहे.

प्र०—तर मग आमच्या दादासाहेबांच्या जुनाट दोस्तांपैकींच हे एक आहेत म्हणावयाचें!

पि०—दादासाहेबांचे जुनाट दोस्त तर खरेच, पण जाधवांचे त्याहूनही जुनाट नोकर आहेत!

प्र०—मानें, तुमच्या घराण्याविषयीं आमचे वडील नेहमीं म्हणत, कीं ह्या घराण्यांतील प्रत्येक पुरुष मान हेंच धन समजत असतो.—जाधवांचे नोकर म्हणून येण्यास जर तुम्हाला भूषण वाटतें तर जाधव घराण्यांतील शेवटच्या पुरुषाचे हुकूम पाळण्यास तयार आहां काय ?-कां, उत्तर नाहीं?—ह्या प्रश्नाचें उत्तर तुम्हांस द्यावयास यावयाचेच नाहीं ! एकसारखी यवनांची धुंकी झेलीत राहिल्यामुळें, आमचे लोक इतके अ-जागळ, टाकाऊ व मऊ झाले आहेत, कीं चाळीस वर्षांपुर्वीचें आमच्या लोकांतील तेज, मान, पीळ—सर्व कांहीं नाहींसें झालें आहे. पिलाजी राव, तुम्ही माझ्या प्रश्नाला उत्तर दिलें नाहीं, ह्याचें मला वाईटही वाटत नाहीं, किंवा आश्चर्यही वाटत नाहीं; कारण विजापूर सोडून आपल्याला एक आठवडाही झाला नसेल !

पि०—प्रतापराव,—सरकार,—आपल्या प्रश्नाला एकदम उत्तर देतां येत नाहीं, ह्याची मला लाज वाटते !—ज्याची भाकरी खावी त्याची इमानें इतबारें नोकरी करावी,—ह्या आमच्या अत्युत्तम गुणावर एकदम पाणी ओतवत नाहीं.

प्र०—आपलें सर्वस्व दुसऱ्याच्या मुठींत देणाऱ्या तुम्हा सरदारांत कोणचा अत्युत्तम गुण उरला आहे?—मोंगलांच्या खोलींत आम्ही होऊन आमच्या मुली ढकलण्यास शिकलों, म्हणून रजपूत शेखी मिरवितात, तर हे विजयानगरचे सरदार, सर्व गुलामांत पहिल्या प्रतीचे गुलाम आहों, म्हणून थोरवी सांगतात!—शिवाय माने, असें पहा, मोंगलाच्या हल्लीच्या अकबर बादशहासारखे पुरुष जर विजापूरच्या तक्तावर बसलेले असते, तर तुम्ही म्हणतां तें ही बरोबर झालें असतें. प्रत्येकाला आपआपल्या

धर्माप्रमाणें वागूं देण्याचा त्या पादशहाचा कट्टानिश्चय, प्रजाजनांच्या सुखाकडे लक्ष देण्याची त्याची हौस, सरदार मंडळीवर मोठमोठ्या कामगिऱ्या सोंपवून त्यांच्या पराक्रमाचें कौतुक करण्याची वहिवाट—यापैकीं कोणची गोष्ट तुमच्या विजापूरला आहे?—हा पादशहा राजधर्म जर पाळीत नाहीं तर त्याला आम्ही धनी तरी कां मानावें ?—माने, कोण कोणाला भाकरी चारतो?—विजापुरास ठेंचून खेंचलेली एवढी संपत्ति ह्या चोरांच्या बापजाद्यांनीं आपल्या बरोबर आणिली होती वाटतें!—अहो ही आमचीच संपत्ति,—तो सोनेरी महाल, तें हिरेजडित सिंहासन—सर्व—सर्व आमचें, आमच्या आज्यापणज्यांनीं कित्येक वर्षे श्रम करून संपादन केलेलें !—तो बोळघुमट बांधतांना किती हिंदु गुलामांना ह्या चोरांच्या चाबुकांचा मार दररोज खावा लागे, हें तुम्हांस माहीत आहे काय? त्या भव्य मशिर्दीच्या छतावर सोन्याचा मुलामा चढवितांना, तुमच्या आमच्या आया बहिणींना भ्रष्ट करून त्यांचे किती दागदागिने ह्या चोरांनीं हिसकावून घेतले, ह्याची तुम्हाला कल्पना तरी करितां येते काय?—माने, तुम्ही स्वतःचेच नोकर आहां, विजयानगरच्या तक्ताचे तुकडे तुकडे जरी झाले, तरी अद्याप त्याच तक्ताची तुम्ही भाकरी खात आहां, हें विसरूं नका.

द०—हंबीरराव, माने, प्रतापरावांचें हें बोलणें ध्यानांत धरून, आमच्या कालच्या प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे.

हं०—होय, आणि त्या प्रश्नाचें उत्तर देण्यासच मी आतां आलों आहे.—मान्यांनीं सुचविलेली मसलत मला बरी दिसली—

दा०—पिढीजाद्या नोकरांच्या तोंडांतून वावगी मसलत कधींही

निघावयाची नाहीं!—मान्याप्रमाणें कोठारेही जाधवांचे पिढीजादे नोकर आहेत व मी दिलेला सला देतील हंबीररावासारख्या सरदारांना आवडल्याशिवाय राहणार नाहीं!

प्र०—मान्यांची अशी कोणती मसलत आहे?

पि०—हंबीररावांचें खानसाहेबांवर मोठें प्रेम आहे, व ते खानसाहेबांना फार आवडतात अशा स्थितींत खानाशीं उघड उघड युद्धाला उभे राहणें—यांच्या हातून कांही व्हावयाचें नाहीं—आम्हीं अशी शपथ घ्यावयाला तयार आहों कीं, कटवाल्याविरुद्ध आमच्या तलवारी म्यानांतून कांहीं बाहेर निघावयाच्या नाहींत,—

हं०—व आजच्या प्रसंगांतून आपण पार पडला म्हणजे उघडपणें कटांत सामील होण्यास आम्ही तयार आहों.

द०—हंबीररावांचे कटवाल्यांवर मोठे उपकार आहेत.—प्रतापराव, हंबीररावासारखे प्रख्यात सरदार आम्हाला मिळाल्यावर जयाविषयीं शंकाच घ्यावयास नको!

प्र०—मग इतक्या गोष्टी ठरल्या म्हणावयाच्या, खानाचा समाचार आमचा आम्हीं घ्यावा, व पुढील उद्योगांत—

हं०—हंबीरराव एकीकडे मन तर एकीकडे शरीर, असें खात्रीनें वागणार नाहींत.

प्र०—हंबीरराव, तुमच्या वचनावर विश्वास ठेवून मी लढाईचा हुकूम देतों बरें.—दवलतराव, सर्व गडकऱ्यांना हुकूम फरमावा, कीं एक प्रहरांत गड झुजण्यास तयार झाला पाहिजे.

पि०—आम्हीही आमच्या तयारीस लागतों. खानाचा जासूद इतक्यांत आमच्याकडे यावयाचा आहे, तेव्हां आम्ही आतां येतों. राम राम. (हंबीरराव व पिलाजीराव जाऊं लागतात)

प्र०—(सर्व उठून हंबीररावांना पोंचवितांना.) ठरल्याप्रमाणें आम्ही वागूं लागलोंच म्हणून समजा (हंबीररावाच्या खांद्यावर हात ठेवून हंबीरराव, तुमच्यावर आमचा सर्व भार आहे. हंबीररावांचें वचन कालत्रयीं फिरावयाचें नाहीं, अशी विजापूरास तुमची कीर्ती आहे.

हं० व पि०—आमच्याबद्दल धास्ती नको. जेथें तुम्ही तेथें आम्ही आहोंच समजा.—पुढें पर्यंत नको यावला!—येतों आतां. राम राम.

(जातात)

प्र०—कोठारे, तुमच्या स्वाधीन केलेल्या धान्याच्या व दारूच्या कोठारासंबंधानें फार सावधगिरीनें वागा. कोठाराच्या किल्ल्या कोणाही चाकर माणसाच्या हातीं देऊं नका.—माझ्या कोठारांत दगा नसल्यावर विजापूरासारख्या छपन पादशाही गडावर जरी तुटून पडल्या, तरी अपयशाची भीति बाळगावयास नको.—आपल्या कोठाराचा पाहरा दुप्पट करा. जा आपल्या कामाला लागा. (दादासाहेब जातो.)

द०—हंबीरराव व पिलाजीराव ह्यांच्यावर कितपत विश्वास ठेवावा ही शंका आहे, तरी त्यांच्यावर सर्व भिस्त न ठेवतां, त्यांच्या मदतीचा होतां होईल तों उपयोग करून घ्यावा.

प्र०—एक त्यांच्यावर विश्वास तरीं ठेवावा, नाहीं तर दगलबाज म्हणून त्यांना हांकून तरी द्यावें!

द०—एक घाव कीं दोन तुकडे, ही पद्धत मला नाहीं पसंत.—

उतावीळ होतां कामा नये.—असें आहे प्रतापराव, तुम्हाला कोणच्याही गोष्टीचा संशय हा आपला येतच नाहीं. तुम्हाला एकदम खरें तरी वाटतें, किंवा खोटें तरी वाटतें. माझें मन संशयी आहे; पाहिजे तर भित्रें आहे म्हणा.—पण शत्रूच्या कोटांतलि कोणच्या सरदारावर किती विश्वास ठेवावयाचा, हें काम तुम्हीं मजवर—आणि माझ्या एकट्यावरच—सोपविलें पाहिजे.

प्र०—बरें, हंबीरराव व पिलाजीराव ह्यांच्याशीं तुम्हीं सांगाल तसें आम्हीं वागतों, झालें!—बरें आतां मीं असें करतों, सर्व गड फिरून येतों. गडाची झुंजण्याची तयारी पुन्हा एकवार पाहिली म्हणजे मनाला बरें वाटेल!—(दवलतराव जाऊं लागतो.) —हं, कटांतील सर्व सरदारांना 'तयार असा' म्हणून इशारतीचीं पत्रें आतांच गेलीं पाहिजेत.

द०—त्याच उद्योगाला मीं आतां लागतों. (जातो)

प्र०—(स्वगत) आमचेच सरदार, आमच्या विजयानगरचे सरदार, आमच्या धर्माचे सरदार, आमच्या हाडारक्ताशीं संबंध असलेले सरदार, आमच्याशीं दगलबाजी करतील, असें दवलतरावांना वाटतें तरी कसें? विजापूरकरांचे 'चाकर' म्हणवून घेण्यांत अस्सल बिजाच्या या सरदारांना भूषण वाटत असेल हं!—ह्या लोकानीं आमचे डोळे उघडे असतांना आमच्या घरांत शिरून पादशाही गाजवावी आणि विजयानगरचें तापलेलें रक्त गोठून थंडगार व्हावें, हें संभवतें तरी कसें? हंबीररावांवर पादशहाची मेहेरबानी आहे म्हणे!—आपल्या जिवावर चाललेली या पादशहाची चैन पाहून जोंपर्यन्त हंबीररावाच्या मनांत द्वेषाग्नि पेटत नाहीं,—आम्ही सरदारांचे बच्चे, आम्ही राजांचे वंशज, अशी आठवण होऊन,

जोंपर्यंत हंबीररावांचें मन धडपडत नाहीं,—आमच्या धर्माच्या यातना पाहून जोंपर्यंत हंबीररावांच्या मनाला तळमळ लागून रहात नाहीं,—तोंपर्यंत पादशहा हंबीररावांची पाठ थोपटणार, तोपर्यंतच हंबीररावांना किताब मिळणार, आणि एकाद्या नासक्या कुचक्या खानांच्या ताबेदारींत स्वारीबरोबर फिरावयाला मिळण्याची मेहेरबानी होणार !—पादशहाच्या ताटांतील उष्टीं पक्वान्नें चाखावयाला मिळतात म्हणून विजयानगरच्या अब्रूवर रखरखलेले निखारे ठेवण्यास हंबीरराव तयार होतील काय?—नाहीं—नाहीं—विजयानगरचें शुद्ध रक्त अद्याप इतकें बाटलेलें नाहीं, अद्याप इतकें कुजलेलें नाहीं;-आम्हा सरदारांच्या मनात—(पडद्यांत मंजुळ आवाज) अरे ! मी विचार करीत करीत मोहनेच्या महालापाशीं आलों ! (कानोसा घेऊन) झोपाळ्यावर बसून दोघी तिघी ओंव्या म्हणत आहेत ! हलकेंच आंत जावें.

[पडदा वर जातो. झोंपाळ्यावर मोहना व यमुना बसल्या आहेत. जवळ चंपा दासी उभी आहे.]

य०—आतांची ओंवी शेवटची हं—मेणा बाहेर उभा असेल.

मो० व य०— (मिळून).

कांचनाच्या किल्यावरि,
कशासाठीं ग उत्सव केला ।

य०— राजा शहाजी पुत्र झाला ।
मोहनाबाईला.

य०—(झोंपाळ्यावरून उतरून) सबंद काग ओंवी म्हटली नाहींस मोहने?

मो०—पहिल्याचें नांव घेऊं नये असें आहेना ?

य०—असें कां?—बरें तर मी येतें हं—मेणा बाहेर वाट पहात असेल.—शेवटची ओंवी देखील मजबरोबर धड म्हटली नाहींस, ध्यानांत असूं दे हं!

(जाऊं लागते)

मो०—आणखी एक ओंवी म्हणूं या,-मग जावयाला निरोप देतें—अगदीं तूं जशी म्हणशील तशी म्हणतें, मग तर तुझा राग नाहींना?

य०—चंपे, तूं काल म्हणत होतीस ती ओंवी तुझ्या बाईसाहेबांना फार आवडतेना?

चं०—पण ती ओंवी बाईसाहेब एकटयाच आपल्याशीं म्हणतात.

[मो० य० झोंपाळ्यावर बसतात]

य०—म्हणायचें हं बाईसाहेब,—आतां एक शब्द देखील सोडावयाचा नाहीं बरें!

य० व मो० (दोघी मिळून)—

कांचनाच्या किल्यावरी,
मोहित्यांची मोहना आली।
मन मोहूनि राणी झाली।

य०—**प्रतापरावांची.**

य०—आतां कांग मध्येंच थांबलीस?

मो०—हो! तूं अशा भलत्या सलत्या ओंव्या म्हणावयास लागलीस तरी मी कांहीं फसावयाची नाहीं!

य०—मी म्हणीन तशी म्हणणार होतीस ना?–तें तरी तुझें खोटें झालें!-बरें मी येतें आतां मोहने-पुन्हां वरचेवर गांठ पडेलच.—मेणा अगदीं तयार दारांत उभा आहे.

मो०— मी आलें मेण्यापर्यंत,— (दोघी जातात.)

प्र०—(पुढें येऊन) हंबीररावाची बायको हिला भेटावयाला आली म्हणजे दोघीही आनंदानें ओंव्या म्हणतात, थट्टामस्करी करितात; पण तीच माझी आणि हंबीररावांची गांठ पडली म्हणजे आमच्या मनाला एका भयंकर आणि गूढ खड्यांत पडल्या सारिखें होऊन, सुख व शांति ह्यापासून आम्ही लांब लांब पळतों आहोंसें वाटतें!—उद्या, आज, घटकेनें देखील लढाई जुंपाविण्याचें आमचे बेत ह्यांना जर कळविले तर तें गोड हास्य क्षणांत नाहींसें होईल, तें आनंदी कुजबुजणें बंद पडेल, व डोळ्यांत चमकणारा तो सुखाचा तजेला दुःखाश्रूंनीं वाहून जाईल!—सर्व सृष्टींत ईश्वरानें सर्वांत सुखी कोणाला उत्पन्न केलें आहे, ह्याचा जर विचार केला, आणि मोहनेच्या चेहऱ्याकडे जर दृष्टि गेली, तर बायकाच सर्वांत सुखी, असें एकदम उत्तर द्यावेंसें वाटतें. परंतु गुलामगिरींतल्या अपमानाचा सर्व मारा ज्यांना रात्रंदिवस सोसावा लागतो, मान, अधिकार, आपलेपणा, ह्याकरितां सर्वकाळ शरीरास झिजवून दुःखी शरीरांत मानी मनाचा ज्यांना कोंडमारा करावा लागतो, अशा असंतुष्ट व नेहमीं धडपड करणाऱ्या पुरुषजातीशीं असली मोहक व आनंदी जात ईश्वरानें ज्या अर्थी जखडून टाकिलेली आहे त्या अर्थी जगांत कोणीच सुखी असूं नये,—मोहनेनें देखील आनन्दी राहूं नये,—असाच ईश्वरी संकल्प असावासा दिसतो.—ही पहा आनंदाची मूर्ति परत आली.—चंपे, चल जा तूं. (चंपीच्या जागीं उभा राहतो.)

मो०— (पडद्यांत) कायग सटवे चंपे, यमुनेला ती ओंवी सांगावयाला तुला कोणीग सांगितलें होतें? (बाहेर येतां येतां) नसता कार-

भार करण्याची हौस भारी.—एकदां तिकडे स्वारीपाशीं तेवढी ओंवी म्हणून दाखीव (पडद्या बाहेर) म्हणजे सुटलीस; ढालगज भवानी—

प्र०—मोहनेनेंच ती ओंवी प्रतापरावांना म्हणून दाखविली!—चंपी-कडे कांहीं दोष नाहीं!

मो०—केव्हां आली स्वारी बाई! अगदीं नकळत!

प्र०—आपण जो कांचनगडावर जय मिळविला, त्याचें वर्णन चाललें असतानांच मी आलों.

मो०—बायका कोठें जय का मिळवितात?

प्र०—तें काय मला माहीत!—गाण्यांत होता तो मजकूर मी सांगितला.

मो०—कोणच्या ओंवींत?

प्र०—ती ओंवी नाहीं माझ्या ध्यानांत राहिली.—आपल्या पराक्रमाचें तें वर्णन आपल्या तोंडून ऐकण्यासाठीं मी येथें आलों.—बसाव याचें आतां झोंपाळ्यावर. (झोंपाळ्यावर बसतात.)

मो०—आपल्या पराक्रमाचें वर्णन करावयाचें ना?

प्र०—होय आपल्या पराक्रमाचें.

मो०—कांचनाच्या किल्ल्यावरी
मुसलमानानीं—

प्र०—मुसलमान कां म्हणून ह्या ओंवींत?—कांचनगडच्या किल्ल्यावर,—प्रतापरावाच्या रंगमहालांत,—आणि मोहनेच्या तोंडीं,—मुसलमान!

मो०—ओंवी पुरती ऐकावयाची तरी होती?—आपल्याला असतात, म्हणूनच कीर्ति मिळत असते हो.—रावण जर नसता, सी



प्रताप राव—खात्रीनें तुला असें झालें आहे, केव्हां एकदां ती ओवी म्हणून दाखवीन!

(पान २१)

तादेवीला जर त्यानें चोरून नेलें नसतें, तर एवढा पराक्रम करून दा-खवावयाला रामरायाला प्रसंगच आला नसता!

प्र०—आम्हाला हे शत्रूही नकोत,—आमची देवी चोरून न्याव-यास नको,—व पराक्रम गाजवावयलाही नको!—हं संपीव एकदां ती ओंवी.

मो०—कांचनाच्या किल्यावरि

मोहित्यांची मोहना—

प्र०—थांबावयाला कांहीं नको.— आली—आणि तिनें काय परा-क्रम केला?

मो०—पण मी ही ओंवी म्हणायचीच नाहीं.

प्र०—खात्रीनें तुला असें झालें आहे, केव्हां एकदां ती ओंवी म्हणून दाखवीन!—जिभेवर ती ओंवी नाचते आहे, केव्हां बाहेर पडीन म्हणून!—हं म्हण ती ओंवी.

मो०—कांचनाच्या किल्यावरि,

मुसलमानांनीं दीला वेढा।

विजयिवीराची दृष्ट काढा॥

प्रताप—

प्र०—नवऱ्याच्या नांवांत कायती सगळी लाज येऊन भरली आहे.—मोहने-

मो०—नांव घेऊन काय तें हांक मारावयाची अगदीं!

प्र०—ज्या नांवाचा जप घेऊन आम्ही बसतों, तें मोहक नांव उच्चारण्यास, तुझ्यासारखी कांहीं आम्हांला लाज नाहीं वाटत!

मो०—बायका देखील नांवाचा जप करीत बसतात हो;—पण पुरुषासारखी त्यांनीं लाज कोठें सोडिली आहे?

प्र०—दाराच्या आड उभेराहून आम्ही 'प्रतापराव' 'प्रतापराव' म्हणून पाहिजे तितक्या ओंव्या ऐकिल्या, तरी हरकत नाहीं.—महालांत आम्ही पाय ठेविला, कीं लाजेचें राज्य सुरू झालें!—असला रिकामा हट्ट नको आतां.—मोहित्यांच्या मोहनेनें कांचनगडावर कोणता पराक्रम केला? त्या पराक्रमाबद्दल तुला वाईट वाटत असेल, तर ओंवी म्हणणार नाहींस.—नाहींना म्हणावयाची?—जाऊं आम्ही?

मो०—हें काय तें—म्हणते हो.

कांचनाच्या किल्यावरि
मोहित्यांची मोहना आली।
मन मोहूनी राणी झाली।
प्रतापरावांची!

प्र०—बायकांना नेहमी आर्जवें करून घेण्याची संवय!—मनमोहूनी राणी झाली, प्रतापरावांची.'

मो०—या ओंवीचा इतका कसला विचार करावयाचा?

प्र०—मोहने तुला खरें सांगूं का,—मोहित्यांची मोहना माझी राणी ज्यावेळीं झाली, त्यावेळीं माझ्या आयुष्यांतील सर्वांत मोठी चूक मीं केली, असें मला वाटतें.

मो०—असें कां वाटतें महाराज?—ह्या दासीच्या हातून सेवेंत तर चूक झाली नाहीं ना?

प्र०—तुझ्या हातून चूक होणें शक्य तरी आहे काय ?—तूं सर्व गुणसंपन्न आहेस, म्हणूनच तुझ्याशीं मीं लग्न केलें ही चूक केलीसें मला वाटतें.

मो०—जगदंबे इकडच्या मनांत हे बिचार तरी कसे येतात !

प्र०—पादशहाच्या जुलमाचें जूं झुगारून देण्याचे माझ्या हाडा-मासांत लहानपणापासून खिळून राहिलेले बेत—लग्नपाशांत अडकूं नको, लग्नपाशांत सांपडूं नको,—म्हणून ओरडत असतांना, मोहने, तुझ्या ताब्यांत मी आपलें मन जाऊं दिलें!—असो, झाली गोष्ट ती होऊन गेली. —आतां मी अवाचित महालांत आलों, तुला एक बातमी कळवावयाची आहे.—एक दोन दिवसांत पादशहाच्या सैन्याशीं लढाई जुंपण्याचा संभव आहे. तेव्हां—तुजवरच्या अतिशय प्रेमामुळेंच मी तुला सांगत आहे—शहाजी जसा आजोळीं गेला आहे तशी तूंही या लढाईचा अखेर निकाल लागेतों मोहित्यांच्या सोनगडावर रहावयास गेलीस—

मो०—नाहीं—महाराज—नाहीं; मी आपणाला सोडून कोठेंही जावयाची नाहीं.—मोहनेला टाकून द्यावयास स्वारी कशी तयार होईल ?

प्र०—टाकून द्यावयाची मी गोष्ट तरी बोललों ?—सोनगडावर कांहीं दिवस रहा; थोडकेच दिवसांनीं विजापुरांत समारंभानें जेव्हां आम्ही प्रवेश करूं, त्यावेळीं तुला न्यावयास येईन.

मो०—मागाहून न्यावयास यावयाचें तें विजापुरचे तटावर आपलें सैन्य हल्ला करीत असतांना, मी बरोबर असले म्हणून काय झालें ?

प्र०—व्हावयाचें काय ? तुला दुःख होईल म्हणून म्हणतों ह्या वेळीं मजबरोबर राहण्याचा हट्ट धरूं नको.

मो०—महाराज, ज्या वेळीं आपण माझ्या हातांत लग्नकंकण बांधलें, त्याच वेळीं मी आपल्या सुखाची–त्याप्रमाणें दुःखाचीही वाटेकरीण झालें आहे. मोहना जी आपली झाली, ती सुखाच्या सावलींत तेवढी आपल्या जवळ राहण्या करितां नव्हे तर दुःखाच्या रणरणाऱ्या उन्हांत देखील मोहनेनें आपल्या शेजारींच राहिलें पाहिजे.–तालिकोटच्या लढाईनंतरही यवनाशीं जन्मभर ज्यांनीं उभा दावा ठेवला त्या महात्मे संभाजीराव जाधवांची मी सून ना?–आपल्या वडिलांच्या व्रताची दिक्षा लहानपणींच जगदंबेच्या पायावर हात ठेवून ज्यांनीं घेतली, त्या नरवीरांची मी पत्नी ना?–विजापूरकरांच्या विरूद्ध विजयनगरास मदत करण्यास प्रथमपासून तयार असलेल्या सूर्याजीराव मोहित्यांची मी कन्या ना?–महाराज, आपणापासून जर ह्या वेळीं मी दूर राहिलें तर सासरच्या आणि माहेरच्या दोनही कुळांना बट्टा नाहींका लागणार? नाहीं,–माझ्या हातून अशी गोष्ट कधींही होणार नाहीं

प्र०—पण लढाईचा त्रास सोसण्याकरितां ईश्वरानें स्त्रियांचें शरीर घडविलेंच नाहीं.

मो०—आपल्यावर असलेल्या माझ्या निष्कपट प्रेमाच्या जोरानें, मी आपल्याबरोबर हव्यातेवढ्या भयंकर यातना सोसण्यास तयार होईन.—रामरायाबरोबर अरण्यवास करण्याकरितां निघालेल्या ज्या सीतेनें राजमंदिरासभोंवतालचा बगीचा संपण्यापूर्वीच दंडकारण्य आलें कीं नाहीं म्हणून विचारलें, तीच सीता पुढें सतत चवदा वर्षें, भयंकर राक्षसशीं लढतांना अरण्यांत रामरायाच्या शेजारीं होती ना?– दोघांत मिळून असलेल्या एकाच वस्त्रावर दमयंतीनें नळराजाबरोबर अरण्यांत दिवस सुखानें घालविले नाहींत काय?

प्र०—मोहने, दमयंती, सीता, यांच्यासारखी तुझी योग्यता आहे; पण मी अभागी, पापी, तेव्हां प्रेम म्हणून ज्याला म्हणतात त्यानें माझें सर्व अंतःकरण व्यापून टाकिलेलें नाहीं.—आणखी तूं जवळ असल्यानें तुझ्या संरक्षणाचे विचार माझ्या मनांत येतील, आणि माझ्या द्वेषाग्नीची ज्वाळा लढाईच्या वेळीं जितकी भडकावयास पाहिजे तितकी भडकणार नाहीं.

मो०—महाराज,—माझ्या संरक्षणाची आपण काळजी नको करावयाला.— वीरपत्नीनें कसें वागावें, हें मला समजतें.—शिवाय मी जवळ असल्यानें आपला दुःखभार कांहींनां कांहीं तरी हलका करीन.—कण्या ऐवजीं रथाच्या चाकांत हात घालून दशरथाला त्याच्या बायकोनें मदत केली नाहीं का? नरकासुराला मारावयाच्या वेळीं सत्यभामेची श्री कृष्णाला काय थोडी मदत झाली?

प्र०—तुझ्याशीं वाद करून हा तंटा मिटावयाचा नाहीं.—साधुमहाराजांच्या कानावर ह्या सर्व गोष्टी घालतों आणि ते मग सांगतील त्याप्रमाणें करावयाचें.—चल गडाची तयारी पाहत पाहत त्यांच्याच दर्शनाला जाऊं. (पडदा)

अंक १—प्रवेश तिसरा.

स्थळ—कांचनगड.

(पिलाजी माने येतो)

पि०—कांचनगडाचा एवढा भयंकर कडेकोट बंदोबस्त असेल, असें मला वाटलें नव्हतें.—आमच्या सैन्याच्या पांचपट सैन्य पन्नास वर्षें

गराडा देऊन राहिले, तरी काय होणार आहे?—हंबीररावांना मोहना मिळणार कशी, व पिलाजीराव सरदार मंडळींत अग्रणी होऊन हलके हलके पादशाहाचे वजीर तरी होणार कसे?—मामला कठीण दिसतो!—माझी सर्व भिस्त आतां दादासाहेब कोठाऱ्यांवर व त्यांच्या पाटाच्या बायकोवर आहे!—गड आचानक जर आमच्या स्वाधीन झाला तरच पिलाजीरावाची चलती!—पाटाच्या बायका व व्यसनी थेरडे या कामीं फार उपयोगी पडतात.—माझी व तिची थोडा वेळ काल गांठ पडली; आमची विजापूरची पक्की ओळख—कढूंतली ही चंचल बया मान्यांच्या अस्सल घराण्यांतील पुरुषाशीं त्या वेळीं पाट लावावयाला पहात होती!—दादासाहेबांच्या एकंदर स्वाभावाचें तर तिनें वर्णन चांगलें केलें!— अरे, विचार करीत करित मी दादासाहेबांच्या घराजवळ तर आलों! (घरांत जातो)

[पडदा वर जातो. दादासाहेब हातांत गुडगुडी घेऊन बसले आहेत. लक्ष्मी निखारे ठेवीत आहे.]

दा०—[एक दम मारून] छे—अशानें कांहीं व्हावयाचें नाहीं—अगदीं रखरखलेले पाहिजेत.

ल०—निखारे भरतां भरतां माझे हात मेले दमून गेले, पण हिकडे त्याचें कांहीं आहे काय?—हा ओला गोळा आंत असल्यावर मग आग तरी कशी लागेल!— मी नाहीं आणखी निखारे आणीत.

दा०—कालपासून गडावर लढाईच्या कायद्यांचा अंमल सूरू आहे.—हुकूम फरमावला कीं तो पाळलाच पाहिजे.—कर्ण एवढा दुर्योधनाच्या नाकांतला बाल, आणि द्रोणाचार्यांना कर्ण पाण्यांत पहात असे,



रुमी—मी नाहीं आणखी निखारे आणीत. (पान २६)

पण द्रोणाचार्य सेनानायक असे तों, रणांगणावर कर्णानें त्यांचा केसभरही अपमान केला नाहीं.—लढाईचे कायदे असे पाळावे लागतात!—निखारे घाल, म्हणजे घातले पाहिजेत.—ओलागोळा आहे कीं कोरडा गोळा आहे, ही पंचाईत करण्याची जरूरी काय!

ल०—अहाहा रे वीर! बायकोवर हुकूम फरमावणारे! कर्णद्रोणाच्या गोष्टी कशाला सांगतां!—धान्याच्या आणि दारूच्या कोठारावर बसवून ठेऊन, प्रतापराव दळवाईचें काम सांगताहेत, हें जसें कांहीं आम्हा बायकांना कळत नसेल!— मोहनाबाईनीं माझा अपमान केला मला बाजारबसवीच्या इतकाही मान द्यावयाला नको असें म्हणाल्या त्याबद्दल जरातरी लाज वाटावयाला पाहिजे होती, जरातरी राग यावयाला पाहिजे होता,—पण इकडचें सगळें शौर्य, राग, पांडित्य, बायकोपाशीं!—मीं नाहीं जा आणखी निखारे आणीत! पाहिजे तर आपणच घेऊन यावेत.

दा०—भारती युद्धाचेवेळीं बायकांनीं पुरुषांचा असाच जर मान ठेवला असता, तर भीमार्जुनांच्या हातून असे मोठमोठे पराक्रम झाले च नसते.—तुम्ही अशा निर्लज्ज व आडदांड झालेल्या आहांत, म्हणूनच हे विजापूरकर आमच्यावर राज्य करीत आहेत.

[निखारे आणावयास जातो.]

लक्ष्मी०—ज्या पुरुषांना आपल्या बायका संभाळतां येत नाहींत, त्यांनीं गुलाम होऊं नये तर व्हावें तरी काय?

[पिलाजीराव पुढें येतो.]

लक्ष्मी०—कोण पाहिजे?

पि०—दादासाहेब आहेत का?—मी पिलाजीराव माने—विजापूरचा.

लक्ष्मी०—पिलाजीराव, या. मी तुमची वाट पहात होतें, आतां याल मग याल म्हणून. काल लवकर येईन म्हणून म्हणाला होतां.

पि०—जरा उशीर झाला. दादासाहेब कोठें आहेत ?

ल०—आंत गेले आहेत; इतक्यांत येतील.—माझ्या प्रश्नाचा विचार केलांत का?—हुद्देसुळकरांचा कैवार घेऊन माझा सूड उगविण्याकरितां, कां-

पि०—सूड उगविण्याकरितां दादासाहेबांचा स्नेह संपादला, कां पूर्वींची चूक दुरस्त झाली तर पहावी म्हणून संपादला, हें एक ईश्वराला माहींत.

ल०—काय माझ्याविषयीं तुमच्या मनांत पूर्वीं इतका तिटकारा नाहीं ? प्रेम,—प्रेम नसो मेलें,—माझा राग तरी येत नाहीं ना ?

पि०—पूर्वीं देखील राग हा नव्हताच.—खांद्याला खांदा भिडवून ज्यांच्या शेजारीं पांचदहा लढाईत मी लढलों, ज्या खंडेराव हुद्देसुळकरांनीं एक दोन वेळां माझे प्राण वांचविले, ज्यांनीं रणांगणावर प्राण सोडतांना आपल्या बायकोचें रक्षण करण्यास मला सांगितलें,—त्यांच्या बायकोशीं—

ल०—पुरें झालें धर्मशास्त्र.—दुसऱ्या त्या अवदसेनें तुम्हाला घेरलें होतें, म्हणूनच मला ह्या इथें दुःखाचे डोहांत लोटून द्यावयास तयार झालां!—दादासाहेबांचें त्या वेळीं तोंड देखील पाहिलें नसून मजपाशीं दादासाहेबांचे पोवाडे गातांना आपणास कसें वाईट वाटलें नाहीं कोण जाणे !

पि०--त्या वेळची स्थिती निराळी होती.-पांच वर्षांपूर्वी जो प्रेमाग्नि धुमसत आहेसा वाटत होता. त्यानें आतां पेट—

(पडद्यांत)

(विझालेले सगळे निखारे! फुललेला निखारा शोधून काढावयाला इतका वेळ लागला! शेगडी नेहमीं रखरखलेली असूंदे, ह्मणून ताकीद दिलेली एकाच्या ध्यानांत असेल तर शपथ!)

ल०—स्वारी आली हें तुम्हांला पुष्कळ सांगावयाचें आहे, पण आतां नको—

[धूर सोडीत दादासाहेब येतात.]

पि०—राम राम दादासाहेब.-माझ्या बाबांच्या मित्रांची भेट झाली म्हणजे जो आनंद होतो—

दा०—(धूर सोडीत) हो हो साहजिक आहे.—आनंद काय विचारावा-हं! गोषा-संभाजीरावांचा आणि माझा-हं! गोषा-माझा स्नेह तसाच होता-गोषा-बसा पिलाजीराव-परकी पुरुष-तुम्हाला पाहून आनंद होतो— परकी, गोषा--बसाहो-(बसतात; दा० लक्ष्मीस जावयास खुणावतो ती तशीच उभी राहते.)

पि०—दादासाहेब मी कांहीं परकी नाहीं; त्यांना एथें असावयाला हरकत नाहीं-खंडेराव हुद्देसुळांच्या घरीं—

दा०—खंडेरावांची ही भगिनी !

पि०—म्हणूनच म्हणतो मी परका नाहीं.-तुम्हला माहीतच आहे खंडेरावांचा आणि माझा स्नेह आतिशय; सख्या भावाप्रमाणें एक-मेकावर आमचें प्रेम;-खंडेरावांच्या जागीं आतां मीच यांना आहे.

लक्ष्मी०—(स्वगत) बरें झालें!--मी खंडेरावाची बहीण म्हणून

पूर्वीं ह्यांना सांगितलें होतें; पिलाजीराव विसरून भलतेंच बोलत कीं काय मला मोठी भिती होती.

दा०—(चिलीम पिलाजीरावाकडे करीत) आहो, दिव्यवल्लीपेक्षां विशेष कांहीं नाहीं—जम कसा बसला आहे, पहा तरी!

पि०—छे हो, नको; हंबीररावांनीं आपल्या सर्व सैन्याची देखरेख मजवर सोंपविल्यामुळें, निशा करण्याचें मी बहुतेक सोडून दिलें आहे.

दा०—ह्या चिलमींत कांहीं विशेष जीव नाहीं.—माझें म्हणणें तर असें आहे कीं एकाग्रचित्तानें काम करण्यास ह्यासारखा दुसरा उपाय नाहीं.—महाभारतांत ही गोष्ट नमूद केलेली नसली, तरी मी खात्रीनें सांगतों कीं, भीमकर्मा वृकोदर ह्या वल्लीचें सेवन करीत असलाच पाहिजे.

पि०—(चिलीम घेऊन) ह्यानें चित्त एकाग्र होतें खरें; तथापि सेनानायकांना अनेक गोष्टींकडे एकाच वेळीं लक्ष द्यावें लागतें.—शिवाय रात्रीच्या सामसूमींत करावयाच्या गोष्टी दिवसा करणें जरा अप्रशस्तच.

दा०—बरोबर बोललां. ह्याचसाठीं दिवसा मी दारूच्या एका थेंबाला देखील शिवावयाचा नाहीं. ज्याच्या पोटांत खोल लपवून ठेवलेलें एखादें गुपित आहे, त्यानें तर दिवसा दारूकडे पाहतां देखील कामा नये, अशी जी शुक्राचार्यांची आज्ञा आहे, ती अनुभवानें खरी ठरली आहे. शुक्राचार्य दारू पीत असत, म्हणूनच कचाला संजीवनी विद्या त्यांच्या पोटांतून बाहेर काढून चव्हाट्यावर आणण्यास संधि मिळाली.

(पिलाजीरावाकडून चिलीम घेतो.

पि०—मनुष्याला निशा करावयाला मिळावी, म्हणूनच ईश्वरानें

रात्र उत्पन्न केली आहे.—मुलांना मनमुराद खेळावयाला, हंसावयाला, खिदळायला मिळावें, म्हणून वडील माणसें जशी खेळावयाच्या जागेकडे कानाडोळा करितात, तसेंच मनुष्याला स्वेच्छाचाराचा उपभोग घेतां यावा, म्हणून सर्व विश्वाचा शास्ता सूर्यनारायण मानवांचे कृतीवर नजर ठेवण्याचें आपलें काम रात्रीं बंद ठेवितो.—माझा नेहमींचा प्रघात असा आहे कीं रात्रीं मजेनें जरा मदिरापान करावें; दिवसा मात्र तसल्या कोणच्याही पदार्थाला स्पर्श देखील करावयाचा नाहीं.

दा०—दारूचें सेवन रात्रींच विहीत आहे शिवाय शास्त्राज्ञा अशी आहे कीं पुरुषानें एकट्यानें मदिरापान करूं नये.—सुखोपभोगाला तजेला आणणारी निशा मदिरापानाशिवाय प्राप्त होत नाहीं, म्हणून दारूची योजना रात्रीं रंगमहालांतच शास्त्रकारांनीं केली आहे.—मन कठोर, बेफिकीर करण्याच्या कामीं ही वल्ली वस्ताद, म्हणून हिचें सेवन अस्मादिक दिवसा करितात.

लक्ष्मी०—ही चिलीम हातांत असली कीं, ज्याच्या त्याच्यावर तारवटायाचें, आणि मेली ती दारू घेतली कीं, भलतें सलतें एकसारखें बरळायचें; तेव्हां दोन्हीं नसलेलीं बरीं

पि०—पुरुष जर मधुर प्रेम बडबडूं लागले, बायका जर गोड प्रीति बडबडूं लागल्या, व प्रेमातिरेकानें बहकून सुखोपभोगाचा व चैनीचा आनंद जर सर्वत्र बडबडूं लागले, तर त्यांच्या बडबडण्याला कोण नांवें ठेवील?

दा०—बडबडण्यासंबंधानें प्रत्येकानें सावधगिरी ठेविली पाहिजे. —पूर्वीं एकदां दिवसा दारू घेतली होती; त्या वेळीं असाच तुम-

च्यासारिखा मोठा गृहस्थ आला होता बोलतां बोलतां बरळून गेलों, कीं ह्या शेजारच्या भिंतितला दरवाजा उघडला कीं तळघराला दोन दरवाजे लागतात. उजव्या अंगच्या जिन्यानें खालीं गेलें कीं तोफेचेगोळे, दारूचीं पोतीं, हत्यारें, ह्याचें तळघर; आणि दुसऱ्या तळघरांत धान्याचा सांठा आहे.—इतकें बोलून गेलों आणि पेटांत चर्र झालें.—ज्याच्याशीं बोललों, तो प्रतापरावांच्या विरुद्ध आहे का कसा आहे, हें कांहींच ठाऊक नव्हतें!

पि०—छे, अशा बोलण्यानें एखादें नसतें अरिष्ठ अंगावर कोसळावयाचें!

दा०—हें काय विचारावें? धान्याचा आणि दारूचा गडावरील मोठा सांठा ह्मणतात, तो कोठें आहे, हें पांच सात असामीशिवाय कोणालाही माहीत नाहीं.—ही नेहमीं म्हणत असते कीं किल्ल्यांचा एक झुबका जवळ आहे, झालें! अधिकार नाहीं बिधिकार नाहीं.—मीं म्हणतों, पिलाजीराव, ह्या किल्लीनें तो दरवाजा उघडला आणि चिलमींतला एक निखारा जर तळघरांत फेंकून दिला,—तर एका क्षणांत गड जमीन दोस्त होईल.—पिलाजीराव, तुम्हीच सांगा, किती जबाबदारीचें हें काम आहे तें!

पि०—जबाबदारीचें म्हणजे! प्रतापरावांच्या—आमच्या सर्वांच्या—कारस्थानाचें नाक तुमच्या हातांत आहे. [हुजऱ्या येतो.]

हु०—दादासाहेबांना सरकारांनीं बोलावलें आहे, जसे असाल तसे येऊन चला म्हणून.

दा०—कोण कोण आले आहेत रे?

हु०—सरकार दवलतरावांपाशीं बोलत बसले आहेत.

द्या०—हो तूं पुढें; मी हा आलोंच. (रामराम करून हुजऱ्या जातो.)

दा०—प्रतापरावांना माझ्याशिवाय चैन पडत नाहीं; कसलेंही कारस्थान असो. 'दादासाहेबांना बोलवा'!—तुम्हाला नाहीं कां यावयाचें प्रतापरावांकडे ?

पि—हंबीरराव व मी नुकतेच त्यांची भेट घेऊन आलों.—हंबीरराव तेथेंच राहिले. आपली,—त्यांची,—गांठ घ्यावयाची होती, म्हणून मी येथें आलों.

ल०—आज येथेंच रहावयाचें म्हणून त्यांना आग्रह करावयाचा होता.

दा—पिलाजीराव, तुम्हाला आज येथें राहिलेंच पाहिजे; त्यांचा शब्द मोडणें केव्हांही चांगलें होणार नाहीं. आजच्या शिवाय, उद्यां-परवां,—केव्हां तुमच्या सोईला येईल तेव्हां,—रात्रीच्या मेजवानीला आलें पाहिजे.

पि०—दादासाहेब, मला कांहीं आमंत्रणाची जरूर नाहीं; मी घरचाच आहे.

दा०—गण्या—कोण आहेरे बाहेर—गण्या, चल, मला वाड्याकडे जावयाचें आहे.—मी आतां जाऊन येतों. (जातो.)

ल०—किती दिवस मुक्काम आहे ?

पि०—पांच किंवा सात दिवस.

ल०—हुद्दे तुळकरांचे जागीं मीच आहें म्हणून आतां कबूल केलेली-आठवण आहेका ?

पि०—ज्या गोष्टीकरितां ह्या देवपूरच्या स्वारींत कांचनगडापर्यंत तरी मी येतों, म्हणून हंबीररावांपाशीं हट्ट धरला, ती गोष्ट मी विसरेन असें तुला वाटतें काय?

ल०—पुरुषांचा काय नेम? आपले शब्द खरे केलेच पाहिजेत, असा निर्बंध पुरुषांना कोठें आहे? देवपुराहून परस्पर नाहींना आण्याचा विचार?

पि०—देवपूरला न जातां कांचनगडाहून विजापूरला परत जाण्याचा माझा विचार आहे. (किल्ल्या उचलून हातांत घेतो.)

ल०—तुम्हाला काय-विजापूरला परताल, देवपूरला जाल, किंवा कांचनगडला रहाल! स्वतंत्र आम्हां.—बायकांचें जिणंच वाईट; पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटाला कैदखान्यांत सुखानें दिवस कसे कंठावेत, हें शिकल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

पि०—ह्या गोष्टी बोलावयाला पुष्कळ अवकाश आहे.—दादासाहेब किल्ल्या एथेंच टाकून गेले आहेत.—माझ्या मनांत कांचनगडचें हें प्रख्यात तळघर पहाण्याचें फार आहे. चल जाऊं, दादासाहेब येण्यापूर्वीं तळघरांतून जाऊन येऊं. [जातात.]

अंक पहिला समाप्त.

अंक दुसरा.

प्रवेश १ ला.

स्थळ:---कांचनगड.

(प्रतापराव, दवलतराव व दादासाहेब बसले आहेत.)

द०---खानाचा वकील वेशीजवळ आला असेल नाहीं?

प्र०---दवलतराव, केव्हां एकदां तो वकील येतो आणि पादशाहाचें आम्ही कांहीं लागत नाहीं असें केव्हां त्याच्या तोंडावर सांगतों, असें मला झालें आहे.

द०---" आमच्यापासून खंडणी मिळणार नाहीं "--या पलीकडे त्याच्याशीं एक अक्षर देखील बोलूं नये; कारण पादशाहाशीं तंटा करितांना आमच्याचपैकीं कांहीं सरदारांना चिडविल्यासारिखें व्हावयाचें.

प्र०---वकीलाशीं आम्हाला जास्ती बोलण्याचें काय कारण?---ह्या वकील जर मुसल्मान असता तर त्याला गडावर देखील चढूं दिला नसता.--बाकी ह्या आतां येणाऱ्या राघोजीरावापेक्षां एखादा मुसल्मान वकील बरा.--याच वृद्ध कपीनें सरदारांना विजापुरास फसवून नेलें आणि सर्वांना सुळावर चढविलें. असा विश्वासघात करून विजयानगरच्या सरदारांचा बीमोड केल्याबद्दल हाच चोर पुढें बाबांच्यापाशीं प्रतिष्ठा मिरवीत होता!

द०---राघोजीरावासारिखा लोचट मनुष्य विजापूरच्या दरबारांत दुसरा कोणी सांपडेल असें मला वाटत नाहीं. मी एकदां त्याला रामराम

करावयाला चुकलों, तो जो माझ्या अंगावर गुरकावून आला! ह्याच्यासारिखा अभिमानी गृहस्थ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल, असें मला वाटलें; पण तिकडून एक दरबारांतला क्षुल्लक नोकर येत होता, त्याच्या पुढें स्वारी किती अदबीनें वाकली!—तुझ्यावर स्वार होऊन बाजारांतून मी हिंडणार, असें जर त्यानें म्हटलें असतें, तर आमच्या रावेजीरावांना स्वर्गसुख अनुभवल्यासारखें वाटलें असतें!

दा०—रावजीरावांची आणि माझी अगदीं लहानपणची ओळख.—कोणाचाही मनुष्य पुढें कसा निपजणार, हें त्याच्या लहानपणच्या लक्षणावरूनच समजतें. पादशहाचा वाकनीस ह्यानें पाहिला. कीं मी एखाद्या दिवशीं वाकनीस होईन, म्हणून ह्यानें म्हटलेंच. भालदार चोपदारांचा झगझगीत भडक पोषाख ह्यानें एक दिवस पाहिला, आणि बापाच्यापाशीं मला तसला पोषाख पाहिजे म्हणूनच रडत बसला!—जसें बीज तसा अंकुर. ह्याचा बाप म्हणजे काय विचारता, नबाबसाहेबांचे जोडे उचलावयास सांपडावें म्हणून धांवत सुटावयाचा!

प्र०—अहो, पूर्वी जाधवांचें राज्य कसें लयास गेलें? काल विजयानगरचा चक्काचूर कसा झाला?—तालिकोटचे लढाईचे वेळीं याच थेरड्या रावेजीरावानें, का रक्तपित्ती होऊन परवां मेलेल्या त्याच्या भावानें, दारूच्या पोत्यांत राख मिसळली, आणि विजयानगरावरून—आमच्या घरादारांवरून—गाढवांचे नांगर फिरविले.—रामराजाचें शीर स्वतः तोडून पादशहाला नजर करणारे हेच चोर आतां दरबारांत मोठ्या पदवीस चढले आहेत!—दवलतराव, बाबांनीं अगदीं मरतांना मला जवळ बोलावलें, आणि तालिकोटच्या लढाईची ही हकीकत सांगितली.—

विजापूरच्या किल्यांत कोंडून ठेवलेल्या रामराजाच्या बायकापोरांच्या किंकाळ्या मरणसमयीं बाबांना ऐकूं येत होत्या. त्या किंकाळ्या ऐक, म्हणून त्यांनीं मला बजावलें—तालिकोटचा सूड उगवीन, रामराजाच्या बायकामुलांना कैदेंतून सोडवून विजापूरास विजयानगरची गादी स्वाधीन, असें त्यांना त्या वेळीं मीं पुन्हा वचन दिलें—नंतर, पादशाहानें विश्वासघातानें मारलेले सरदार तुला आशिर्वाद देण्याकरितां आले आहेत, त्यांच्याकडे पहा, असें म्हणून बाबांची दृष्टी आकाशाकडे वळली.—दुवलतराव, 'तालिकोट' 'तालिकोट' म्हणून प्राण सोडणारे बाबा ह्या राण्याला गडावर चढूं देत आहे म्हणून रागावले असतील. —बाबा, या नराधमाच्या स्पर्शानें कांचनगडचा किल्ला बाटविण्याचा हा शेवटचाच प्रसंग आहे असें समजा.—घरच्या यजमानाला फसवून, पादशाहापासून लांच घेऊन, दिंडींतून दरवेडेखोरांना घरांत सोडणाऱ्या ह्या हरामखोरांना जाळून पोळून—हाल हाल करून—ठार मारण्याची वेळ आतां खात्रीनें आली (जासूद येतो.)

जा०—आली महाराज.

दु०—कोण आली रे?

जा०—विजापूरची मंडळी.

दु०—हंबीरराव वकिलाला घेऊन आले वाटतें.

प्र०—येऊं दे त्यांना आंत. (जासूद जातो.)

दु०—राघोजीरावाशीं विनाकारण रागानें बोलण्यांत कांहीं हांशील नाहीं.—आपल्याला आपल्या मतलबाशीं गांठ.

प्र०—मी त्याच्याशीं एक शब्द देखील बोलणार नाहीं. डाव-

पेचनें कसें बोलावयाचें तें तुम्ही मजकरितां बोला; मग तर झालें दुबळतराव?

द०— वकीला उठून खडी ताजीम दिली पाहिजे.

(रा. हं. व पि. येतात; द व दा. उठतात)

प्र०—(जाग्यावरून न उठतां) या हंबीरराव, या पिलाजीराव, या मंडळी बसा.

(राघोजी खेरीज सर्व बसतात.)

रा०—प्रतापराव, आपण दरबारांत वागलेले सरदार, तेव्हां आपणाला पादशहाकडून आज्ञापत्र घेऊन आलेल्या वकिलांचा मानमरातब कसा ठेवावा, हें माहीत नसेल असें मला वाटत नाहीं. पादशहाच्या तक्ताला जो मान द्यावयाचा, तोच मान पादशहाच्या आज्ञापत्राला दिला पाहिजे.

प्र०— प्रत्यक्ष पादशहा जर कांचनगडावर आला असता, तर त्याला जो मान मीं दिला असता, तोच मान मी पादशहाच्या थैलीला देत आहें— ह्यांत काय वावगें झालें?

रा०—हंबीरराव, माने, प्रतापरावांचें हें बोलणें नीट ध्यानांत धरावयाचें.—असलें उत्तर ऐकून कांचनगडावर क्षणभरही दुसरा वकील राहतांना.—माझ्या पांढऱ्या केंसाकडे बघून निदान तरी असें उद्धमपणाचें उत्तर आपण द्यावयाचें नव्हतें.

प्र० —आपण वयोवृद्ध आहां, ह्याकरितां आपल्या पायावर डोकें ठेवण्यास प्रत्येक तरुणानें तयार असलें पाहिजे; परंतु पादशहाच्या नोकरींत आपले केंस पांढरे झाले आहेत; त्यांचा कसला मान ठेवावयाचा!

रा०—प्रतापराव, पादशाहाबद्दल आपणास इतकी चीड वाटते तरी, पण प्रत्येकानें आपलें बलाबल पाहिलें पाहिजे. पादशाहाचें सैन्य त्यांची अक्कल, यांपैकीं एकाचा लवलेश तरी तुमच्यापाशी आहे काय? पादशाहाचें राज्य विजयनगरास होण्यापूर्वीं काय तुम्हां सदारांची स्थिति होती?—जाधवांनीं मान्यांचा अपमान करावा, मान्यांनीं भोसल्यांचा सूड उगविण्यांत गुंग असावें, चोहोंकडे फाटाफूट व दंगेधोपे!—अहो! हा पादशाही अंमल विजयानगरास सुरू झाला व लुटारू रामराजासारिख्या घुघुरट्यांना त्यानें चिरडून टाकिलें, म्हणून शांतपणानें भाकरीचे दोन तुकडे खावयास तरी मिळतात!—प्रतापराव, मी वयोवृद्ध आहे, तेव्हां तुम्हांला दोन गोष्टी समजून सांगण्याचा मला अधिकार आहे.—तुमच्या राजकर्त्यांच्या राहणीचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न करा, त्यापासून तुमचें कोट कल्याण होईल. पादशाहाप्रमाणें तुमच्या बायकांना पूर्ण गोषांत ठेवावयाला शिका, त्या शुद्ध राहतील, तुमचें बीज बिघडणार नाहीं. पादशाहाचे दरबारांत राहून पुष्कळ शिकण्यासारखें आहे. पादशाहाची प्रीती संपादून जें कांहीं मिळेल तें मिळवावें, ह्यांतच सुख आहे. आपल्या हाताशेजारचाच पदार्थ मिळविण्याविषयीं खटपट करावी, उगीच दूरवर नजर फेंकण्याची आमची योग्यता नाहीं.

प्र०—हरामखोरा, विश्वासघातानें विजयानगरास सुळावर चढविणाऱ्या मात्रामगन्या, नरपशो, कोणाला हें ब्रम्हज्ञान शिकवितोस?—हातांत कांकणें भरून बायका झाले असतील त्यांनीं हातांतील कांकणाकडे पहात उभे रहावें.—दूरवर नजर फेंकण्याची जाधवांची योग्यता नाहीं काय? अनामखान्यांत कोंडलेल्या बायकांचें कौतुक करण्यांत त्यांचें

आयुष्य गेलें, त्यांच्या डोळ्यांना लांबवर नजर फेंकण्याची शक्ति नसेल परंतु विजयानगरच्या वीरांनीं ह्या चोरांच्या लक्षावधी सैन्याला रणांगणावर दे माय धरणी ठाय करावयास लाविलेलें ज्यांच्या दृष्टीला अद्याप स्पष्ट दिसत आहे, पादशाही राज्यावर हल्ले करून विजयानगरास गोळा केलेल्या वैभवाची लकाकी ज्यांचे डोळे अद्याप विसरले नाहींत, त्या सरदारांच्या पुढें, जाधव कुळांतल्या पुरुषापुढें, जाधवांच्या गडावर उभे राहून, पातशहाच्या मर्दुमकीची स्तुती करावयाला तुम्हाला लाज तरी कशी वाटत नाहीं?—पादशहाच्या बायकांचे पोवाडे गाऊन आमच्या बायकांची नालस्ती करूं पाहतांहं!—तुमचा पादशहा, धिप्पाड शरीराचे तुमचे खान, नबाब, अमीर, उमराव, ह्यांच्या या थैलीला मीं कस्पटाप्रमाणें लेखिता.—(थैली घेऊन फाडून टाकतो.) जा, विजापूराला जा, आमच्या देशाच्या पैशावर चैन करणाऱ्या तुमच्या पातशहाला माझा साफ निरोप सांगा—प्रतापराव कांचनगडकर तुमचा अधिकार मानीत नाहीं!

रा०—प्रतापराव राघोजीरावांचा तुम्हीं अपमान केला आहे, पातशहाच्या विरुद्ध बंड करतां—

प्र०—कोण कोण विरुद्ध बंड करितो?—पादशहानेंच आमच्या विरुद्ध इतकीं वर्षें एकसारखी बंड फितुरी केली; आतां त्याला शिक्षा करण्याची वेळ आली आहे.—बंडखोरांना तुम्ही सामील झालेले—कसला तुमचा मान ठेवावयाचा?

पि०, हं० व दा०—प्रतापराव, जरा शांत व्हा; राघोजीरावांच्या वयाकडे पहा—

253686

प्र०—यांचें वयाकडे पाहतांना तालिकोटास यांनीं उभारिलेल्या पापाच्या पर्वताकडे नको का पहावयाला?—तालिकोटाची आठवण झाली कीं पापाची आग मस्तकाला जाते.—माझ्या डोळ्यासमोर हा मात्र-गमनी क्षणभरही नको.—चला—निघा—आतां एकदम कांचनगडावरून चालते व्हा.—चला—निघा—चोर—दगलबाज!— बादशहाचे देस्हारे मामविआरे लोक कांचनगडावर क्षणभर मग राहिले तर सर्व गड—कुजून—नासून—जाईल!—व्हा चालते—एकदम— [त्रि० हं० रायोजी जातात] बादशहाच्या तटाखालची मांजरें आम्ही यापुढें नसून, आमचे आम्ही पूर्ण स्वतंत्र झालों. दवलतराव विजयानगरचा झेंडा कांचनगडावर उभारा.—गुलामगिरी संपली, अपमानाच्या दुःखाचा शेवट झाला!

द०—प्रतापराव, आजच्या ह्या कृत्यानें आतां पासूनच आपण प्रत्यक्ष लढाईस सुरुवात केली!—सूर्याजीराव मोहीते व कटांतील इतर सरदार ह्यांना आतांच्या आतांच सर्व पत्रें लिहून स्वामीमहाराजांपाशीं मला दिली पाहिजेत.

प्र०—गुरुमहराजापाशीं पत्रें देतांना त्यांच्याजवळ जयाबद्दल आशीर्वाद मागा.—माझ्या शाहाजीला त्यांनीं आशिर्वाद दिला आहे. तुमच्याही शिरावर त्यांचा आशिर्वाद असू दे.—जा, महाराजाकडे जाऊन पत्रांचें सर्व काम आटपून लवकर परत या. (द० ब० दा० जातात.)

प्र०—(स्वगत) काय असेल तें असो, आज माझ्या मनाला जो आनंद वाटतो आहे, तसा आनंद पूर्वी कधींही वाटला नव्हता.—पूर्वी जाधवांचें राज्य बुडालें, पण जाधवांचें कूळ कायम राहिलें; आज

ज्या युद्धामुळें कदाचित जाधवांच्या घराण्याचीं पाळें मुळें पादशाहा खणून काढील, त्या युद्धाचा भार मी आज माझ्या शिरावर घेतला आहे.—अशा वेळीं माझ्या हृदयाला तळमळ लागून रहावयास पाहिजे होती;—परंतु कालच्याहून आज मी अधिक सुखी आहे, असेंच मला वाटतें.—विजापूरकरांनीं विजयानगरचें राज्य बुडविल्यानंतर पादशहाचे गुलाम होऊन सरदारकीचीं सुखं भोगण्यापेक्षां तरवाराच्या तीक्ष्ण धारेवर चालत जाऊन, सूड उगविण्याचा प्रयत्न करणें, जाधवकूळांतील पुरुषाला अधिक प्रियच वाटलें पाहिजे.-समरांगणावर मरण येऊन सर्व घराण्याचा नायनाट झालेला पतकरला, पण तुझ्या अधिकाराचें जड जूं आम्ही असें फेंकून देतों म्हणून पादशाहाला सांगण्याचा प्रसंग विजयानगरच्या सरदारांनीं आनंदाचाच मानला पाहिजे. (पडदा)

अंक २-प्रवेश दुसरा.

—:*:—

(स्थळः—कांचनगड. हंबीरराव येतो.)

हं०—कांचनगडचे लोक फार शहाणे असतील असें मला वाटलें होतें; पण प्रत्येक मनुष्य येथें मला राघोजीरावासारिखा मूर्ख दिसतो! इतर देवांच्या मूर्ति देवळांतून हांकलून लावून मोहनेच्या प्रतिमा कां हे लोक देवळांत बसवीत नाहींत?—रघोजीराव पादशाहाच्या स्त्रियांची तेवढी स्तुति करितो, आणि मोहनेविषयीं एक अक्षरही बोलत नाहीं, असें पाहण्याबरोबर प्रतापरावांनीं त्याला जागच्या जागीं ठार करावयास पाहिजे होता.—मोहनेसारखी स्त्री मिळाली असतांनां,

आनंदानें दिवस काढण्याचें सोडून ही बंडाची उठाठेव करावयाला या प्रतापरावाला सांगितलें आहे कोणी ?—खुळें सर्व खुळें !—विजयानगरची गादी जर पुन्हा स्थापावयाची होती, तर मोहनेच्या तोंडून तसा हुकूम आम्हा सरदारांना फरमावयाचा होता,—हजारों तरूण वीरांच्या तरवारी म्यानांतून एकदम बाहेर झळकल्या असत्या !—मोहनेच्या एका शब्दांत जो पराक्रम आहे,—अरे दवलतराव व पिलाजीराव आले ! मोहने संबंधानें इतका वेळ विचार करीत असल्यामुळें आनंदसागरांत पोहत असल्यासारखें वाटत होतें!—पुन्हा आतां मला ह्या मूर्ख मंडळीच्या रडकथा ऐकल्या पाहिजेत. (पि. व द. येतात.)

द०—काय हंबीरराव, सरकारवाड्याजवळ तुम्हाला गांठूं इतके तुम्ही पुढें गेला असाल, असें पिलाजीराव म्हणत होते, पण तुम्ही अजून येथेंच !

हं०—विचार करीत करीत चाललों होतों सावकास झालें.

द०—राघोजीराव कसा काय मनुष्य आहेस तुम्हाला वाटतें ?

हं०—पुरा आचरट आणि आणखी काय : दरबारची हीं म्हातारीं अशींच असावयाचीं!

पि०—काय ह्या म्हाताऱ्यांना वाटतें ईश्वरास माहीत – तरुण मंडळी दृष्टीस पडली कीं म्हातारपणाचा अधिकार सांगून, हे आपले उपदेश करावयाला लागलेच ! राघोजीरावानें प्रतापरावांना शिकविण्याचा आव घातला नसता, तर तेही इतके रागावले नसते.

द०—रागावले असते आणि नसते—त्याचा कांहीं नेम नाहीं. पाद-

शहाचा अधिकार केव्हां उगारून देईन असें त्यांना झालें होतें. मला हा प्रकार असाच व्हावयाचा. तुम्हाला काय वाटतें हंबीरराव !

पि०—आतां मीं तुम्हाला सांगितलें नाहीं कां असें केव्हां तरी व्हावयाला पाहिजेच होतें.—बरें आम्ही अगदीं दादासाहेब कोडाऱ्यांच्या घराजवळ आलों.—दवलतराव, मला दादासाहेबांच्याकडे गेलेंच पाहिजे.—खुद्द दादासाहेबांचा आणि आमच्या वडिलांचा अतिशय घरोबा, सख्या भावाप्रमाणें एकमेकांवर प्रेम;—शिवाय दादासाहेबांचें कुटुंब विजापूरचें-आमच्या नात्यापैकींच.-हंबीरराव, मी मग येतों सरकारवाड्याकडे. (हंबीररावास एकीकडे) मी जरा मुद्दाम म्हणून उशीर करीन,-आणि तोंपर्यंत प्रतापरावांना नक्की बेत कांहींच कळवावयाचे नाहींत.—बरें दवलतराव, मी तुमच्या बरोबर वाड्यापर्यंत येणार होतों हंबीररावांची तुमची गांठ पडली, मी लवकरच येईन. (द. ह. जातात) विजापूरास असतांना जर कोणी मला विचारलें असतें कीं हंबीरराव शहाणे आहेत का, तर मी उत्तर दिलें असतें, हंबीरराव मूर्ख कांहीं नाहींत; आतां मात्र मी खात्रीनें म्हणूं शकतों, हंबीररावासारखा दुसरा मूर्ख सांपडावयाचा नाहीं ! परवां मोहना त्यांच्याशीं दोन शब्द कोठें बोलली, तेव्हांपासून तर यांना मोहनेचें पक्कें खूळ लागलें आहे.—मोहनेमुळें हा पुरा वेडा झाला तर तें मला पाहिजेच आहे.—विजापूरच्या दरबारांतल्या माझ्या मोठपणाच्या वाटेंतला हा कांटा परस्पर मोहनेनें काढून टाकला तर माझें आयतेंच कल्याण होईल!—प्रतापरावाचें शीर पादशहास नजर करून मोठी जहागीर मिळविण्याचे वेळीं तेथें हंबीरराव मला बिलकूल नको.—असो—माझा मतलब साधण्याकरितां प्रथम मला लक्ष्मी आपलीशी केली पाहिजे.—ही हिराबाई लक्ष्मी मुठींत सांपडल्यावर

कांचनगडच्या चिंध्या चिंध्या करावयाला काय उशीर!—बरें कांचनगड आम्ही धुळीला मिळविला, आणि बक्षीस मात्र खानानें पादशहाकडून उपटलें तर?—आम्हीच होऊन खानाची कत्तल केली तर कसें?—कोणी तरी आरब जिवंत उरणार; शिवाय माझेच लोक पादशहापाशीं चुगली केल्याशिवाय कोठले रहावयाला!—छे, पिलाजीराव पादशहाची वजिरी संपादण्याचा हा मार्ग नव्हे.—कसें बरें?—प्रतापरावानेंच खानाला लोळ विलें पाहिजे, एरवी बस्तान बसत नाहीं. अरे, मी दादासाहेबांच्या वाड्यांत तर आलों!—ह्या चौकांत तर कोणी दिसत नाहीं!—गण्या, गण्या, दादासाहेब आहेत कारे आंत?—(पडद्यांत—सरकार वाघाकडे गेले आहेत.) वयनीसाहेब काय करीत आहेत? (पडद्यांत—तुळशी कट्याकडे आहेत—असें समोर जा.)

(पडदा वर जातो.—लक्ष्मी तुळशीची पूजा करीत बसली आहे. पिलाजीराव मागें जाऊन उभा राहतो.)

ल०—भगवान् परमेश्वरा, कांचनगडावरील ह्या कैदखान्यांतून ह्या गरीब अबलेला लवकर सोडीव.

पि०—तुझ्या इच्छेप्रमाणें लवकरच घडून येईल, परंतु—

ल०—(उठून) कोण ते? —पिलाजीराव!—खरोखर तुम्ही देवाप्रमाणें आलां,—आणि माझ्या इच्छेप्रमाणें घडवून आणणें तुमच्या ताब्यांतही आहे.

पि०—हो, माझ्या ताब्यांत आहे; पण ताब्यांत आहे म्हणजे काय? माझी इच्छा आहे, शक्ति नाहीं; म्हणूनच मी आशिर्वाद देतांना 'परंतु' म्हणून ठेविलें आहे.

ल०—पिलाजीराव, मी तुळशी पुढें उभी आहें, अगदीं खरें खर सांगतें,—तुम्ही जेव्हां 'तुझ्या इच्छेप्रमाणें लवकरच घडून येईल' म्हणून म्हटलें, तेव्हां माझ्या नवसाला देव पावला, असेंच खरोखर मला वाटलें.

पि०—नवसाला देव पावो, अगर न पावो, उद्यां संध्याकाळीं किंवा परवां सकाळीं विजापूराकडे जाण्याचा मी विचार केला आहे.

ल०—म्हणजे?—तुम्ही आपली माझी थट्टा करतां झालें!—इतक्यांत लढाईला प्रारंभ होईल, अशी तर गुप्त बातमी आज सकाळीं मला कळली.

पि०—या कारस्थानची बातमी दादासाहेबांनीं आपणास ताबडतोब दिली वाटतें!—तुम्हांला दरबारी बातम्या सांगतात तेव्हां दादासाहेबांचें आपल्यावर फार प्रेम आहे.—मग तुम्ही कसच्या विजापूरला येणार?

ल०—ज्यांच्यावर माझें प्रेम आहे, त्यांच्याबरोबर मी येतें म्हणतें, ह्यांत काय वावगें आहे?—माझी आपली वेडी समजूत होती, तुम्ही आणि हंबीरराव गडावर राहावयाला याल, आणि मग लढाई संपल्यावर—

पि०—आपापल्या गांवीं निघून जाल.

ल०—मला बरोबर घेऊन.

पि०—पंचाईत आहे ती येथेंच. तुला नेण्याकरितां तर विजापूर सोडून मी येथें आलों. पण कालपासून ज्या गोष्टी घडून आल्या त्यामुळें तुला एथून नेणें दुरापास्त झाले आहे.

ल०—तें का? आतांच कसें दुरापास्त झालें?

पि०—तें कसें झालें,—हें तुला सांगावयाचें म्हणजे माझ्या

मनांतील सर्व गुप्त बेत तुला सांगितले पाहिजेत; पण दादासाहेबांप्रमाणें एकदम बायकांवर विश्वास टाकावा, असें पिलाजीरावास वाटत नाहीं.

ल०—ह्या तुळशीवृंदावनांतील बाळकृष्णाचे पायावर हात मारून मी शपत वाहतें, आपण जें मला सांगाल तें मी कोणाशींही बोलणार नाहीं.—पिलाजीराव, सुखाची आशा दाखवून दुःखाचे डोहांत लोटून देण्याइतके कठोर होऊं नका.

पि०—सुखाची आशा मी दाखविली खरी, पण आतां दुःख कसें आलें, तें ऐक.—प्रतापराव खंडणी देण्यास नाकबूल आहे, ही गुणगुण आम्हांस विजापूरींच समजली होती. कांचनगडास आल्यावर लढाई होणार हें मला पूर्वींच स्वप्न पडलें होतें.—कांचनगड आम्ही सर करूं,—मग कांचनगडावरील लक्ष्मी माझी झालीच पाहिजे,—असा माझा त्यावेळीं अंदाज होता. पण आतां सर्वच पारडें फिरलें. हंबीरराव प्रतापरावांना मिळाले; मी खानाचा पक्ष सोडला नाहीं, तरी माझ्या हाताखालचे लोक हंबीररावाचे विरुद्ध लढण्यास केव्हांही तयार व्हावयाचे नाहींत. तेव्हां ह्या लढाईत खानाचा हा आपला पराभव व्हावयाचाच.

ल०—आपणही हंबीररावाबरोबर कांचनगडावर यावयाचें होतें.

पि०—तसें केलें तरी तुला येथून पळवून नेणेंच अशक्य आहे. शत्रूचा गड बऱ्याच मोठ्या हुद्देदाराची बायको, तुझ्या देवडीवर नोकर— कशी तुला पळवून न्यावयाची? तेव्हां मी विचार केला—ह्या वेळीं एकदम विजापूरला जावें आणि व्यूहाची बातमी पादशहाला द्यावी.

ल०---आणि माझी सर्व आशा नाहींशी करणार ना?--(जवळ जाते. पि० दूर होतो) येथें कोणी यावयाचें नाहीं,--तुम्ही आला म्हणजे तुळशीकड्याकडे तुम्हांला पाठवून द्या, व इकडे कोणी येऊं नका, अशी माझी सक्त ताकीद होती;--शिवाय सर्व चाकरमाणसें माझ्या विश्वासाचीं आहेत.---पिलाजीराव, कसेंही करा आणि मला आपणाबरोबर विजापूरला न्याच.---उद्यां रात्रीं काळोखांत तुम्ही मला नेली तर?

पि०---न्यावयाची कशी? रात्रीच्या दादासाहेबांचा तुझ्यावर पहारा, तुझ्या घराबाहेर पहारा, शिवाय गडाच्या वेशीचा दरवाजा बंद,---तीन अडचणी आहेत

ल०---तीन कांहीं खऱ्या नाहींत, एक खरी. दादा साहेबांना थोडकाशी जास्ती दारू झाली म्हणजे गाढ झोंप येते, शिवाय दारावरचे पहारेकरी निशा करीत नाहींत, असं कांहीं नाहीं.

पि०--- मी असा विचारच केला नव्हता.--कसें म्हणतीस?--हो, आहे साधण्याजोगें--पाहूं विचार करून--ठीक.---दादासाहेबांनीं मला उद्यांच रात्रीच्या मेजवानीला बोलाविलें आहे नव्हे?

ल०--- होय, जरा जास्ती प्यावयाला लावा म्हणजे झालें.

पि०---उद्यां मेजवानीच्या वेळेला मी सांगेन तसें जर करावयाला तयार असशील,--

ल०---अगदीं जसें सांगाल तसें.--पिलाजीराव, बायका निश्चयी व साहसी असतात.--तुम्ही सांगाल त्यांत काडीभरही चूक व्हावयाची नाहीं.

पि०---लक्ष्मी, माझ्या मनांत आतां एक अशी युक्ती आली

आहे, ती जर साधली, तर विजापूरास असतांना ज्या गोष्टी घडून येतीलसें वाटत होतें, त्या सर्व गोष्टी अजून घडून येतील. तूं जर मी सांगेन तसें ऐकशील, तर अजून कांचनगडावरील सर्व सरदारांना विजापूरच्या कैदखान्यांत आडकवीन, तुला बरोबर घेऊन मोठ्या थाटानें विजापूरांत प्रवेश करीन, आणि पादशाहाला तुझ्या नावांची मोठी जहागीर तोडून द्यावयास लावीन.—लक्ष्मी, दादासाहेबांचें कांहीं झालें तरी होऊं दे, असें ह्मणण्यास तयार आहेस ना?

ल०—पिलाजीराव, आपणाशिवाय जगांत कोणचें कांहीं झालें तरी मला त्याची कांहीं काळजी नाहीं.—तुळशीवर हात ठेवून मी सांगतें कीं आपण जसें सांगाल तसें वागण्यास मी तयार आहें.

पि०—बरें—उद्याचा बेत मी सांगीन तसा ठेवला पाहिजे. सरकार वाड्याकडे जाऊन येऊन तुला काय तें सांगतों. (पडदा)

अंक २—प्रवेश तिसरा.

स्थळ—(कांचनगडावरील बाग)

(मोहना व चंपा येतात.)

मो०—स्वामीमहाराज केव्हांग सोनगडाला जाणार आहेत?

चं०—आतां इतक्यांत निघाले देखील असतील.—नानासाहेबांना देण्याकरितां मीं तलवार आनंदापाशीं दिली, त्याच्या पूर्वींच दवलतरावांनीं सर्व पत्रें महाराजांपाशीं दिलीं होतीं.

मो०—तलवार आनंदापाशीं दिलीस, त्या वेळीं बाबांना सांगावयाला माझा निरोप सांगितलास ना?

चं०— हो, आनन्दाला मी सांगितलें, बाबासाहेबांना सांगा, छोटे सरकारांच्या हातांत ही तलवार खेळावयाला दिली म्हणजे, त्यांना नजर चुकवून इकडे तिकडे जाऊं देऊं नका म्हणून.

मो०—अगदीं बजावून असें सांगितलेंस ना!--काय बाई त्या दिवशीं त्यानें केलें!–अगदींच हट्ट धरून बसला, म्हणून त्याच्या हातांत जरा ती तलवार दिली. कशी गुलामानें माझी नजर चुकविली! किती हुडकला, कांहीं केल्या सांपडेना!--ह्या येथेंच येऊन बसला होता नाहीं चंपे?–ह्याच पारिजातकाच्या फांद्या त्यानें तलवारीनें त्या दिवशीं तोडल्या;–छे छे बाई! काय उच्छाद करीत असे!—आतां त्याला ती तलवार झेपेल नाहीं?

चं०—हो, आतां छोटे सरकार तेवढे मोठे नाहीं का झाले?

मो०—हो, अगदीं ठीक होईल. सोनगडाहून जेव्हां मी परवां आलें, तेव्हां मला कितीदां बजावून सांगितलें–तेवढीं माझी तलवार मला पाठवून दे.—चंपे, मामांजींची ती लहानपणची तलवार आहे.–माझ्या मनांतून दसऱ्याचे मुहूर्तानें तिकडून शहाजीचे हातांत द्यावयाची होती.–वाडिलोपार्जित तलवारबहाद्दरीच्या धंद्याची श्री गगिरवितांना त्याच्या त्या प्रारंभीच्या लीला पाहण्याचें या मोहनेच्या नशिबीं नाहीं; आणि तलवार कशी धरावी हा पहिल्या दिवशीचा धडा स्वारीपासून शिकण्याचें त्याच्याही नशिबीं नाहीं.

चं०—मग बाईसाहेब दसऱ्यापर्यंत वाट कां नाहीं पाहिली? आजच कशाला ती तलवार पाठवून दिली.?

मो०—आजच कां पाठवून दिली, कांहींच सांगतां येत नाहीं. माझ्या मनाला वाटलें झालें,—ही लढाई सुरू होणार आणि लढाईत बरें वाईट काय होतें कोणाला माहीत! दुसरा कोणी बघितला आहे? द्यावी झालें आजच तलवार पाठवून.—त्याच्या सरदारीच्या बाण्याचा आरंभ पाहण्याचें माझ्या नशीबी कदाचित नसेल, पण आईनें माझी एवढी देखील हौस पुरविली नाहीं—असें नको व्हावयाला.—चंपे या लढाईचा मी विचार करूं लागले म्हणजे माझ्या मनाला कसेसेंच वाटतें!

चं०—असें कां बाईसाहेब? एकटा मेला तो खान काय करणार आहे?

मो०—पण मला असें कां वाटते, हें समजत नाहीं. पण वाटतें खरें.—स्वारीच्या उतावीळपणाला आळा घालणारे कोणी आहे का येथें? बाबा ह्या वेळीं येथें असते म्हणजे बरें झालें असतें. स्वामीमहाराज निघून गेले, बाबांना असालतसें निघून या म्हणून निरोप पाठवायाचा होता माझ्या मनांतून; आणि हें पत्र देखील बाबांना देण्याकरितां लिहून ठेविलें होतें.

चं०—मग बाईसाहेब मजपाशीं कां दिलें नाहींत? मी आनंदापाशीं किंवा स्वामीमहाराजांपाशीं दिलें असतें.

मो०—देणार होतें;—पण म्हटलें लढाईच्या कारस्थानांत बायकांनीं ढवळाढवळ करणें चांगलें नाहीं; शिवाय बाबांना दुवलतरावांनीं लिही-

लेल्या पत्रांत, सैन्यानिशीं लवकर या असें लिहिलेंच आहे; तेव्हां असाल तसे लवकर या म्हणून लिहीणें जरा गैरच नव्हे का?

चं—गैर कसलें बाईसाहेब? दोन्हीं पत्रें त्यांना पोंचतील, आणि मग त्यांना योग्य वाटेल तें ते करतील.

मो०—असें एकदां मनाला वाटतें.—पण आतां काय त्याचें? स्वामीमहाराज गेले असतील. (पडद्यांत 'नारायण, नारायण, नारायण'.) कोणग?—ह्या कड्यापलीकडून आवाज ऐकूं येत आहे.—पाहूं चल —हे पहा स्वामीमहाराज नुक्ते वेशीच्या बाहेर पडून गड उतरूं लागले आहेत.

चं०—मजपाशीं पत्र द्याल, तर आतां इतक्यांत मी त्यांना गांठीन.—ते कांहीं जलदीनें जात नाहीं आहेत.

मो०—हें पत्र घे. (पत्र देते.) आणि हा हारही घे (हार देते.) स्वामीमहाराजांच्या चरणावर हा हार ठेव, व त्यांना विनंती कर—म्हणाव—एवढें पत्र बाबांना द्यावयाला मोहनेनें दिलें आहे.—कसें लीनतेनें त्यांना सर्व सांगशील.—जा लवकर—झटपट पाय उचल.

(चंपा जाते.)

मो०—(स्वगत)—ह्या लढाईचा परिणाम चांगला होणार नाहीं—असें मला कां बरें वाटावें?—असें वाटतें एवढं खास, पण माझें मला कांहीं कारण सांगतां येत नाहीं. कांचनगडच्या पायथ्याला विजापूरच्या सैन्याचा तळ पडला व हंबीरराव ह्या सैन्यांतले मुख्य सरदार आहेत, असें ऐकिलें,—त्या वेळीं माझ्या पोटांत धस्स झालें होतें!—विजापूरची पा-

बुशाही बुडवावी—असें इक्कडच्याप्रमाणें हंबीररावांच्याही मनांत नसेल कशावरून?—पण—यमुनेशीं हंबीररावांची अशी वर्तणूक कां?—हिरव्या महालांत मला धरावयाला धावले त्या वेळसारिखा पोषाख हंबीरराव इतक्या भक्तीनें कां वापरतात? तो हिरवा पोषाख पाहून परवां मी दचकलें. अगबाई!—हें काय मी पहात आहे!—हंबीरराव येथें कसे आले?—आणि परवांच्याच हिरव्या पोषाखात!—मजकडेच येत आहेत!—परवां यमुना तरी जवळ होती.—त्यांना पाहिलेंच नाहीं असें करून ह्या वेलीच्या आडून फुलझाडांतून निघून जावें.—(जाऊं लागते)—हा काय बाई चमत्कार!—मी ह्या बाजूला वळलेली पाहून तेही ह्या बाजूलाच वळले— ह्यांना चुकवून जाण्याची कांहीं आतां सोय नाहीं.

[हंबीरराव येतो.]

हं०—(जवळ जाऊन). मोहने, तुझी एकटीची गांठ घेण्याचा प्रयत्न करतां करतां आज तो योग जुळून आला.—भिवून दूर जाण्याचें कांहीं कारण नाहीं.—मोऱ्यांच्या वाड्यांतील हिरव्यामहालांत तुझीं आर्जवें करून तुला भिवविणाऱ्या हंबीररावांत व आजच्या हंबीररावांत पुष्कळ अंतर आहे.

मो०—त्या दिवशीची मजविषयींची पापबुद्धि तुमच्या मनांत नसल्यावर, वहिनीला भाऊजींचें भय वाटण्याचें कांहीं कारण नाहीं.

हं०—निष्कपट निर्मळ प्रेमाला जर पापबुद्धि हें नांव मिळालें तर, प्रेम ही स्वर्गीय वस्तु आहे असें म्हणतात, तें खोटेंच म्हणावयाचें?—मोहने, माझी भीति—

मो०—कांचनगडावर असतांना जाधव कुळांतील बायकांना कोणाचीही भीती बाळगण्याचें कारण नाहीं.

हंबी०—कांचनगडावर असो किंवा नसो. मोहनेला हंबीररावापासून केव्हांही भीति बाळगण्याचें कारण नाहीं.—आराध्यदेवता आपल्या भक्तांच्या पूजेची केव्हांही भीति बाळगीत नाहीं.

मो०—हंबीरराव हे शब्द कोणापुढें उच्चारीत आहां?—विजापूरच्या पादशाहाचे विरुद्ध जो सरदारांचा कट झाला आहे, व ज्या कटांत तुम्ही सामील अहांत, त्या कटाचे मुख्य सरदाराचे बायकोपुढें असले शब्द उच्चारितां काय?—हें पाप—

हं०—लोकदृष्टीनें मी पाप करीत असेन, पण असें बोलूं नको तर मग करूं तरी काय?—आज सहा वर्षें झालीं, पादशाहानें कोणच्या तरी स्वारीवर जा, म्हणून माझी नाहीं तीं अर्जें केलीं असतील;—पण लढाईला जाण्याचा हुकूम झाला कीं ज्या हंबीररावांना आनंदाची भरती येत असे, रणांगण ज्यांना रंगमहालाहून अधीक प्रिय वाटे, त्याच हंबीररावानें आज सहा वर्षांत म्यानांतून तलवार कशी ती बाहेर काढिली नाहीं!—मोहने, तुला पहावयाला सांपडेल, तुझ्याशीं दोन गोड शब्द बोलावयाला मिळतील, एवढ्याच करितां कांचनगडची कामगिरी पतकरली, एवढ्याच करितां जाधवांचे कटांत सामील झालों.

मो०—तर मग जाधवांचे कटांत साधूचें रूप घेतलेले आपल्यासारखे काळसर्प आहेत म्हणावयाचें?

हं०—जाधवांचे कटांत मला काळसर्प करणें, किंवा साधु करणें,

तुजवर अवलंबून आहे.—माझ्यावर दया करावीशी वाटती—असे अमृताचे शब्द बोल, आणि तुझ्या बंद्याला हुकूम कर,— मोहने सहा वर्षांपूर्वीं हंबीररावाचें अंगांत जें शौर्य खेळत होतें तें सर्व आज उसळीसरसें पुन्हां दिसूं लागेल; म्यानांतून तलवार इतक्या जोरानें बाहेर पडेल कीं, त्या झटक्यासरशीं शेंकडों वर्षांचा तिचा गंज नाहींसा होईल.—माझे गुण हिऱ्याप्रमाणें चमकाविणें, मोहने, तुझ्या स्वाधीन आहे; किंवा मला गारगोटी प्रमाणें कवडीमोल करून टाकणें, हेंही तुझ्या हातीं आहे.

मो॰—हंबीरराव,— मोहना म्हणजे विजापूरच्या बाजारातील एखादी स्त्री आहे असें तुह्माला वाटतें काय? हंबीरराव, मला तुमचें भयही वाटत नाहीं—आणखी कितीही घाणेरडें बोलला तरी मी त्याची पर्वाहि करीत नाहीं.—माझें तुम्हाला सांगणें इतकेंच आहे, तुमची बायको यमुना सद्गुणी आहे, रूपवानही आहे; तिचें प्रेम संपादण्याचा जर तुम्ही प्रयत्न केला, तिला आनंदी करण्याचा जर नाद धरिला, तर गारगोटीप्रमाणें कवडीमोल होण्याचें तुम्हाला कांहीं कारण नाहीं. तुम्हींच विजापूरची पादशाही बुडवाल, तुम्हींच विजयानगरचे राजपुत्रांना पुन्हा तक्तावर बसवाल, तुमच्या धर्माला लागलेली काळोखी तुम्हींच पुसून काढाल, तुमची कीर्ती हिऱ्याच्या तेजाप्रमाणें चोहोंकडे फांकेल, व यमुनेचे मुलगे सवाई हंबीरराव होऊन तुमचें नांव अजरामर होईल.

हं॰—नाहीं, मोहने, नाहीं,—ह्यापैकीं कोणचीच गोष्ट घडून येणें शक्य नाहीं.—यमुनेशीं लग्न लाविल्यानें तुझें वेड कमी होईल, असें

मला त्या वेळीं वाटलें; पण लग्नाच्या अक्षता माझ्या मस्तकावर पडल्या असतील नसतील तों माझा मला पश्चाताप झाला.- यमुना तुझी मैत्रीण आहे, यमुना सद्गुणी आहे, रूपवान आहे,—सर्व मी कबूल करितों; पण लग्न झाल्या दिवसापासून आज पावेतों हंबीररावानें तिला मातेप्रमाणेंच पाळिलें आहे.—मोहने, यमुनेनें आज सहा वर्षें जीं दुःखें सोसलीं, व ह्या दुःखांत ज्या सद्गुणानें तिनें दिवस काढिले,—त्याचा जर विचार केला,—तर देवलोकांतही तिची योग्यता सर्व स्त्रियांहूनही कांकणभर ज्यास्तच ठरेल. पण मी तरी काय करूं?—माझा नाइलाज आहे. तुझ्याच चरणीं मी सर्व प्रेम कां अर्पण करितों. व यमुनेशीं बोलायाला मजपाशीं प्रेमाचा एकही शब्द कां नाहीं,—ह्याचें कारण मी काय सांगू? दरबारांतील माझी पदवी मला जड वाटते, धर्मसेवा मला तुच्छ वाटते,—

मो०— हंबीरराव, तुम्ही कोठें आहां काय आहां, याची तुम्हाला शुद्ध नाहीं वाटतें?—वेड्यासारखें असें काय बरळतां?

हं०—माझा वेडेपणा मला दुसऱ्यांनीं दाखविण्याची जरूरी नाहीं —मोहने, तुझ्या प्रेमानें मी खरोखरच वेडा झालों आहे.—तुझ्या मोहक मुर्तीशिवाय इतर वस्तु जेव्हां डोळ्यापुढें मांडतों, तुझ्या प्रेमाच्या धुंदींतून मनाला जागें करून जेव्हां इतर गोष्टींचा विचार करू लागतों, त्या वेळी मोहने, झंझावात सुटला असतां दर्याची जी स्थिति होते तशी माझ्या मनाची अवस्था होते;—माझ्या अंतरात्म्याचा मुख्य आधार काढून घेतल्यामुळें जीव व्याकूळ होऊन शरीर कोसळून पडतें आहेसें वाटतें.

मो०—हंबीरराव, मला जाऊंदे,—माझी वाट सोडून दूर व्हा.—

भलत्या वेडेचारांत सुख मानण्यापेक्षां ईश्वर भजनीं जर वेळ घालविला असतां,—

हं॰—माझा परमेश्वर तूं—तुझ्या भजनीं लागल्यानेंच पुण्यांची जोड—

मो॰—हंबीरराव,—वाट सोडा.—पतिव्रतेचा राग भयंकर असतो,—

हं॰—माझा सोक्षमोक्ष केल्याशिवाय, नाहीं, मोहने तुला मी—

मो॰—काय?—हंबीरराव तुम्ही मला अडविणार? हा मोऱ्यांचा हिरवा महाल नव्हे.—सरका मागें मुकाट्यानें—(वाट सोडतो—जाऊं लागते.)

हं॰—मोहने, जऊं नको; मी तुझ्या हुकुमाबाहेर नाहीं.—मोहने—मोहने—अरे मी किती मोठ्यानें ओरडत आहे!-माझें बोलणें मोहेने शिवाय दुसऱ्या कोणी तरी ऐकलें नसेलना?—नाहीं कोण आसपास तर दिसत नाहीं.—मोहनेनें ' हंबीरराव मागे सरा ' म्हणून ताकाद दिली—आणि माझ्या शरीरानें आपोआप तो हुकूम मान्य केला,—आणखी वेड काय लागावयाचें उरलें आहे?—मोहना आपलीशी करण्याची जी मसलत पिलाजीनें मला सांगितली, त्या मसलतीचे विरुद्ध धडधडीत आज मी वर्तन केलें.—माझें प्रचंड सैन्य आतां असून नसून सारखे; पिलाजीसारखे मसलती मुत्सद्दी असून नसून सारखे. —मोहने, तू माझी व्हावीस म्हणून आजपर्यंत मी खोट्या मार्गानें जात होतों; आतां खऱ्या खऱ्या प्रेमानें तुला आळविण्याशिवाय मार्ग नाहीं. (पडदा)

अंक दुसरा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—कांचनगड.

(दवलतराव प्रवेश करितो.)

द०—चोहोंकडे सगळा घोटाळा झाला आहे.—हा पिलाजी बावळ्या आहे का खऱ्या कळकळीचा मनुष्य आहे, कांहींच समजत नाहीं. कटांत अगदीं पहिल्यापासून असावा, तसावागूं लागला आहे! हंबीररावानें परवां वचन दिलें, त्यावेळीं माझ्या मनाला पुष्कळ आधार वाटला. पण काल रात्रीं चंपेनें येऊन मजकूर कळविला, तो अगदींच निराळा!—प्रतापरावांच्या लग्नापूर्वी हंबीररावानें मोहनेला मागणी घातली होती खरी; पण त्यावेळेचें वेड अद्याप कायम असेल, असें मला नव्हतें वाटलें.—अरे, वहिनीसाहेब आणि चंपा बागेंतून इकडस येत आहेत. त्यांची गांठ घेऊन प्रतापरावांकडे जावें, हें बरें. (मोहना व चंपा येतात.)

चं०—बाईसाहेब, ते पहा दवलतराव इकडसच येत आहेत. दरबाराला जात आहेत वाटतें. त्यांच्या कानावर सर्व मजकूर मी घातलाच आहे; आपण एकदां— (दवलतराव जवळ जाते.)

मो०—दवलतराव, चंपेनें सर्व हकीगत तुम्हाला कळविलीच आहे.

द०—हंबीररावांचें दांडगाईचें वर्तन मला कळलें; पण चंपेनें हंबीररावाचें पारिपत्य कोणच्या प्रकारचें करावयाचें, तें सांगितलें नाहीं.

मो०—हंबीररावांना शिक्षा करण्यास तुम्ही समर्थ आहां,—सगळें खरें,—पण तिकडच्या कानावर जर हा मजकूर गेला, तर त्यांना आज किती वाईट वाटेल!—दवलतराव,—हंबीररावांना शासन करण्याच्या उद्योगाला आजच लागले, तरकेवढा भयंकर प्रसंग गुदरणार आहे, हें मलों समजतें. हंबीररावांच्या ह्या वेडगळ प्रयत्नांनीं आमचें एकमेकांवरचें प्रेम उलटें दुणावत नाहीं काय?—हंबीररावाची मोहनेला काडीचीही भीती वाटत नाहीं. दुसऱ्या कोणच्याही प्रसंगीं मीच होऊन स्वारीपाशीं हंबीररावाला शासन करण्याच्या गोष्टी काढिल्या असत्या.—पण दवलतराव, तुमची ही बहीण दुर्दैवी आहे.—ह्या वेळीं काय करावें हें समजत नाहीं.—दवलतराव, तुम्हांला कळलेली हकीगत तिकडे कळवूं नका; हंबीररावांना शासन करण्याचें आज मनांत आणूं नका.

द०—हंबीररावांची एवढी प्रतिष्ठा ठेवण्याचें आम्हांला कारण दिसत नाहीं. परवां आमच्या कटांत ते मिळाले एवढचें. पण ते मिळाले जरी नसते, तरी आमचें मोठेसें नुकसान होणार होतें असें थोडेंच आहे.—दहा बारा दिवसांत पायथ्याला असलेल्या शत्रूचा सैन्यासभोंवतीं कटवाल्यांचा गराडा पडेल, अशी मी योजना केली आहे.

मो०—पण सैन्य येऊन दाखल होण्यास अद्याप दहां बारा दिवस अवकाश आहे ना? मोहनेमुळें हंबीरराव व पिलाजीराव जर उद्यां उघड बिथरले, तर कांचनगडाला येणाऱ्या सर्व खिंडी रोखून नाहीं का बसावयाचे, व विजापूराजवळ असणाऱ्या कटांतील सरदारांना ताबडतोब कैद नाहीं का करणार?

द०—वहिनीसाहेब, मला ह्या गोष्टी समजतात, पण हा आमचा

सर्व खटाटोप मानासाठीं—अब्रूसाठींच—चालला आहेना? हंबीररावांनीं असा अपमान केल्यावर स्वस्थ बसणें आमच्या कीर्तीला कधींही शोभावयाचें नाहीं.

मो०—मला जें भय वाटत होतें तें हेंच.—ज्या योगानें तिकडचे बेत सिद्धीस जाण्यास जरा तरी विघ्न होईल, ती गोष्ट करण्यास मोहना कधींही रुकार देणार नाहीं.—मान, अब्रू, हीं कशीं राखावींत हें मला समजतें;—व सत्वाकारितां मरावें लागल्यास मोहना मोठ्या आनंदानें मरण्यास तयार होईल.—दवलतराव, व्यूहांतल्या मंडळींचें सैन्य येईपर्यंत हंबीररावांसंबंधानें तिकडे एक अक्षरही काढूं नका.—मात्र हंबीररावांवर विश्वास ठेवल्यामुळें कसलाही दगा होऊं नये, एवढा बंदोबस्त तुम्ही ठेवा.

द०—हंबीररावावर विश्वास ठेवण्याचें आतां नांवच नको.—आम्हीं तुम्हाला कटांत घेत नाहीं, असें त्यांना आठ दहा दिवस न कळविल्यास कांहीं फायदा होईल खरा, पण—

मो०—पण बिण कांहीं नाहीं.—अशा वेळीं, दवलतराव, एक शब्दही ह्यांतला तिकडे बोलावयाचा नाहीं. (जासूद येतो.)

जा०—सरकार आपली वाट पहात आहेत.

द०—कोठें आहेत प्रतापराव?

जा०—ह्या पलीकडच्या तांबड्या चौकांत.

मो०—दवलतराव—मी सांगितलेलें ध्यानांत धरावयाचें बरें!—चंपे, चल तांबड्या चौकाच्या जाळीपाशीं आपण बसूं, म्हणजे दवलतराव काय बोलतात तें ऐकावयास सांपडेल. (पडदा)

अंक ३ रा प्रवेश दुसरा.

(प्रतापराव दवलतराव व पिलाजी बसले आहेत.)

प्र०—दवलतराव, मान्यांनीं मसलत मोठी उत्तम काढिली आहे. मला फार पसंत पडली.—हंबीरराव म्हणत होते माने मोठे कल्पक आहेत म्हणून, तें अगदीं खरें आहे.

द०—अशी मसलत ती कोणची?

प्र०—दुसरें कांहीं नाहीं. खानाचे चार पांच हजार सैन्य आहे, या सर्वांची आजच्या रात्रीं कत्तल करावी —विजापूरच्या पादशाहीचीं पाळेंमुळें खणून काढण्याच्या महत्कार्याला प्रथमची आहुती पांच हजाराची तरी दिली पाहिजे. पादशाही सैन्याची अशी कत्तल केल्याशिवाय तालिकोटचा सूड उगविल्यासारखें होणार नाहीं.—दवलतराव, छापा घालण्याची ही संधी व्यर्थ दवडूं नये.

द०—मग कसें माने? तुमचे आणि हंबीररावांचे मिळून दहा हजार इसम आहेतच; आज रात्रींच्यारात्रीं हें काम उरकीत असलां तर माझी कांहीं ना नाहीं.

पि०—(स्वगत) माझ्याच तंगड्या माझ्या गळ्यांत अडकवावयाला पाहतो आहे चोर!—पण प्रतापरावांचें मनांत मीं निराळेंच भरवून दिलें आहे ह्याला कोठें माहीत आहे!

द०—माने, विचार कसला करीत आहां?

प्र०—मी सुद्धां त्यांना तेंच म्हणत होतों; पण त्याचें असें होतें; खान म्हणजे सर्वांवरचा मुख्य, तो खरा मालक, अशी सर्व सैन्याची

समजूत आहे; तेव्हां कांहीं कांहीं लोक आयत्या वेळीं हुकूम तोडतील व खानाला जाऊन मिळतील.

पि०—हें पहा,—दवलतराव,—सैन्यांतल्या पांच दहा मुख्यांशिवाय इतरांना आमच्या कटाची कांहींच बातमी नाहीं.—कांचनगडाशीं लढावयाचें, अशीच सर्व सैन्याची समजूत आहे. तेव्हां एकाएकीं रात्रीं भलतेच हुकूम सोडल्यास सर्व घोंटाळा होईल.—शिवाय तुमच्यापाशीं अगदीं मोकळ्या मनानें बोलावयाचें म्हणजे, तुम्हीं पादशहाशीं उघड लढाई देण्यास प्रारंभ केला आहे;—आणि आमची दुष्मानगिरी अद्याप गुप्त आहे.—तुम्ही उघड शत्रु आहां, तुम्हाला छापा घालण्यास किंवा कांहींही करण्यास हरकत नाहीं.—मैदानावर उघड झुंझाझुंझीस सुरवात होऊं द्या, आम्ही तुम्हास येऊन मिळतो. किंवा छापा घालून खानाला नाहींसा करा, मग उजळ माथ्यानें तुम्हाला येऊन मिळण्यास आम्हास हरकत नाहीं.

प्र०—हो,—तें बरोबर आहे.—दवलतराव, असें करूं—गडावर दोन हजार लोक ठेऊं, पायथ्याला एक हजार असूं द्या, आपण दोन तीन हजार खालीं मैदानावर जाऊं आणि ह्या सर्व चोरांना देऊं आमच्या तरवारींना पहिले बळी!

पि०—हं—असें केलें म्हणजे झालें.—सहज काम होणारें आहे. —आपलें पंधरा हजार सैन्य आहे, ह्या घमेंडीवर खान नेहमीं गाफीलच असतो.

द०—सगळें खरें,—पण प्रतापराव, खालीं शत्रूचें सैन्य पंधरा हजार आहे, हें विसरतां कामा नये.

पि०—शत्रूचें सैन्य पंधरा हजार!—दवलतराव, मला, मान्यांना, जाधवांच्या पिढीजाद नोकरांना, शत्रू समजता हं! हंबीररावांनीं व मी फुकट फुकट तुमच्या देखत आणा शपथा घेतल्या म्हणावयाच्या!—दवलतराव, तुमच्याप्रमाणें आम्हालाही वाटतें, पादशाहीचा नाश करून विजयानगरचें तक्त पुन्हा स्थापावें, पादशहाचे अमीर उमरावांना लाथाबुक्या मारून उत्तरेस हांकलून द्यावें, लक्षावधी हिंदूंची त्यांनीं कत्तल केली, ह्याचा सूड उगविण्याकरितां त्यांच्या नरडीचीं हाडें कडाकड फोडावींत!—दवलतराव, तुम्हाला तेवढा धर्माचा अभिमान आहे आणि आम्ही बाकीचे सर्व बायका असें मानूं नका.—प्रतापराव, पादशहाची आजपर्यंत नोकरी केली, ह्या नरकवासांतून बाहेर पडण्याची संधी मिळत असतां, आम्ही त्यांतच लोळत पडत राहूं, इतके आम्हाला नीच निलाजरे समजूं नका.—विजापूरचे गादीपुढें केसभरही मान वांकविली नाहीं. अशी प्रौढी मिरविण्या इतकें पुण्य आमच्या पदरांत नसेल, हें मी कबूल करितों;—पण, जे महात्मे आहेत, प्रतापराव, तुमच्या सारिखे पुण्यशील योद्धे आहेत, त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून आम्हीं गेलें पाहिजे, हेंही न समजण्याइतके आम्ही खात्रीनें पापी नाहीं.

द०—माने, तुमच्यावर माझा विश्वास नाहीं, असें तुम्हाला वाटतें तरी कसें?—तुम्हीं आम्ही एक आहों; कटांतील बारीक सारीक गोष्टी सुद्धां मी तुह्माला सांगितल्या नाहींत का?— माझें म्हणणें इतकेंच कीं कोणतीही गोष्ट करावयाची ती, कोणी दगल-

बाजी करील कीं काय, आयत्या वेळेला फशीं पडूं कीं काय,—या सर्व गोष्टींचा विचार करूनच केली पाहिजे.

पि०—द्वलतराव, तुमचें मन साफ नाहीं, हें उघड उघड दिसतें आहे. तुमच्या मनांत कांहीं तरी किंतू आला आहे.—द्वलतराव, मी तुम्हाला असें विचारतों, खानाच्या छावणीमध्यें आणि आमच्या छावणींत कोस दीड कोसाचा अंतर आहे, हें तरी खरें ना?—आमच्या छावणींत कांहीं हालचाल झालेली तुह्माला दिसल्यास खानाला जाऊन आम्ही मिळेतोंपर्यंत गडावर चढण्यास तुम्हाला अवकाश मिळेलना?—बरें गडावरून अगदीं खालीं उतरेतोंपर्यंत आमच्या छावणींत कांहीं हालचाल होती कीं काय,—हें तुम्हाला तुमचे हेर सहज सांगतील. कीं नाहीं?—द्वळतराव, विश्वासघात करण्याचा आमचा इरादा जरी असला, तरी ह्यांत तुम्हाला कोणचा धोका आहे?—फार झालें तर छापा साधावयाचा नाहीं, इतकेंच.

प्र०—हो इतकेंच.

पि०—द्वलतराव,—तुमच्या मनांतील संशय नाहींसा करण्याकरितां आम्हीं इतक्या गोष्टी करण्यास कबूल आहों.— मी व हंबीरराव, तुम्हीं गडावरून खालीं उतरण्या पूर्वीं आज रात्रीं गडावर येऊं;—आणि वेशीवरच्या पहारेकऱ्यांना सक्तीचे हुकूम सोडा,—गडावरून बाहेर जाणाऱ्या प्रत्येकास पाहून सोडावें;—व हंबीररावांना व पिलाजीरावांना तुम्हीं विजयी होऊन परत येईतों खालीं जाण्याची मनाई करा.—द्वलतराव, आम्ही दोघे ओलीस

राहतों.—माझ्या बोलण्यांत खोटेपणा नाहीं, हें सिद्ध करण्यास ह्या शिवाय मजपाशीं दुसरा मार्ग नाहीं.

द०—प्रथम कडू, मागून गोड असलेलें बरें.—पिलाजीरावांनीं सांगितली अशी अक्षरशः व्यवस्था झाल्यास माझा तुमच्या मसलतीस रुकार आहे.

प्र०—माने, तुमच्या म्हणण्याप्रमाणें आज रात्रीं छापा घालण्याचा बेत ठरला.—तुम्हां दोघांना ओलीस ठेवावयाचें हें मला कांहीं पसंत नाहीं. परंतु आमच्या दवलतरावांचें असें आहे, गुरूंनीं जसा उपदेश केला, त्या कायद्याबरहुकूम सर्व गोष्टी झाल्याच पाहिजेत. तेव्हां त्यांच्याकरितां तुम्हाला त्रास सोसावा लागणार. (पडदा.)

अंक ३-प्रवेश तिसरा.

—:*:—

(स्थळ कांचनगडावरील रस्ता. दादासाहेबांचे दोन नोकर प्रवेश करतात.)

पहिला—आज धनीसाब अक्शी लई खूस झाल्याती—हें बघ इनाम (रुपयादाखवून) घ्यायायाला.—तुला म्हणतूया दादासाहेबांच्या तैनातीला बस म्हणून.—आमच्या फडाच्या संमद्यासनी आज दारूची लूट—बस बस बाईसाहेबांच्या तैनातीला बस—आज तुमच्या फडाल एक थेंब गवसला तर पठ्याच नव्ह.

दूसरा—आम्ही बाईसाहेबांच नोकर काय भीकार व्हय?-दारूची भीक मागावयास कोण दांत इचकत हाय तुझ्याजवळ—चल जा एक

रुपयाच दिमाख दावतुया—ही बघ मोहोर ही बघ पुतळीं—बाईसाबाची-तैनात उगच नाहीं.—म्हतार माणसांत आन तरण्यांत रुप्याच सोन्याच अंतर हाय!—तुझं दादासाब रूप अक्शी कथील—आमच्या बाइसाब—ह्येबी सोन—हेबी सोन !

पहिला—आज बाई लई खूस दिसत्यात?—काय रंग काय है काय?

दुसरा—विजापूरच सरदार पिलाजीराव आज ताटाला याच हैती! —बाइसाबाच्या घरचं माहेरचं हैती!—समद्यांनीं आज खायची काय प्यायाची काय लूट कराबी—ह्येबघ अक्शी गरीबावानी नाहीं दावायाच आज—सरिमंताच्यांत बहीन पडलीया अस पिलाजीराव मान्यांना दिसलं हाव !

पहिला—सासुरची सीरमंती दावणार बाईसाहेब—आलं ध्येनांत आलं—मग आम्हासनी कांहीं—

दुसरा—चल आज काय कमती,—रुपडा लाव कडोसीला—आज हाच पठ्या संमद्यासनीं दारूची आंगोळ घालणार. (जातात.)

अंक ३—प्रवेश चौथा.

—:*:—

स्थळ—कांचनगड

(पिलाजीराव व हंबीरराव येतात)

हं०—पिलाजीराव. तुमच्याबरोबर मी येथपर्यंत आलों खरा; पण पुढें न जातां एथूनच खालीं परतावें, असें मला वाटतें.

पि०—हा काय भलताच विचार!–आणि अशा वेळीं, अशा ठिकाणीं!-आम्ही गडाच्या विजापूर दरवाज्यापाशीं आलों.–प्रतापराव व दवलतराव वेशीच्या आंतल्या अंगाला आमची अगदीं वाट पहात असतील.–हंबीरराव, गड जढून वर आल्यावर, तुम्हाला परतावेंसें वाटतें तरी कसें?

हं०—मी तरी काय करूं? पिलाजीराव, माझें पाऊलच पुढें पडत नाहीं.–असें करूं कां तसें करूं–ह्याचा विचार करण्याचा मला अधिकारच उरलेला नाहींसा वाटतें.–कोणी तरी गुप्तपणें माझ्या जीवाला मुठींत गच्च दाबून धरिलें आहे–आणि ह्यामुळें माझ्या शरिराला तो खेंचून पाहिजे तिकडे नेत आहे!–मोहनेला आवडणार नाहीं असें कायसेंसें मी करीत आहे, असें मला वाटतें!

पि०—(स्वगत)पुन्हा पिशाच्चानें घेरिलें. (उघड) हंबीरराव,–मोहनेला आवडावयाचें नाहीं, असें कायसें तुम्ही करीत आहां, असें तुम्हाला सांगितलें तरी कोणी?–मी म्हणतों, हंबीरराव, मोहनेला एकदां तुम्हीं आपल्या ताब्यांत घ्या, अशाच रीतीनें कां मला जिंकलेत, तसेंच कां वागला, एक शब्दानें जर तिनें तुम्हाला विचारिलें, तर माझें नांव बदलून ठेवा.–मोहनेच्या मनांत मात्र थोडकें तरी तुमच्याविषयीं प्रेम पाहिजे; आणि तें आहेच.

हं०—आहेच कशावरून ?— माझ्या आपल्या मनाला तसें वाटतें झालें.—आमच्या पूर्वजन्मीच्या पापामुळें आमची आज तांटातूट झाली आहे.–पण आंतला खरा प्रकार पाहिला तर ती माझ्या

करितां आहे, व मी तिच्याकरितां आहे, अशीच ब्रम्हदेवाच्या घरची मूळची योजना असली पाहिजे.—पण एकदां असें वाटतें, कदाचित हा मला भ्रम झाला नसेल कशावरून ?

पि०—छे, छे, असा भ्रम व्हावयाचाच नाहीं.—ज्या गोष्टी उघड दिसत नाहींत, व ज्यासंबंधानें मनाला संशय वाटतो, त्यासंबंधानें थोर पुरूषांच्या मनाची जी प्रवृति होईल, तीच खरी, असें कवींनीं लिहून ठेविलें आहे.——माझ्या अंतःकरणाला खरें खरें काय वाटतें सांगूं ? हंबीरराव आणि मोहना——हीं नांवें देखील एकमेकांशीं कशीं जुळून दिसतात !—अशी जोडी कोठेंच सांपडावयाची नाहीं !— आणि तिच्या कृतीवरून असेंच दिससें.

हं०—वा ! काल तर मला ती झिडकारून निघून गेली !

पि०—हंबीरराव, पूर्वी मोऱ्यांच्या वाड्यांत हिरव्या महालात मोहनेला धरावयाला तुम्ही धावला होता, आणि काल ही तुम्हीं तिचीं आर्जवें करण्याचा प्रयत्न केलांत;—दोन्ही वेळची हकीगत तुम्हीं मला सांगितली आहे.—चिडलेल्या नागिणीप्रमाणें त्या दिवशींसारखी ती तुमच्या अंगावर काल चवताळून आली का ? तुम्हीं मोठे पराक्रमी व्हावेंत—हिऱ्याच्या तेजाप्रमाणें तुमची कीर्ति चोहोंकडे पसरावी- असें तिला कांहो वाटतें ?—शिवाय मी तुम्हांला असें विचारतों,—मोहनेला अशा रीतीनें तुम्ही चिडविल्यावर, प्रतापराव, दवलतराव अद्याप आम्हावर विश्वास ठेवितात—ह्यांतले इंगित काय बरें असावें ?—अहो, दुसरें काय ? तुमच्यावर तिची प्रीती आहे, म्हणून कोणापाशीं कांहीं कालच्याबद्दल बोलली नाहीं !

हं०—मग काल माझ्यापाशीं प्रेमाचा एक शब्द तरी का बोलली नाहीं?

पि०—हंबीरराव, तुम्हाला स्त्रियांचा स्वभाव कसा असतो, तें माहीत नाहीं.–प्रेम आहे असें त्यांनीं बोलून दाखवावयाला नको; आणि ज्या मानी आहेत त्या प्राण गेला तरी तसें बोलून दाखवावयाच्या नाहींत.–स्त्रिया शौर्यावर कर्तबगारीवर लुब्ध झाल्याच पाहिजेत.–मोहनेला प्रथम आपल्या ताब्यांत घ्या, तुमच्या मनांत प्रेम किती ओतप्रोत भरलेलें आहे तें तिला दाखवा,–मग तुमच्याशीं कशी गोड गोड कुजबुजायला लागेल ती पहा?–हंबीरराव, ही पहा वेस आली; मंडळीं आंत सर्व तयार आहेत.—चला आंत जाऊं या.–माझा आज रात्रीचा बेत साधूंदे, उद्यां नाहीं तर परवां रात्रीं मोहना तुमच्या महालांत आली म्हणून समजा.–चला.

हं०—पिलाजीराव, कड्यावरून मला आणि मोहनेला मी खालीं लोटून देतों आहेसें मला वाटतें! —काय होईल तें होवो, मी तुमचा हात धरून उडी घेतों.–मोहनेची आणि माझी गांठ घालून देण्याचें काम आतां सर्वस्वी तुमच्यावर आहे.

(पडदा वर जातो. प्रतापराव, दवलतराव सैन्यासह उभे आहेत.)

द०–प्र०–या हंबीरराव, या पिलाजीराव.

प्र०—आमची सर्व तयारी आहे.–तुम्ही येण्याबरोबर हरहर महादेव करून वेशींतून बाहेर पडावयाचें, असा संकल्प करून आम्ही येथें उभे आहों.—तुम्हाला जरा उशीर लागला!

पि०—छावणींतून निघावयालाच उशीर झाला. सैन्यांतल्या मुख्य पांच सात असामींना एकीकडे बोलावून, त्यांना सर्व मजकूर सांगून, आमच्या सैन्याचा बंदोबस्त कसा ठेवावयाचा तें ठरवून,—सगळें आटपावयाला जरा उशीर झाला.—तुमची मात्र तयारी जय्यत आहे.

प्र०—असें ठरविलें आहे, दीड हजार लोकांनीं छाप्याच्या कामावर जावयाचें व हजारांनीं गडाच्या पायथ्याचें संरक्षण करावयाचें. तेव्हां दवलतराव म्हणूं लागले आपण छाप्याची कामगिरी पतकरणार, मी म्हणूं लागलों तें काम माझें आहे, तुम्ही आपले पायथ्याचें संरक्षण करीत उभे रहा. अखेरीला आम्हीं दोघांनीं छाप्यावर जावयाचें ठरलें, व आम्ही परत येईतोंपर्यंत, ह्या रंभाजीरावांनीं पायथ्याचें संरक्षण करावें, व ह्या संताजीरावांनीं गडाचें संरक्षण करावें असें ठरलें आहे.

पि०—एकंदरींत आम्हीं दोघांनीं संताजीरावांचे हुकमतींत असावयाचें.

प्र०—हुकमतींत कसले! आणि तुम्ही ओलीस तरी कसले! रामराम मंडळी; आम्ही आतां वेशींतून खालीं उतरतों. (सैन्यास उद्देशून) वीरहो, विजापूरच्या पादशाहीचीं पाळें मुळें खणून काढून, तालीकोटाचे लढाईचे वेळीं विजयानगरला लागलेली काळोखी धुवून काढण्याची तुम्हीं प्रतिज्ञा केली आहे.—वीरहो, रामराजाचें शीर तालीकोटच्या लढाईपासून अद्याप विजापूरच्या वेशीवर टांगलेलें आहे. —तें रामराजाचें शिर नव्हें,—तुमच्या विजयानगरचें, तुमच्या धर्माचें तें शीर आहे!—यवनांची चांगली कत्तल करून, लढाईत यश मिळवून या चोरांना तुडवीत तुडवीत जर विजापूरच्या वेशीला तुम्हीं धडकला,—तर राम-

राजाचें तें शीर, तुमच्या धर्माचें तें शीर, अद्याप सजीव होईल, व रामराज्याच्या नेत्रांतून अजून ही आनंदाश्रू वाहू लागतील.—वीरहो, रात्रंदिवस कित्येक वर्षे सतत लढत राहून, आदीलशाहीस डबघाईस आणून, विजयानगरची कीर्ती नर्मदेच्या पलीकडे नेणारे तुमचे वाडवडील होते.—थोडे दिवसापूर्वी, विजयानगर स्वतंत्र असतांना, विजयानगरचा घोडा आज पूर्व समुद्रावर तर उद्यां पश्चिम समुद्रावर, असे, वीरहो, तुमच्याच शौर्याबद्दल, तुमच्याच धाडसाबद्दल, व तुमच्याज भरारीबद्दल, सर्व लोक पोवाडे गात होते!—सरदारहो, तुमच्यावर कोपलेल्या भवानीला जर तुम्हाला संतुष्ट करावयाचें असेल, तुम्हाला सदोदीत यश मिळावें म्हणून हातांतील तलवारींना जर तुम्हाला प्रसन्न करावयाचें असेल,—तर आमच्या शत्रूंना, ह्या विजापूरकरांना, तुमच्या तलवारीस प्रथमचे बळी देण्याकरितां मजबरोबर चला.—बोला, हरहर महादेव.

(हरहर महादेव अशी गर्जना करीत सर्व सैन्य प्रतापरावामागून जातें.)

द०—संताजीराव, हे दोन सरदार तुमच्या ताब्यांत आहेत. कांचनगडावर पाहिजे तिकडे फिरण्यास यांना परवानगी आहे; पण कांचनगडच्या खालीं माझा स्वतः-चा हुकूम पुन्हां होईतों जर हे गेले, तर प्रथम तुम्हाला तोफेच्या तोंडीं जावें लागेल.—पिलाजीराव, हंबीरराव, तुम्हीं ओलीस आलां आहां, तुमच्या तरवारी तुम्ही संताजीरावांचे स्वाधीन आतां केल्या पाहिजेत.

हं०—तालीकोटची लढाई झाल्यावर, विजयानगरच्या सर्व सरदारांना शस्त्रें खालीं ठेवा ह्मणून पादशाहानें हुकूम केला;—पांच वर्षांचा बच्चा असतांनाही त्यावेळीं ह्या हंबीररावानें तलवार खालीं ठेवली नाहीं,—

पि०—(हंबीररावास एकीकडे) मोहनेंकरितां-हंबीरराव-मोहनेकरितां (हंबीररावाची तलवार घेऊन) संताजीराव, ह्या घ्या तलवारी.

द०–संताजीराव, मी जातों आतां सैन्याबरोबर.–कोणाच्या पापबुद्धीनें, कोणाच्या महत्वाकांक्षेनें, जरआमच्या मूळ कामाला धोका बसला, तर त्याचें पाप संताजीराव तुमच्या माथीं बसेल.-सर्व वेशीवर सक्त पहारा ठेवा; वहिनी साहेबांच्या महालाच्या पहाऱ्यावर दहा निवडक गडकरी अधिक ठेवा. संताजीराव तुमच्यावर सर्व गोष्टी सोंपवून आम्ही खालीं जात आहों.–वहिनी साहेबांना भेटा, आणि त्या सांगतील त्याप्रमाणें, आणखी कांहीं नवीन व्यवस्था ठेवावयाची असेल, तर ठेवा. (जातात.)

अंक ३–प्रवेश पाचवा.

—:*:—

स्थळ—कांचनगड.

(पिलाजीराव माने येतो,)

पि०—दवलतरावानें आपल्याकडून खूप कारस्थान केलें !–हंबीररावांच्या दांडगाईच्या वर्तनाविषयीं मोहना दवलतरावापाशीं खात्रीनें बोलली असली पाहिजे, आणि आमच्याशीं कोणच्याही प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं, असा त्याचा सकाळचा बेतही दिसला.—पण आम्ही दोघे ओलीस राहतों म्हणण्याबरोबर, स्वारीच्या तोंडाला पाणी सुटलें.–खानाच्या सैन्याला आयतें लोळवावयाला सांपडतें !—आम्ही दोघे ओलीस !–धोका नाहीं कांहीं नाही !—विजयी होऊन परत आल्यावर, आम्हांस कटांतून हांकून द्यावयाला, किंवा कैदेंत

टाकावयाला, किंवा आमच्या सैन्यावर छापाही घालण्यास हरकत नाहीं!–दवलतराव मनांत म्हणत असेल, आज मी अतिशय वस्तादगिरीनें वागलों.—पण मान्यांच्यापाशीं पासष्टावी कळा आहे, हें त्या बिच्याऱ्याला कोठून ठाऊक असणार? (पडद्यांत कलकला.) मी दादासाहेबांच्या घरापाशीं तर आलों.–हे देवडीवरचे नोकर यथेच्छ मद्य पिऊन झिंगत बरळताहेत.–हा तर बंदोबस्त लक्ष्मीनें सांगितल्याप्रमाणें चांगला ठेविला! (हातांत मद्यपात्रें घेऊन तीन पहारेकरी येतात.)

पि०—दादासाहेब काय करीत आहेत रे?

प०—कोण तू दादासाहेब का त्यो दादासाहेब का ह्यो दादासाहेब?

दु०—अरे तूंच दादासाहेब.—दादासाहेबासनी आणखी कांहीं शिंगबिंग असत्यात व्हय? अक्शी,—असच पित्यात गट गटा.

ति०— व्हय व्हय असंच पित्यती अक्शी,–पण त्यो दादासाहेब व्हायाला त्येला ती फटाकडी राणी कोंठे आहे दारू भरून घ्यानी घेयाला? उगाच वाटच्या वाटसराला दादासाब म्हणावं खुळ्यावाणी?

प०—कोणाला म्हणतुया खुळा? लई झाली वाटतं!—मी दादासाहेब नवं व्हय?–तूंच माझी फटाकडी राणी, चल राण्यांना काय तोटा, असा मर्द असतांना? चल, मथुरेच्या बाजाराला जाईन म्हणतो, तुला लाल साडी आणीन म्हणतो,—

दु०—पी पी शिंगोटा, घाली पिंगोटा–

पि०—दारू पिऊन काय पाहिजे तें बरळत आहेत!— कायरे, दादासाहेब काय करीत आहेत?

प०—दादासाहेब आमच कीं धणी

दु०—त्या वाणी नाहीं होणार कुणी

ति०—राजा तो कीं माजूम दारूचा
प०—पूर आला झालारे उंचीचा
दु०—कशाचा कशाचारे कशाचा
ति०—दारूचा दारूचारे दारूचा
सर्व०—पूर आला झाला रे उंचीचा
प०—गळीं बांधुनि माजूमाची वडी
दु०—दारूच्या पुरीं घेऊं आम्ही उडी
ति०—पोट फुगे परी न येऊं वरी
सर्व०—जिजू जिष्णू जैसा जीरसागरीं (जातात.)

पि०—बरे खुलले आहेत! लवकर शुद्धीवर येण्याची मुळींच भीती नाहीं.—आतां आत जावें.

(पडदा वर जातो. दादासाहेब दारू पीत आहेत, व लक्ष्मी जवळ उभी आहे.)

दा०—एकसारखी दारू पिण्याचा मीच काय तो मक्ता घेतला आहे वाटते? तू पी—तू पी—

ल०—मी घेतलें एक दोन पेले,—पुरे झाले तेवढे मला.—पिलाजीराव आल्यावर आणखी घेईन.—आतां कशाला?

दा०—तांटे होण्याबरोबर पिलाजीराव बाहेर गेले हंबीररावाकडे ते अजून कसे आले नाहींत!—निम्में अधिक संपलें वाटतें. (पेला घेतो.) छे—तूं घेच.—बायकांनीं किती दारू प्याली पाहिजे ह्याची सीमा आहे ठाऊक आहे का तुला?

पि०—(पुढें होऊन)—पुरुषांच्या दुप्पट.—होयना दादासाहेब?

दा०—या या या.—बसा बसा बसा.—प्या प्या प्या.—(पे

पुढें करितो.)—तुम्हाला यावयाला उशीर लागला—आणि मला तर अतिशय तहान लागली,—म्हणून केलें हें काम सुरू तुम्हीं येण्यापूर्वींच.—हें ध्या.

पि०—आपण एक ध्यावयाचा.—(दादासाहेब हातांत पेला घेतो.) —त्यांना नको का एक तरी ?

ल०—मी दोन तीन घेतले आहेत. बायकांनीं अधिक घेऊं नये.

दा० पि०—काय त्याला होतें ? (सर्व पितात.)

पि०—बायकांनीं पुरुषांच्या दुप्पट दारू पिण्यास कांहीं हरकत नाहीं.

दा०—छे—त्यांचें प्रमाण निराळें आहे. (पेला झोंकून) तरुणीनें इतकें मद्य घेतलें पाहिजे कीं, तिचे डोळे तांबडे लाल होऊन चमकूं लागले पाहिजेत.—आणि ती मदिरेक्षणा पायांत घुंगूर बांधून नाचत नाचत जर पेला घेऊन पुढें आली—(नाचूं लागतो.)

पि०—(लक्ष्मीला) दादासाहेबांना आता जो पेला देशील, त्यांत एवढी पूड टाक, म्हणजे ते लवकर बेशुद्ध होतील.

दा०—(नाचतां नाचतां) थैयथयें नाच झाला पाहिजे.—काय सांगूं पिलाजीराव ?—तिच्या हातांतला तो पेला पाहिला,—एक पाऊल जमिनीला टेकतें न टेकतें तो दुसरें उचललें ,—असा पायाचा ठेका धरून,—शरीर—अशी लवे तशी लवे—असें पायाच्या नाचावर झेलून धरूं लागली,—आणि तो तोरड्याचा आवाज कानांत काशिरला,—किती गोड गोड धुंदी येते म्हणून सांगूं ?—तिचें पाऊल चपल जसजसें जलदी उठावयाला लागतें, तसतसा; शरीरांत बांधून ठेविलेला जीव आहे का नाहीं, तो बंधनें तोडून तिच्याकडे उड्या

मारीत जातो. (जाग्यावर जाऊन बसतो. लक्ष्मी पेला पुढें करते.) आणि ती जवळ आली, आणि तिच्या नाजुक बांध्याचा डोल होऊं लागला, म्हणजे जिवाला पाळण्यांत ठेऊन गोड स्वरानें गाणीं म्हणत, कोणी झोंपा काढिते आहेसें वाटतें.—आणि तिच्या बोटांना हळूच हात लावून (लक्ष्मीच्या हातांतला पेला घेऊन) पेला घेतला,—आणि प्याला—(पितो) गोडच झोंप—साखर झोंप—झोंप. (बेशुद्ध होतो.)

पि०—चल, लक्ष्मी, चल, आतांपासून तूं माझी झालीस.—ह्या थेरड्याची तुझ्यावर आतां काडीचीही सत्ता उरली नाहीं.—(पेला हातांत घेऊन तिच्याजवळ जातो) सुंदरी,- प्रेमाच्या अस्सल अर्कानें भरलेल्या ह्या पेल्याचा मी तुला पहिल्या भेटीचा नजराणा देतों.—मी तुला हें मद्य प्यावयास देत नाहीं,—प्रेम—निव्वळ—प्रेम.—सुंदरी, माझा स्वीकार करण्यापूर्वी ह्या माझ्या नजराण्याचा स्वीकार केलाच पाहिजे.

ल०—महाराज, तुम्ही मला कायशी महत्वाची कामागिरी सांगणार अहांना? त्याची आठवण नाहींशी झाली वाटतें !

पि०—तूं माझी झालीस—हा विचार मनांत येण्याबरोबर—सर्व गोष्टी विसरून गेलों होतों.—अजून आह्मी कांचनगडावर आहों—अजून तूं खरी माझी झाली नाहींस —पण तुझ्या हातून काम फत्ते होणार—याबद्दल शंकाच नाहीं.—तू हें प्रेमासाव घेतल्यानंतर कामगिरीचा विचार.

ल०—पण महाराज, मी जर मद्य फार प्राशन केलें तर माझ्या हातून काम पार पडणार नाहीं.

पि०—छे! मी मघाशीं सांगितलें नाहीं कां, बायकांनीं पुरुषांच्या दुप्पट दारू प्यावी, तोंपर्यंत कांहीं हरकत नाहीं.—मदिरेचा प्रत्यक्ष



ालाजी—चल, लक्ष्मी चल, आतांपासून तूं माझी झालीस.—ह्या थेरड्याची तुझ्यावर आतां काडीचीही सत्ता उरली नाहीं.

(पान ७६)

अवतार तूं, तुला हे मद्य काय करणार आहे ?-बरें, पुरुषाइतकी तरी बायकांनीं दारु पिण्यास हरकत नाहीं—तूं निम्मा पेला घे, मी निम्मा घेतों.—(घेतात.) लक्ष्मी, चल आतां अगोदर ह्या महलांतून बाहेर पडून भुयाराकडे जाऊं. (दादाहेब निजलेल्या जागेपुढें पडदा.) कांचनगडावरून खालीं आमच्या छावणींत माझ्या तंबूत तुला केव्हां घेऊन जाईनसें मला झालें आहे.—बरें, तुला सकाळीं सुचविलें होतें तसें केलें आहेस का?

ल०—हो, अगदीं सांगितल्याप्रमाणें तजवीज ठेविली आहे. भुयारांत जेथें दारवेचीं पोतीं भरून ठेविलीं आहेत, तेथपासून जिन्याच्या तोंडापर्यंत एक पोतें दारू पसरून ठेविली आहे.—आणि एक लहानशी पिशवी वर आणून त्या दारापाशीं ठेविली आहे.

पि०—आण पाहूं ती.—(आणावयास ल० जाते) सांगत असाल तर प्रत्यक्ष नवऱ्याच्या उरांत खंजीर देखील खुपसते म्हणणारी ही साहसी अवदसा, मीं नाचवीन तशी खात्रीनें नाचणार !—शिवाय आतां मद्य प्याल्यानें धुंदीही तिच्यावर बेताची आली आहे.

(लक्ष्मी दारूची पिशवी घेऊन येते)

पि—(पिशवी हातांत घेऊन) दमट बिमट कांहीं नाहीं.—ही दारू तेव्हांच पेट घेईल.—भुयारांतलि सगळी दारू अशीच कोरडी आहे ना?

ल०—हो, अशीच कोरडी आहे.—दमट बिमट कांहीं नाहीं.

पि०—लक्ष्मी, मी आतां जसें सांगीन तसें करण्यास जर काडीभरही चुकली नाहींस तर प्रतापरावांना मातीस मिळवितों,—तुला माझी पट्टराणी

करून तुझा अपमान करणाऱ्या मोहनेस तुझी दासी करितों.—कांचनगडच्या महालाची तुझ्या नांवाची पदशाहाकडून जहागीर करून देतों—

ल०—आपण माझा स्वीकार केला म्हणजे मला जहागीर मिळाली, सर्व कांहीं मिळालें.

पि०—नीट लक्ष लावून ऐक.—दारूच्या कोठाराच्या दारापासून वाड्याच्या अगदीं बाहेरच्या दरवाजापर्यंत, ही दारू अशी एका ओळीनें ओतून ठेव.—आणि पेटलेला काकडा घेऊन माझ्या खुणेची वाट पहात बैस.—मी आतां जातो.—गडावरून निसटून जाण्याची माझी सर्व तयारी झाली, म्हणजे खुणेचा म्हणून बंदुकीचा बार काढीन त्याबरोबर दारूला काकडा लाव—आणि पश्चिमेच्या मैदानांत पळत ये.—खांद्यावर बसवून गडावरून पळवून न्यावयास मी तेथें आहेच.

ल०—मी बंदुकीचा बार केव्हां होईल, ह्याची वाट पहात बसतें. जितकी लवकर खूण द्याल तितकी बरी,—कांचनगडावरून तुम्ही मला केव्हां न्याल, असें मला झालें आहे

पि०—हं, तूं लाग तर आपल्या उद्योगाला,—माझ्या तयारीला हा मी निघालोंच. (लक्ष्मी पिशवी घेऊन जाते.)

पि०—(स्वगत) आतां असें करावें—खानाच्या सैन्याची कत्तल करून प्रतापराव मागें परतलेले दिसले म्हणजे, एकदम खुणेचा बार काढावा.—प्रतापराव दवलतराव विजयी होऊन, मोठ्या आनंदाने गडावर चढतात तों, आमची ही दिवटी गडाची राखरांगोळी करील!—आमचें कारस्थान तर उत्तम साधलें!—प्रतापरावांचा आतांपर्यंत मा-

ह्यावर पूर्ण विश्वास, दादासाहेबांचे तर आम्ही जुनाट दोस्त, हंबीररावांना माझ्या शिवाय सतनागत!—आतां गुरगुरणाऱ्या दवलतरावाच्या, व विजयानगरचा मुख्य सेनापती होऊन सर्वांवर सत्ता मिरवूं पाहणाऱ्या प्रतापरावाच्या, मुसक्या बांधून विजापूराला न्यायाला काय उशीर?—उद्यां सकाळीं पिलाजीरावाच्या तोंडून जो जो शब्द निघेल तो प्रत्येकानें—प्रतापरावानें,-दवलतरावानें—झेललाच पाहिजे.—दादासाहेब, लक्ष्मी,—हीं दुधखुळीं दारूंत होरपळून मरणार!—मरोत बिचारीं!—मला त्याचें सुख दुःख तितकेंच आहे.—प्रतापरावाचा पराभव करून हें बंडखोर पादशहापुढें उभे केले—कांचनगडच्या सुभ्याच्या निम्म्या इतकी निदान पादशहाकडून जहागीर उपटली—म्हणजे पादशाहाच्या वजरीवर पुढें डोळा ठेवण्यास हरकत नाहीं.—मोहना,—यमुना,—पण हा बायकांसंबंधाचा विचार मागावून करूं. वैभव पदरीं पडल्यानंतर त्याचा उपभोग घेतांना बायका पाहिजे असतात—तों पर्यंत मोहने. यमुनेसंबंधाचे विचार मला नकोत.

(जातो)

तिसरा अंक समाप्त.

अंक चौथा.

प्रवेश पहिला.

स्थळ—कांचनगड, पश्चिम बुरूज.

(मोहना येते.)

मो०—छाप्याचें काम आटपून एव्हांना स्वारी परत यावी, खरें म्हटलें असतां!—लांब तेथें-खानाच्या छावणीपाशीं आतां उजेड दिसूं लागला!—विजयी होऊन स्वारी परत येण्याबरोबर पंचारती ओंवाळून दृष्ट काढीन. अंबाबाईच्या दर्शनाला स्वारी जाऊं लागली म्हणजे सोन्याचा नारळ करून ठेविला आहे, तो मातोश्रीपुढें ठेवण्यास हातांत देईन.—हें काय पण?—इतका वेळ काय करीत आहेत?—बायकांना लढाईत बरोबर कां नेत नाहीत कोणाला ठाऊक?—मी जर बरोबर असते—रणांगणावर गाजविलेल्या त्यांच्या शौर्याचें वर्णन ऐकून जर माझ्या मनाला इतका आनंद होतो, तर शौर्याचा अवतार रणभूमीवर पहावयास मिळाल्यावर,—दिवट्या हालल्या सारख्या दिसतात हं!—विजयी होऊन या कड्याखालीं स्वारी केव्हां येईल, आणि मी हीं फुलें केव्हां उधळीन, असें मला झालें आहे.—फुलें उधळल्यावर, महाराज, तुम्ही आपल्या आवडत्या मोहनेकडे वर पहाल ना?—हें काय पण? अजून त्या जागेचा उजेड कसा हालत नाहीं?—हंबीरराव पिलाजीरावांनीं कांहीं दगा दिला नसेलना?—हंबीरराव गडावर ओलीस आहेत, तेव्हां हंबीररावाकडून दगा होण्याचा— (हंबीरराव येतो.)

हं०—हंबीररावाककडून दगा होईल, असें, मोहने, तुला वाटतें

तरी कसें?—हंबीरराव तुझा दास, आणि त्यापासून भीति—मोहने, पाहिजे तो हुकूम तूं मला—

मो०–अगबाई! हे कोण?–हंबीररावं, तुम्ही एवढ्या रात्रीं येथें कसे आला?

हं०—तूं ह्या जागीं चालली असशील–त्या फुलझाडांना तुझा हात लागला असेल,–ही जागा, –तीं फुलझाडें,–हींच माझीं पवित्र स्थानें,–ह्याच माझ्या पवित्र वस्तू!

मो०—(स्वगत)मोठी पंचाईत आली,–रात्रीची वेळ, मी एकटी!

हं०—मोहने, मला जर कोणी यात्रेला जा म्हणून सांगितलें,–तर तुझ्या स्पर्शानें पवित्र झालेल्या याच जागेकडे मी धांव घेतली असती!–तुझ्या मोहक मूर्तीचें ध्यान ह्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणीं कसें चांगलें साधेल?

मो०—हंबीरराव,—तुम्हीं भलताच नाद वेडेपणानें कशाला धरितां?–तुमच्या ह्या गरीब बहिणीची तुम्हाला अशी विनंति आहे, तुमचें शौर्य, तुमची हुशारी, तुमचें वजन, हीं सर्व तुमच्या धर्माच्या उपयोगीं पडावयाचीं,—तीं कवडीमोलाचीं कां करितां?–मजसारिख्या एखाद्या क्षुल्लक स्त्रीवर–तुमच्या धर्मभगिनीवर–लक्ष ठेवून, आपला स्वतःचा जन्म फुकट कां दवडतां?–आयोध्या, गया, काशी, पंचवटी,—तुमच्या धर्मांतील पवित्र स्थानें काय कमी आहेत?–सीतादेवी सारख्या महा साध्वीच्या स्पर्शानें पवित्र झालेलीं शेकडों स्थानें आमच्या देशांत आहेत.–हंबीरराव, तुमच्या अंगांत हिंमत असेल

तर; हे यवन आमचीं पवित्र देवस्थानें बाटवीत आहेत,–त्याची लाज धरा,–त्या स्थानांना शत्रूच्या कचाट्यांतून सोडवा,—व क्षत्रियांची कीर्ति मिळवा.

हं०—मोहने,–मी क्षात्रतेज जगाला दाखविलें असतें, धर्म सेवा केली असती,–पण तें व्हावें कसें? माझा आत्मा, माझा जीव, तूं.–तूं जर मजपाशीं नाहींस तर माझ्या हातून पराक्रम कसा होईल?–मोहने तुझ्या हाताचा ह्या मनगटाला स्पर्श कर, आणि शौर्य कर्तबगारी ह्यांत किती भरली आहे, ह्याचा चमत्कार पहा.—प्रतापरावासंबंधानें तुझ्या मनांत शंका येत असली, तर त्यांच्या हवालीं माझें सर्व सैन्य करितों, ज्या खजिन्याचा पादशहाला हेवा वाटतो तो खजिना त्यांना देतों, ते विजापूरच्या तक्ताचे तुकडे करूं देत. विजयानगरला पुन्हा गादी स्थापूं देत, माझी हरकत नाहीं.–ते विजयानगरचे भक्त आहेत, तुझे भक्त नाहींत; मी तुझा भक्त आहे.–मोहने. तूं माझी हो, माझ्याबरोबर चल.–लोक काय म्हणतील ह्याची भीति नको बाळगावयाला.—विजापूर म्हणजे पृथ्वी नव्हे.––मला आज्ञा कर, बेदरशाही बुडवितों, निजामशाहीला तुझ्या पायावर लोटांगणें घ्यावयास लावतों.—मोहने, कांगोब्राम्हणीच्या तक्तावर तुला नेऊन बसवितों.—पुराणांतरींही क्षत्रियांनीं असें शौर्य गाजविलें नसेल असा पराक्रम करून दाखवितों.––ह्या मनगटाला तुझ्या कोमल हाताचा स्पर्श मात्र झाला पाहिजे. (जवळ जाऊं लागतो)

मो०—हंबीरराव,––मी येथें एकटी आहे असें समजून अशी दांडगाई करितां काय?–खबरदार एक पाऊल पुढें याल तर.–तुमच्या उद्दामपणाच्या भाषणाबद्दल शिक्षा करणारे खानाचा समाचार घेऊन

विजयी होऊन परतले पहा!–सर्वांदेखत तुमची मानखंडना होऊं नये, अशी जर तुमची इच्छा असेल, ह्या अपराधाबद्दल होणारी भयंकर शिक्षा तुम्हाला जर चुकवावयाची असेल, तर विजयी लष्कर गडावर येऊन पोंचण्यापूर्वी मुकाट्यानें एकदां काळें तोंड करा.–कांचनगडावर जरी मोहना एकटी— (पडद्यांत एक भयंकर दांडगा आवाज होतो.)

हं०—मोहने, कांचनगडची आतां प्रतिष्ठा कसची उरली?—हा पहा, पूर्वेकडचा तुमचा तो जंगी बुरूज एकदम जमीनदोस्त झाला!–मोहने, ही तुमच्या दारूच्या कोठाराला पिलाजीरावानें लावलेली आग आहे.—आता कांचनगडाला कोण भिणार?

मो०—कसायानो, चांडाळानो, हारामखोरानो, दगा करून, आमच्या सर्वांचा केसानें गळा कापलांत हं!–चांडाळा, पाप्या, पतिव्रतेचा तूं छळ मांडिला आहेस,–कांचनगडाच्या पूर्वेच्या त्या बुरुजाप्रमाणें शरीराचे कळपे कळपे तुटून पडून तुझा नाश होईल; दारूच्या कोठारांत सांपडून जळून होरपळून, तुला मृत्यु येईल.—जगदंबे, कांचनगडाबरोबरच तिकडचे सर्व बेत कोसळून जाणार ना?–आणि हें सर्व माझ्या पायीं.–हंबीरराव, मोहनेचा असाच जर सूड तुह्माला उगवावयाचा होता, तर मोत्यांच्या हिरव्या महालांत माझ्या उरांत खंजीर खुपसून कां मला ठार मारिलीं नाहींत?–माझा सूड घेण्याकरितां, दारूच्या कोठारावर मला बसवून माझ्याच हातानें जर तुम्ही बत्ती लावावयास सांगितली असती,–अशा ह्या ज्वाळेंत अशा ह्या कडाक्यांत,–कांचनगडाशिवाय इतर कोठेंही माझे जर तुकडे तुकडे झाले असते, तर मी तुम्हाला दुष्ट देखील म्हटलें नसते!–पुण्यश्लोक सरदारांची आशा या कम[illegible]रीच्या पायीं, देवा, असा

रीतीनें भंग व्हावी!— देवा! खानाचा पराभव करून ते वर चढूं लागले— आणि कांचनगडावर असा हा प्रळय!—आग लावतांना त्या मान्याचा हात झडून कसा पडला नाहीं?—मेल्यानो, आमचा सूड तुम्ही उगविलांत, पण पातिव्रतेच्या भयंकर शापांतून तुमची सुटका होणार नाहीं.—ज्या हातांनीं हा कसाइपणा केला आहे, ज्या हलकट पुरुषांनीं हें दुष्ट कारस्थान केलें, त्या सर्वांना—काय प्रळय हा!

हं०— मोहने, विनाकारण त्रास करून घेण्याची ही वेळ नव्हे.— माझ्या हातून जर कांहीं पातक झालें असेल तर त्याला कारण तुझ्यावरचें अनिवार प्रेम.— मोहने, आज नाहीं उद्यां तुला माझ्या छावणींत आलेंच पाहिजे.—आतां माझ्याबरोबर चल.—तुझी इच्छा असेल तर जेथें आपल्या ओळखीचे लोकही भेटणार नाहींत अशा देशांत जाऊं— चल, हिंदुस्थानांत जाऊं.—दिल्लीच्या बादशाहाला तक्तावरून ओढून काढून, हस्तिनापूरच्या पांडवांच्या सिंहासनावर तुला बसवितों.—रामाच्या अयोध्येंतून ह्या यवनांना हाकलून लावून, सीतादेवी ज्या महालांत राहत होती, त्याच महालांत तुला नेऊन ठेवितों.—ह्या कांचनगडची प्रतिष्ठा काय? ह्या कांचनगडासारखे हजारो किल्ले गंगेच्या तीरावर बांधूं.—चल, मोहने, चल मजबरोबर.—ह्यांत कोणाचेंच वाईट नाहीं.—ह्यांत पाप नाहीं— धर्मसेवा ह्यांतच आहे.—मोहने, हंबीररावाचा स्वीकार करून त्याला आज्ञा कर— (अगदीं जवळ जातो)

मो०—पाप्या, कांचनगडच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या—प्रतापराव कितीही दूर असले—तरी मोहना एकटी आहे असें समजूं नको.

हं०—तिचें संरक्षण करणारा—तिचा बंदा सेवक हंबीरराव जवळ असतांना मोहना एकटी ! (धरूं पाहतो.)

मो०—(बुरुजाच्या बाहेरच्या कड्यावर एक पाय टेवून दुसरा खालीं सोडून एका हातानें कठडा धरून) मोहनेचें संरक्षण करण्याची कोणाला जरूरी नाहीं.-तिचें संरक्षण करण्याला तिचें पातिव्रत्य तयार आहे.—नीचा केसभर पुढें ये, मोहनेचा कठड्याचा हात सुटला म्हणून समज.

हं०—(मागें सरून) मोहने, असें साहस करूं नको.—अशानें तुझ्या शरीराचे नव्हे माझ्या शरीराचे शतशः तुकडे होतील. (पिलाजीराव येतो.)

पि०—हंबीरराव, गडावरून खालीं चला लवकर,-बायकांची आर्जवें करण्याची ही वेळ नव्हे.- उद्यां हीच मोहना तुमचीं आर्जवें करूं लागेल !—तुम्हाला स्वर्गातले देव समजूं लागेल !–चला एकदम, आतां आमच्या सैन्यांत आम्हाला गेलें पाहिजे.

हं०— मोहनेशिवाय मी एकटा यावयाचा नाहीं.

पि०—आज मोहना तुमची नव्हे, उद्यां मोहना तुमची.—प्रतापराव वर येण्यापूर्वीं आम्हाला येथून गेलें पाहिजे, व एकदम या पडक्या गडाला वेढा दिला पाहिजे.- आतां वेळ घालविली कीं, मोहना हातची गेली.—चला.—अहो, ज्यांनीं कांचनगडचा किल्ला क्षणांत जमीनदोस्त केला, त्यांना पातिव्रत्याचा आव घालणाऱ्या ह्या मोहनेला वश करून घ्यावयाला काय उशीर !—पण कोणचीही गोष्ट योग्य वेळीं केली पाहिजे. (पिलाजी हंबीररावास घेऊन जातो.)

मो०—(वर चढून)गेले—कसाई—गेले.—काय अनर्थ हा !— हंबी-

रराव, तुम्ही मला धरावयाला आतां पुढें येत होता—तसेंच केसभर पुढें कां नाहीं आला?— ह्या कड्यावरून मोहनेनें जर उडी घेतली असती—आणि मोहनेच्या शरीराचे जर तुकडे तुकडे झाले असते—तर,—देवा,—किती तरी चांगलें झालें असतें!— प्रतापराव, तुम्हाला वाटत असेल, मी विजयी होऊन आलों म्हणजे माझी मोहना मला आरती ओंवाळायला येईल.—महाराज, ह्या हतभागी, पापी, दुर्दैवी मोहनेशीं ज्या वेळीं लग्न लाविलेंत—त्याच वेळीं,—आपण परवां म्हणत होता—त्याच वेळीं, आपणावर दुःखाचे डोंगर कोसळून घेतलेत!—शत्रूला जिंकून तुम्ही गडावर परत आला म्हणजे रत्नखचित निरांजनांची आरती हातांत घेऊन तुमच्या यशाचें शुभ्र तेज तुमच्या पुढें ही दुर्दैवी मोहना आतां आणीत नाहीं,—तर मोहनेच्या पायीं तुमच्या गडाचे तुकडे तुकडे होऊन,—त्यांतून निघणारा हा काळाकुट धूर,—ह्या भयंकर ज्वाळा,—आरतीचे ऐवजीं तुम्हाला पहाव्या लागणार!—देवा, मला जन्माला घालून, माझ्यामुळें, माझ्या पायीं, त्यांच्यासारिख्या नरवीरांच्या हालअपेष्टेस प्रारंभ केलास,—त्यापेक्षां मला जन्मालाच घातली नसतीस, तर फार बरें झालें असतें!

(पडदा)

अंक ४—प्रवेश दुसरा.

स्थळ—पिलाजीरावाची छावणी.

(पिलाजी व दोन सरदार प्रवेश करतात.)

पि०—कांचनगडाबरोबरच खानाचाही नाश झाला म्हणायचा.—प्रतापरावाकडे गडावर गेलेला जासूद अद्याप नाहीं परत आला?

प०स०—अद्याप नाहीं आला. आपल्या आज्ञापत्राचें उत्तर प्रतापरावांनीं लवकर दिलें नसेल.

दु०स०—सरकारांनीं हुकुम फर्माविल्याप्रमाणें प्रतापराव जर शरण आले तर त्यांना—

प०स०—मोहित्यांच्या सोनगडाकडे आपण त्यांना जाऊं दिलें—

पि०—प्रतापराव शरणही येत नाहींत आणि सोनगडाकडे जिवंत सोडावयाचें किंवा कसें ह्याचीहि पंचाईत नको.

(धनाजीराव व दोघे इसम निशाणासह प्रवेश करतात)

या, दोस्त धनाजीरावं, या.—तुम्हाला पाहिलें म्हणजे खानसाहेबांची मला आठवण होते, आणि डोळ्याचें पाणी कांहीं केल्या थांबतच नाहीं.—एवढा कांचनगड मी एका क्षणांत धुळीस मिळविला, प्रतापरावालाही आज जिवंत धरून मुसक्या बांधून विजापुरास नेईन;—पण धनाजीराव खाना-शिवाय कोणच्या तोंडानें आम्ही पादशहाच्या भेटीस जावें ?

धनाजीराव०—सरदारसाहेब, खानाकरतां दुःखाश्रू गाळित बसण्याची ही वेळ नव्हे,—कालच्या छाप्यांत खान व त्याच्या गोटांतले सर्व सरदार कापले गेले—

पि०—हाय! हाय! हा पिलाजी माने जिवंत असतांना खानाला व त्यांच्या सरदारांना ह्या चोर, लुटारू, दरवडेखोर प्रताप्यानें छापा घालून मारावें हं !

धना०—सरदारसाहेब, शोक करूं नका.—खानाचें सैन्य अनाथ झालें आहे, नांवाजलेला सरदार खानाचे छावणींत कोणीच जिवंत राहिला नाहीं.—मी निजामतींतला नोकर, सरदार मंडळींत माझें नांव नाहीं.—

लष्करच्या दृष्टीनें मी जिवंत असून नसून सारखाच.—तेव्हां ह्या सर्व पादशाही सैन्याच्या सरलष्करचें हें निशाण आपल्या तंबूजवळ रोंवण्याचा मला हुकूम करून सर्व सैन्यास आपण सनाथ केलें पाहिजे.

पि०—धनाजीराव, खानाच्या मागें सरलष्करचा मान मला आपण देतां, आपल्या उपकाराची फेड माझ्या हातून होईल तेव्हां खरें.—पण असें पहा पादशाही सैन्यांत हंबीरराव दसहजारी आहेत आणि मी पंचहजारी आहे; तेव्हां हंबीररावांना प्रथम हा मान मिळाला पाहिजे.

ध०—हंबीररावाच्या डेऱ्या कडे प्रथम जाऊन मगच आपल्या तंबूकडे आलों.

पि०—मग हंबीरराव काय ह्मणाले? (पड्यांत गलबला)

ध०—ते पहा हंबीरराव आणि त्यांचे लोक इकडेच येत आहेत.—तेथला गोंधळ आतां तुम्हाला येथेंच पहावयाला मिळेल.

पि०—(स्वगत) धन्य पिलाजीराव आज तुम्ही धन्य आहां.—हें पादशाही वैभव,—हें निशाण,—आपल्याच पायानें तुमच्याकडे चालून आलें आहे.—वळणावळणानें असें पाणीं बांधून आणावें लागतें.

(हंबीरराव व त्याचे दोन सरदार प्रवेश करितात. हंबीररावाचे सरदार निशाणाला हात घालतात.)

हं०—काय वेडे लोक आहेत हे!—तुम्हाला माझे हुकूम मानावयाचे नाहींत?—माझे न माना, पण मोहनेचे तरी मानाल कीं नाहीं?—चला परत डेऱ्याकडे.

हंबीररावाचे सरदार०—पिलाजीराव हें पादशाही सरलष्करचें निशाण आमच्या सरकारच्या डेऱ्याजवळ पाहिजे.

पि०—अलबत, मी झालों तरी तेंच ह्या धनाजीरावांना सांगत होतों.—हंबीरराव आमचे धनी, खानाच्या मागें सरलष्करचा मान त्यांचा.—हंबीरराव—सरकार—आम्ही सर्वजण हें निशाण—

हं०—माझ्या तंबूजवळ आणि हें पांढरें फडकें काय करायाचें! —ह्याच्यावर मोहनेचें जर चित्र असतें आणि वाऱ्याच्या झुळकीसरशी मोहनेच्या मोहक मूर्तीचा डोल झालेला ह्या निशाणावर जर मला पहावयास मिळाला असता—चला, माझा हुकूम माना—माझ्या तंबूच्या प्रत्येक कनाथीवर मोहनेचें चित्र काढा.

पि०—हंबीरराव, मोहनेचें हें वेड——

हं०—मोहनेचें नांव ऐकल्यावर मी वेडा जर बनलों नाहीं, माझी विचारशक्ती जर जाग्यावर राहिली, तर मोहना मोहक नाहीं, मोहनेंत जादू नाहीं असेंच तुम्ही म्हणाल. छे! सरदारहो मला जगानें खुळा—वेडा—म्हटलेलें पुरवेल, पण मोहनेच्या अंगीं हंबीररावाला वेडा बनविण्याची शक्ति नाहीं, असें नको कोणी म्हणावयाला.—चला तुम्ही माझ्याबरोबर—मी तुम्हाला मोहना दाखवितों.—मग माझ्या निशाणावर, माझ्या तंबूवर, माझ्या मंदिलावर, माझ्या दुशालेवर, सर्व ठिकाणीं मोहनेचीं चित्रें काढा.—पण असें होईल—हो—नका येऊं तुम्ही माझ्याबरोबर.—तुम्ही मजबरोबर आलांत आणि मोहनेचें प्रत्यक्ष दर्शन घेतलेंत तर माझ्यासारिखे तुम्हीही वेडे होऊन तुम्हांला तसबीर काढतां यावयाची नाहीं. येथेंच थांबा—मीच मोहनेला पाहून येऊन तुम्हाला सांगतों.

(हं० जातो.)

पि०—(हं०च्या सरदाराजवळ जाऊन दोघांच्या खांद्यावर हात ठेऊन) हें पहा, धनीसाहेबांचें चित्त कांहीं स्थिर नाहीं. तेव्हां आजचें लढाईचें काम ह्यांच्या हातून कांहीं नीट पार पडणार नाहीं.—तुम्ही त्यांच्या जवळ नेहमीं असणारे म्हणून ह्या वेडांतून त्यांना सोडविण्याची तुम्हाला एक युक्ति सांगणार आहे.—नाहींतर असें करा, हें निशाण तुम्ही आपल्या ताब्यांत घ्या आणि आजच्या लढाईचा बोजाही तुम्ही—

हं०चे सरदार०—छे! छे! तें नको आम्हाला.--युक्ति काय सांगत होता ती सांगा.

पि०—युक्ति म्हणजे अशी, प्रतापराव गडावरून खालीं उतरूं लागले म्हणजे पांच पन्नास निवडक जवान बरोबर घेऊन त्यांच्या पिछा-डीस जा.—जरा टेहळणी केलीत म्हणजे मोहना कोठें तरी तुम्हाला सांपड-लीच पाहिजे.—धनी साहेबांच्यापुढें तिला आणून उभी करा, त्यांचें वेड नाहींसेंच झालें म्हणून समजा.

हं०चे सरदार०—बरोबर आहे.—बरें तर आम्ही त्या उद्योगाला लागतो.—धनींसाहेबांना प्रथम जपलें पाहिजे. (हं० सरदार जातात.)

पि०—(स्वतःचे सरदारांस) हें निशाण माझ्या तंबूजवळ रोंवा, आणि पादशाही सर्व सैन्यांत द्वाही फिरवा कीं सर्व सरदार एका ठिकाणीं जूळून, सर्वांची सल्लामसलत होऊन, हंबीररावांची तबेत ना-दुरुस्त असल्यामुळें खानाच्यामागें सरलष्करचा मान पिलाजीराव मान्यां-ना देण्यांत आला आहे.—जा ह्या उद्योगाला अगोदर लागा.

(पि० चे सरदार व निशाणवाले जातात.)

सरदार धनाजीराव, सरलष्करचा हा अधिकार हातांत घेतांना

पादशहाच्या नांवानें मी माझी पंचहजारीची सरदारकी तुम्हाला आतां दिली आहे.

ध०—हें काय पिलाजीराव, माझा एवढा मोठा सन्मान करण्या सारखें मी काय केलें आहे. ?

पि०—तुम्हीं केलें नसलें तर आज तसेंच कांहीं करून दाखवावें लागेल.

ध०—सरलष्करचे हुकूम पाळायाला हा बंदा तयार आहे.

पि०—हंबीररावाला सरलष्करचे निशाण तुम्ही द्यावयाला गेला होता आणि त्यानें त्या निशाणाचा अपमान केला;—पादशाहीवि-रुद्ध हंबीऱ्यानें हें बंड नाहींका केलें ?

ध०—बंड कसलें, त्यांना मोहनेचें वेड—

पि०—अहो कांचगडच्या छावणींत असतांना हंबीरराव वेडे खरे,—पण पादशहापुढें गेल्यावर ते बंडखोरच ठरले पाहिजेत.—असें काय करतां—त्यांची दसहजारीची जहागीर रिकामी नकोका व्हावयाला ?

ध०—समजलों, आलें ध्यानांत.—विजापूराला गेल्यावर हंबीऱ्याला बंडखोरांतच ओढायाचें.—बरें आज मी काय करूं?

पि०—आतां कसें ठीक बोलला!—आज असें करावयाचें हंबीररावाचे सरदार मोहनेला हुडकावयाला निघून गेले म्हणजे तुम्ही बंदोबस्तानें हंबीररावाचे डेऱ्यांत शिरून हंबीरराव आणि त्यांची बायको यमुना यांना गुप्तपणें मेण्यांत घालून कैद करा.—आणि—असें करा—मग सांगेन—आतां—तुम्ही—जा—तशी व्यवस्था झाली म्हणजे मला वर्दी द्यायाला या.   (धनाजी जातो.)

प्रतापराव आणि मोहना, ह्यांना कसेंही करून जिवंत धरण्याचा प्रयत्न केला पाहिजे.–प्रतापराव जिवंत हातीं लागला नाहीं तर त्याचें शीर निदान कापून आणून विजापूरास नेलें पाहिजे.–एकावेशीवर रामराजे टांगलेले आहेत तर दुसऱ्या वेशीवर हे जाधव कुळांतले सरदार चांगले शोभतील.

(पडदा)

अंक ४–प्रवेश तिसरा.

—:*:—

स्थळ—कांचनगड.

(प्रतापराव व दवलतराव येतात.)

प्र०—दवलतराव, विजापूरकरांशीं लढण्याचा ज्या वेळीं मीं प्रथम निश्चय केला त्या वेळीं आमचेच लोक विश्वासघातानें आमचा असा गळा कापतील, असें माझ्या स्वप्नींही आलें नव्हतें!–शत्रूची लक्षावधी फौज कांचनगडावर चालून यावयाची होती,—आम्हाला जिंकून, कांचगगडचे तुकडे तुकडे करून, सर्व मैदान बनावयाचें होतें–आणि त्याच मैदानावर कत्तल करण्याकरितां उभे केलेल्या कांचनगडच्या गडकऱ्यांच्या दावणींत मला बांधावयाचें होतें,–हृदयावर अपमानाच्या असह्य डागण्या देणाऱ्या त्या मृत्यूला माझी ही मान देतांना आतांच्या इतकें खात्रीनें वाईट वाटलें नसतें!

द०—प्रतापराव, कांचनगडची राखरांगोळी होऊन गेली,–झाली,––ही गोष्ट होऊन गेली. आतां त्याबद्दल दुःख करीत बसण्यांत काय अर्थ

आहे?—पुढील प्रसंग याहूनही भयंकर आहे, त्यांतून पार कसें पडावें, ह्याची एखादी मसलत काढूं या.

प्र०—घरभेद्या मात्रागमनी ह्या मांगांच्या फसवी जाळ्यांतून पार पडण्यास मार्ग सांपडेल, असें, दवलतराव, तुम्हाला वाटतें तरी कसें?

द०—पण, प्रतापराव, कांचनगडावर आम्हांपैकीं बऱ्याचजणांच्या बायका आहेत.—त्यांची जाधवांचे नांवाला शोभेल अशी कांहीं तरी व्यवस्था लावावयाला नको काय?

प्र०—हो, सर्व खरें.—मण जी व्यवस्था आम्हीं केली आहे, याहून अधिक तें आम्हीं काय करणार?—दवलतराव, शत्रूची कोण कडेकोट तयारी ही!--कांचनगडावर हा प्रळय व्हावयाची फुरसत, तों मान्यांच्या सैन्यानें कांचनगडला सक्तीचा वेढा दिला!—कांचनगडच्या मायथ्याचा खडक कोसळून पडावयाचा थांबला असेल नसेल, तों हंबीरावांच्या आज्ञेवरून मान्यांची ती उर्मटपणाची चिठी आली!—दवळतराव, ज्या ठिकाणीं घरचे विश्वासाचे लोक निजल्याजागीं ठार करण्याचे उद्योगांत असतात, त्या ठिकाणीं ओढवलेल्या संकटाशीं टक्कर देऊन सोक्षमोक्ष करून घेतल्याशिवाय इलाज नाहीं.

द०—होय, दुसरा मार्गच उरला नाहीं.—पिलाजीरावानें आपल्या चिठींत जें लिहिलें आहे,—दोन प्रहर दिवस येईतों जे कोणी शस्त्रास्त्रें खालीं ठेऊन आमच्या छावणींत येतील, त्यांना पुढें मर्जीस येईल तिकडे जाण्यास आम्हीं मनाई करणार नाहीं,—ह्या सवलतीचा कितपत उपयोग होईल?—कांचनगडावरून अशा प्रकारें शरण गेलेल्यांना कैद करून विजापूरास नेतील काय?

प्र०—अहो, विश्वासघात करण्याचें ह्यांना बाळकडूच घातलेलें आहे !—पादशहा आपणाकडे पाहून जरा हांसलेसें यांना वाटलें, आपला काडीचा फायदा होतो आहे अशी यांची समजूत झाली कीं, तेवढ्या क्षुल्लक नफ्याकरितां आज दिगंतीं ज्यांची कीर्ति गेली आहे, अशा घराण्यांतील पवित्र बायकांच्या अब्रूवर रखरखलेले निखारे ठेवण्यास, ह्यांच्या मनाला दिक्कत वाटावयाची नाहीं !—दवलतराव, खानाच्या पांचहजार पठाण अरबांपैकीं एक हजार लोक उगीच उगीच आमच्या तरवारींना आम्ही बळी दिले !—या माझ्या तरवारीला काल खानाच्या रक्तानें मीं नाहूं घातलें, त्यापेक्षां एकाद्या पिल्यावर—एकाद्या हंबीऱ्यावर—ही तीक्ष्ण धार पडली असती, तर विजयानगरच्या ऋणांतून मी बऱ्याच अंशीं मुक्त तरी झालों असतों.—शत्रूला शरण जाऊन पाहिजे तर कांचनगडावरील सर्व गडकरी आपले प्राण वाचवूं देत,—माझा हाच निश्चय,—हीच प्रतीज्ञा,—तरवारींच्या तीक्ष्ण धारांनीं माझ्या शरिराचे तुकडे तुकडे होवोत,—भाल्यांच्या माऱ्यामुळें माझ्या शरिरांतून रक्ताचे हजारो प्रवाह वाहोत,—बंदुकींच्या गोळ्यांच्या तडाक्यानें माझ्या मतकांचें कळपे कळके तुटून पडोत,—ही माझी भयंकर तलवार वज्राप्रमाणें शत्रूसैन्यावर पडेल, आणि ह्या चोरांची राखरांगोळी झालेली ह्या डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय किंवा कानांनीं ऐकिल्याशिवाय प्रतापरावाचीं हाडें कांचनगडाच्या मैदानावर कधींही पडावयाचीं नाहींत.

(संताजीराव येतो.)

द०—या संताजीराव.—कालच्या प्रळयांत किती गडकरी पडले, नक्की बातमी काढीलत का ?

वेत्रधारी होऊन उभे राहण्यास प्रतापरावास खरोखरच कृतकृत्य वाटलें असतें!—सात आठ वर्षे कांचनगडावर एवढी खस्त खाल्ली,—मोहनेसारख्या स्त्रीरत्नास सतत दुःखांत— (चंपा येते.) अरे ही मोहनेची दासी मजकडेच येत आहे.—माझ्या दुखाच्या कडेलोटाची वेळ मी मुद्दाम म्हणून लांबणीवर टाकीत असतां, अंगावर कोसळणाऱ्या दुःखाच्या पर्वतापासून जाणून बुजून अंग चोरीत असतां, मला बळजोरीनें दुःखाजवळ ओढून नेण्यास ही आली असावी! चंपे, कोठें चाललीस?

चं०—सरकारस्वारी काय करीत आहे, हें पाहून ये, म्हणून बाईसाहेबांनीं आज्ञा केल्यावरून इकडे आलें.

प्र०— मोहना काय करीत आहे?

चं०— डोळ्यांतून एकसारखें पाणी चाललें आहे.—त्या झाल्या तरी दुसरें काय करणार?

प्र०—हा मी आलोंच तिकडे (चंपा जाते.) प्रतापराव—वज्राहून हृदय कठोर करा,—मांग, पिशाच्च, राक्षस यांच्याहून अधिक निर्दय व्हा, आणि मग मोहनेच्या महालांत पाय टाका.—पादशहाच्या जुलमामुळें क्रुद्ध झालेल्या विजयानगरच्या देवतांना, गांजलेल्या तुमच्या धर्माला, स्वतःचा बळी देण्यास तुम्ही तयार झालें न पाहिजे. (जातो.)

अंक ४–प्रवेश चौथा.

स्थळ— मोहनेचा महाल.

(मोहना सचिंत बसली आहे.)

मो०—जगदंबे, असें माझ्या हातून कोणचें पाप झालें, म्हणून माझ्यावर एवढा राग झाला!–ह्या पापिणीला जन्माला घालून, ह्या पापिणीबद्दल प्रतापरावासारिख्या सरदारांच्या मनांत प्रेम उत्पन्न करून, माझ्या पायीं त्यांच्या सर्व सुखाची नासाडी व्हावी, याहून दुसरी शिक्षा माझ्या पापाबद्दल नव्हती का?—(प्रतापराव येतो व जवळ जाऊन उभा राहतो.) प्रतापराव, माझें मुख्य दैवत आपण, माझें सर्व सुख आपण, माझ्या जिवाचा विसावा आपण, माझा मोक्ष आपण, माझें परब्रम्ह आपण.–प्रतापराव, आपणावरचें माझें प्रेम स्वप्नांत कधींही चुकून जरा देखील ढळलें नाहीं.–तें प्रेम आठवा, आणि या गरीब दासीमुळें आपणावर ओढवलेल्या ह्या भयंकर प्रसंगाबद्दल तिला क्षमा करा.

प्र०— मोहने, तुझी क्षमा मागण्याकरितां पदर पसरून प्रतापराव तुजजवळ उभा आहे.

मो०—महाराज, हें काय?–मीं अपराधी आणि माझी काय क्षमा मागावयाची? (जवळ जाऊन) ह्या दासीचा आपणाला तिटकारा नाहींना आला?—मोहनेचा आपणाला राग नाहींना आला?–ह्या

दासीवरचें आपलें प्रेम आहे तसेंच आहे ना ?—जगदंबे, विनाकारण मीं आतां तुला दोष दिला.—मज सारखी धन्य स्त्री पृथ्वीवर दुसरी कोणीही सांपडणार नाहीं.

प्र०—मोहने मजसारिख्या दुर्दैवी अपेशी पुरुषाचें प्रेमांत धन्य मानण्यासारखें काय आहे ?—माझी धनदवलत,—माझा अभिमान,--माझा दरारा,--ह्या कांचनगडांत भरलेला होता; ज्या वेळीं गड कोसळला, त्या वेळींच माझ्यांतील सर्व चांगल्या गुणांचा लोप झाला.—माझ्या प्रेमांत आतां आनंद मानण्याजोगें काय उरलें आहे ?—मोहने, शत्रूवर आवेशानें तुटून पडून समरांगणावर देह ठेवून, वीरांची अखेरची कीर्ति मिळण्याकरितां माझ्या शरीरास हकूम करण्यापूर्वी, माझा आत्मा तुझ्याभोंवती घुटमळत आहे.-मोहने, तुझी शेवटची गांठ घ्यावी, मी तुझा जो छळ केला असेल, तुला जें दुःख दिलें असेल, तें सर्व मजवर कृपा करून विसरून जा, अशी तुला शेवटची विनंती करावी, एवढयाच करितां मी आतां ह्या महालांत आलों. (पडद्यांत दवंडीचें झंगट व दवंडी पुर्वोक्त) मोहने, ही दवंडी तूं ऐकलीसच. बरेच गडकरी आतां कांचनगड सोडून जातील.—वेषांतर करून त्यांच्या बरोबर तूं गेलीस व सोनगडास पोंचलीस, तर माझ्यामागें माझ्या मोहनेचें काय होईल, ही तरी मला काळजी रहाणार नाहीं.

मो०—नाहीं, महाराज, नाहीं, मी आपल्याला सोडून सोनगडला जावयाची नाहीं.—तलवार कशी धरवी, भाला कसा फेंकावा,—हें सर्व मी लहानपणींच शिकलें आहे.—तेव्हां हुजऱ्याचा पोषाख देऊन मला जर लढाईंत बरोबर नेली, तर माझ्या हातून अखेरपर्यंत आपली सेवाचाकरी तरी होईल.

प्र०—मोहने, लढाईला प्रारंभ झाला, तरवारी म्यानातून बाहेर झळकल्या, आणि पहिली चकमक झाली कीं, भीतीनें तुझे डोळे आपोआप मिटतील, शत्रूच्या निकराच्या हल्लयाचे वेळीं तू बेशुद्ध होऊन पडशील, आणि अशा स्थितींत जाधव कुळाची सर्व अब्रू शत्रूच्या हातीं सांपडावी, ह्याला मी कधीं कधीं रुकार देणार नाहीं.

मो०—महाराज, जाधव कुळाची अब्रू मळीण होईल, अशी आपण भीति नको बाळगावयाला.—माझ्या ह्या विनंतीस तरी रुकार द्यावा, किंवा दिल्लीच्या बादशहानें रजपुतांच्या किल्याला वेढा दिलेली हकीकत आपण एकदां बखरींतून मला मुद्दाम वाचून दाखविली होती, तशा सारखें जाधवकुळाची अब्रू राखण्याकरितां तरी करावें.—फत्तेपूर शिक्रीस रजपुतांनीं ज्याप्रमाणें केलें, त्याप्रमाणें ह्या पापिणीच्या जीविताचा अंत आपल्या तरवारीनें करा.—महाराज, आपण जिवावर उदार होऊन शत्रूशीं लढून, समरांगणावर वीरांची अखेरची कीर्ति मिळाविल्यावर, स्वर्लोकच्या अप्सरा आपणाला सामोऱ्या येतील; त्या अप्सरांचा, महाराज, मला मत्सर वाटतो.—आपल्या हातून मरण आल्यानें माझी पूर्व जन्मींचीं पापें जळून नाहींशीं होतील;—आणि त्या सर्व अप्सरांना मागें लोटून हातांत विजयाची माळ घेऊन, मी आपल्या सामोरी येईन.—महाराज, तुमच्यावर निष्कपट प्रेम करणाऱ्या तुमच्या ह्या लाडक्या मोहनेचा हा शेवटचा हट्ट, ही शेवटची हौस, कसेंही करून पुरवा.

प्र०—भलता हट्ट घेऊन, माझ्या जिवाला मात्र असह्य दुःख देत आहेस!—मोहने, शौर्यांत रजपुतांना आम्हीं मागें सारूं.—तोफांच्या



प्रतापराव—आपल्या राज्याचें, आपल्या घराण्याचें, आपल्या धर्माचें नांव राखण्याकरितां रणांगणावर प्रत्यक्ष कृतांतकाळास कवटाळण्यास आम्ही धांवत जाऊं. (पान १०१.)

व बंदुकींच्या गोळ्यांचा वर्षाव होत असतां पेटलेल्या तोफेवर घोडा घालून, एक हात कान्यांतील दारूवर ठेवून, दुसऱ्या हातांतील भाल्यानें गोलंदाजास ठार करूं.–मोहने ह्याहूनही अघटीत भीमकर्मे आम्ही मराठ्यांनीं करावींत.–पण आपल्याच बायकांचा जीव घेण्याचें क्रूरपणाचें काम आमच्या हातून व्हावयाचें नाहीं.–रजपूत जसे अब्रूकरितां धडपडतात, त्यांच्याहून अधिक आम्ही तळमळूं.– यश मलीन होणार, असें वाटतांच त्यांच्याहून अधिक यातना आमच्या जिवाच्या होतील.– पण, मोहने, आम्ही आमच्या बायकांची योग्यता अधिक समजतों, आमच्या बायकांत कर्तबगारी रजपूत स्त्रियांहून खचित अधिक आहे.—आपल्या राजाचें, आपल्या घराण्याचें, आपल्या धर्माचें, नांव राखण्याकरितां रणांगणावर प्रत्यक्ष कृतांतकाळास कवटाळण्यास आम्ही धांवत जाऊं;–पण आमच्या बायकांनीं आपली अब्रू कशी राखावी, हें आम्ही आमच्या बायकांवरच सोंपवूं.—मराठ्यांची वहिवाट आजपर्यंतची अशीच आहे.—प्राणाहून प्रिय असलेल्या आपल्या लाडक्या पत्नीला हातांनीं लोटून देऊन, शत्रूच्या अंगावर तुटून पडण्याचा आम्हां वीरांचा आजपर्यंतचा बाणा आहे;–आणि आपली अब्रू रजपूत स्त्रियांहून चांगली राखणाऱ्या पतिव्रतांचीं उदाहरणें आमच्यांत शेंकडों आहेत.

मो०—मला एकटीलाच येथें सोडून आपण जाणार म्हणावयाचें!—महाराज—

प्र०—मोहने,–बायको, मुलगा, ह्यांच्या मोहांत न गुंतता, मी माझ्या कर्तव्याला जागेन, ह्मणून बाबांपाशीं घेतलेली शपथ, क्षणभरहि

मला आतां येथें उभा राहूं देत नाहीं.—शेवटचें तुझें दर्शन घ्यावयाचें होतें,–असा शोक करून काय उपयोग?–नशिबीं असेल तें मुकाट्यानें सोसण्यांतच मोठेपणा आहे.–मोहने,–तुझे शेवटचें प्रेमाचे शब्द ऐकावयाचे होते,–झालें. सोड मला आतां,—जातों मी.

(स्वतःस सोडवून घेऊन जाऊं लागतो, मोहना मूर्च्छित होऊन त्याच्या पायाशीं पडते.)

हिला मूर्छा आली हं!–चंपे जरा पाणी आण.

(चंपा पाणी घेऊन मोहनेवर शिंपडते.)

ह्या महालांतून बाहेर पडण्याइतका, जगदंबे, ह्या वेळीं मला क्रूरपणा दे. —सावध होऊं लागली का?

चं०—बाईसाहेब, महाराज तुम्हांला सोडून कांहीं गेले नाहींत. डोळे उघडून तरी पहा.— महाराज, पहा बाईसाहेबांनीं हा हात हालविला.—इतक्यांत डोळे उघडतील. (पाणी शिंपडते.)

प्र०—अशा स्थितींत मोहनेनें मजकडे प्रेमानें पाहिल्यावर, ब्रम्हांडांतला सगळा क्रूरपणा माझ्या एकट्याच्या वाटणीला जरी आला, तरी माझ्या हातून हिला सोडून जाणें व्हावयाचें नाहीं!–चंपे, मोहना शुद्धीवर आल्यावर तिला सांग, ह्या महालांतून बाहेर जातांना, आपल्या पायावर सर्व सृष्टीचें वजन कोणीं ठेविलें आहेसें प्रतापरावांना वाटलें.–जातों मी. —जाधव कुळाच्या देवतांनो, ही निराश्रित माझी बायको मी तुमच्या स्वाधिन केली आहे.—विजयानगरचा नाश करणारांचा—-माझ्या धर्माचा छळ करणाऱ्यांचा—सूड घेण्याकरतां मी जात आहें.—विजयानगरच्या देवतांनों, विजयानगरच्या साधुसंतांनों, मोहनेची अब्रू राखण्याचें काम आतां सर्वस्वी तुमचें आहे.

(जातो.)

चं०—बाईसाहेब, सावध व्हा; सावध व्हा.

मो०—(डोळे उघडून) महाराज,—चंपे, स्वारी गेली काग?—अखेर माझ्याशीं निष्ठुरतेनें वागलें ना?–(उठून)–गेले, मोहने तुला टाकून गेले!–चंपे, जातांना कांहीं बोलले का?

चं०—होय बाईसाहेब.–महाराज आपल्या जवळ बसले, त्यांच्या डोळ्यांतून एकसारिखे निघणारे अश्रू आपल्या अंगावर पडत होते,—

मो०—होय का खरें का?

चं०—खरें बाईसाहेब. मी शिंपडलेल्या पाण्यानें आपण सावध झाला म्हणण्यापेक्षां आपल्या मुखावर पडलेल्या त्यांच्या अश्रूनींच आपण लवकर शुद्धीवर आला,—

मो०—जातांना काय म्हणाले ग?

चं०—आपलें संरक्षण करण्याकरितां, आपली अब्रू राखण्याकरितां परमेश्वराची जगदंबेची त्यांनीं प्रार्थना केली; आणि, मला गेलेंच पाहिजे, असें म्हणून मोठ्या कष्टानें गेले!

मो०—महाराजांच्या अखेरच्या त्रासाला मोहना कारण झाली म्हणावयाची!–मला बरोबर न्या म्हणून ह्या पापिणीनें कशाला बरें हट्ट धरिला?–ऊठ, मोहने, ऊठ; तूंही मर्दानी पोषाख कर, आणि महाराजांनीं जरी तुला बरोबर नेलें नाहीं, तरी तूं त्यांच्या मागोमाग जा.–आमच्या स्त्रिया रजपुतांच्या स्त्रीयाहून अधिक तेजस्वी असतात—असेच शब्द स्वारींच्या तोंडून निघाले नाहीं?–माझी तलवार माझा भाला बरोबर घेऊन मी कांचनगडच्या सैन्यामागून जाईन, आणि लढाईला सुरुवात झाली कीं, माहाराजांच्या जवळ जाऊन शेजारीं लढत

राहीन.—शत्रूचा मोड करण्यास प्रतापरावांना मोहना मदत तरी करील, किंवा तशी वेळ आल्यास स्वामीबरोबर आपलाही देह रणांगणावर ठेवील.—वीरपत्नीला हेंच सहगमन योग्य.—चंपे, तुला एक कामगिरी मला सांगावयाची आहे.—माझ्या गळ्याची शपथ आहे तुला,—ती तूं करशील ना?

चं०—बाईसाहेबांचा काय हुकूम आहे?

मो०—चंपे, शहाजी एक दीड वर्षांचा झाला असेल, मी त्याला येथेंच खेळवीत होतें, आणि स्वारी महालांत आली. त्या वेळचा हुडपणा पाहून महाराजांनीं बळजोरीनें त्या गुलामाला मांडीवर बसवून घेतलें, आणि मला म्हणायचें झालें आमच्या या कटाच्या खऱ्या उद्योगाला कांहीं वर्षांनीं आरंभ झाला—आणि उद्योग शेवटाला जाण्याचे पूर्वींच माझें बरेंवाईट झालें, तर माझा उद्योग हा खात्रीनें पुढें चालवील.—मुलगा झाला म्हणजे बापाला आपल्या आयुष्याच्या क्षणभंगुरत्वाबद्दल वाईट वाटत नाहीं; कारण आपलें सत्व चिरस्थायीं झालें असें वाटतें.—चंपे, शहाजीची आणि माझी किंवा स्वारीची गांठ पडेल, असें मला वाटत नाहीं,—चंपे, तूं आतां सोनगडावर जाऊन, माझ्या शहाजीजवळ रहा.—तो चांगला मोठा झाल्यावर, त्याला चांगलें कळूं लागल्यावर, त्याच्या आजोबाचे हेतु काय होते ते त्याला शिकीव,—त्याच्या वडिलांनीं कोणचा उद्योग आरंभिला होता तें त्याला कळीव,—आणि त्याच्या घराण्यांतील पुरुषांनीं आरंभलेला उद्योग शेवटास नेण्याचा बोजा त्याच्या शिरावर आहे—असा ह्या मोहनेचा—त्याच्या दुर्दैवी आईचा—शेवटचा निरोप—शेवटची आज्ञा—त्याला सांग. (पडदा.)

चौथा अंक समाप्त

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ—रणभूमि.

(पिलाजी माने व त्याचे दोन सरदार येतात.)

पि०—आम्हीं पूर्वी ठरविल्याप्रमाणें दवलतराव खासे फसले म्हणावयाचें! आणि शत्रूच्या फळींतून पार निसटून जात आहों असेंच त्यांना वाटलें असेल!—अतिशहाण्याचा बैल रिकामा म्हणतात तशांतली दवलतरावाची अवस्था झाली.—एव्हांना पश्चिम खिंडींत धनाजीरावांनीं त्यांना गांठलें असेल नाहीं?

प० स०—धनाजीरावांच्या सापळ्यांत दवलतराव आयता जिवंत सांपडणार!

पि०—धनाजीरावांनीं हें काम चांगलें केलें!—धनाजीराव मोठे हुषार आहेत; पण सकाळीं यमुनेबरोबरच हंबीररावांनाही कैद करून—

दु० स०—त्यांत कांहीं त्यांची कसूर नाहीं.—सरकारच्या छावणींतून सकाळीं जे हंबीरराव बाहेर पडले ते स्वतःच्या डेऱ्याकडे गेलेच नाहींत!—वाटेंत एका ठिकाणीं त्यांचा शेला पडला होता—एका ठिकाणीं मंदील सांपडला—स्वारी बहुतेक उघडी नागडीच चोहोंकडे भटकत असावी! (पडद्यांत —धांवा, पकडा, सोडूं नका, आतां ही आमच्या हातीं लागलीच पाहिजे.)

पि०—हंबीररावाच्या सरदारांचा हा शब्द असावा.—पाहूं बरें.—तो पहा—पाहिलांत—चेहरा नीट पहा—पुरुषाचें सोंग घेतलेली ही मोहना असावी.—चला असे आपण वळसा घालून जाऊं आणि हंबीररावाच्या लोकांना मदत करूं.

[पडद्याच्या दुसऱ्याबाजूनें पुरुष वेशांत मोहना, व तिचा पाठलाग करणारे हंबीररावाचे लोक येतात.]

मो०—भेकड भिऱ्यांनों, या असे पुढें या.

हं०चे स०—ह्या वेळीं मोहनेला हातची सोडूं नका.—ह्या बाजूला जाऊं द्या.—सरलष्कर पिलाजी मान्यांच्या गोटाकडे आयती चालली आहे.

मो०—(स्वगत) हे म्हणतात त्याप्रमाणें मी भलत्याच दिशेला चाललें आहे खास;-नाहींतर एव्हांनें तिकडचें सैन्य मला दिसावयाला पाहिजे होतें.—हे स्तब्ध उभे कां राहिले?—मला जिवंत पकडण्याचा यांचा बेत दिसतो. (उघड) या, पुढें, या, असे भिऱ्यासारिखे उभे कां राहतां?—रणभूमीवर उभी राहिल्यावर वीरपत्नी किती शूर होऊं शकते, पतिव्रता कितीं क्रूर देवता बनते, हें तुम्हाला चांगलें समजावून देतें.

[पि० व इतर हंबीररावाच्या लोकांना मिळतात.]

पि०—असे दगडासारिखे तुम्ही निश्चल कां?—हंबीररावाप्रमाणें तुमच्यावरही मोहनेनें आपला मंत्र टाकला कीं काय?—चला अंगावर चाल करून जा; अभिमन्यूला ज्याप्रमाणें व्यूहांत पकडला त्याप्रमाणें तुमच्या तलवारीच्या व भाल्यांच्या कैचींत हिला पकडा.

मो०—या, या, पुढें या, या भवानी तलवारीच्या धारेवर बळी पडून आपल्या पापाचें प्रायश्चित्त घ्यावयाला पुढें या.

पि०—पाहतां काय, बायकांच्या धमकावणीला तुम्ही भीक घालणार?

[हंबीररावाचे लोक तलवारी उपसून धांवून जातात. इतक्यांत हंबीरराव प्रवेश करून मध्यें उभा राहतो.]

हं०—खबरदार.—तलवारींचें आणि भाल्यांचें ह्या जमांत काय काम?—हें जग प्रेमाचें आहे,—हें जग मोहनेचें आहे.—मोहनेची तसबीर काढण्याकरितां स्त्रीवेषांत मोहनेला पाहण्याची जर तुमची इच्छा असेल,—त्या तलवारी अगोदर म्यानांत घाला, आणि मजप्रमाणें मोहनेचीं आर्जवें करा.—मोहने—

पि०—ह्यांना भ्रम झाला आहे, ह्या वेड्याचें—

हं०—मी वेडा कीं तुम्ही वेडे!—मोहनेची दृष्टी ह्या तुमच्या भाल्यांवर पडूं द्या, भाल्यांचीं टोकें बोथट होतील, तलवारींची धार नाहींशी होईल.—तुमच्या हातांतील ही निर्जीव हत्यारें मोहनेच्या प्रेमानें आपला तीक्ष्ण क्रूरपणा टाकून देऊन तुमच्या सजीव देहांना प्रेमाच्या जादूचें सुख कसलें असतें तें शिकवतील.—मोहने तलवार हातांत धरण्याचे श्रम तुला कशाला?

मो०—(स्वगत) ह्या संधीला आपण पळ काढून तिकडच्या सैन्याला गाठावें हें ठीक. (मोहना जाऊं लागते)

[पि० इतर सरदारांना खुणावून मोहनेच्या मागून जाऊं लागतो.]

हं०—मोहने जाऊं नको, जाऊं नको.—तूं भिऊं नको, हे वेडे पहा आपोआप लपतछपत जाऊं लागले—

मो०—प्रतापरावांचें सैन्य ह्या जवळच्याच टेंकडीजवळ येत आहे; त्यांना जाऊन मिळावें म्हणजे ह्या वेड्यांचा त्रास चुकला. (जाते)

(पि० वगैरे जातात.)

हं०—मोहने, मोहने,—अरे ही निघून गेली!—तिनें जादूनें तर मला मारून टाकिलें नाहींना?—माझे पाय कां जागा सोडीत नाहींत?—मी का अझून तिच्या मागें लागून जात नाहीं?—मी खुळा तर नाहींना?—मी वेडा कां बरें झालों?—परमेश्वरानें जर बरोबर मोहनाच मोहना उत्पन्न केल्या असत्या—चांगल्या सुंदर वस्तूंची लयलूट कां जगांत असूं नये?—मी खात्रीनें वेडा नाहीं.—मोहनेचा नाद ज्या पुरुषांना लागावयाचा नाहीं तेच वेडे—तेच खुळे.—पावलांनों, मोहनेकडे मला वाहून नेण्याची जर तुमच्यांत शक्ति नसेल, व तुम्हीही माझ्याप्रमाणें मूर्ख बनला असाल, तर मोहना जेथें जेथें आपलें पाऊल ठेवीत गेली असेल, त्याच तेवढ्या जागेवर जाऊन पडा,—म्हणजे तुमच्यांत उत्साह धैर्य येईल. (जातो.--पिलाजी व त्याचे सरदार परत येतात.)

पि०—ह्या लोकांच्या हातांत मोहना कोठून आतां सांपडते!—ती गेली पार निघून!—बरें तुम्ही असें करा ह्या हंबीऱ्याला फसवून कैद करा.—अगोदरच हंबीररावाचें सैन्य ना उमेदीनें लढत आहे आणि तशांत हा जर सैन्यापुढें आतांच्यासारखे वेडेचार बरळला तर सर्वच पारडें उलट फिरावयाचें!

प०स०—ह्या कारणानेंच प्रतापरावाचें सैन्य इतकें पुढें चालून आलें आणि त्यांनीं ही जवळची टेंकडी व त्यावरील आमच्या तोफा काबीज केल्या.

पि०—प्रताप्याची मला फिकीर नाहीं.—खानाच्या खुनामूळें चिड-लेल आरब रोहिल आतां त्याच्यावर सोडतों व घटके दोन घटकेंत ह्या लढाईची समाप्ति करतों.—(पहिल्यास) तुम्ही हबीररावास पकडण्याच्या उद्योगाला जा.—(दुसऱ्यास) तुम्ही फेजलला जाऊन माझा हुकूम कळवा, खानाच्या खुनाचा सूड घेण्याची वेळ आतां आली आहे. (सरदार जातात.)

पि०—ह्या हबीऱ्याला जिवंत धरलाच पाहिजे.—यमुनेला तर धनाजीरावानें धरून आपल्याबरोबर नेलीच— (जासूद येतो)

जा०—सरदारसाहेब, पश्चिम खिंडींतून धनाजीरावाकडचें दुःखाचें वर्तमान घेऊन मी आलों आहे. सूर्याजीराव मोहीते, प्रतापरावांचे श्वसूर पंधराहजार पोक्त सरंजामानिशीं कांचनगडास मदत करण्यास आले आहेत. धनाजीरावांनीं असें सांगितलें आहे कीं कसेंही करून घटका दोन-घटका सूर्याजीरावांना मी पुढें येऊन देत नाहीं; तोंपर्यंतच दोन तीन हजार अरबांची कुमक पाठवून द्यावी.

पि०—जा, लवकर जावून त्यांना सांग, मोहित्यांना पुढें येऊं देऊं नका, कुमक आलीच म्हणून समजा. (जासुद जातो.) आतां मात्र माझ्या नशिबानें उलट खाल्लीशी दिसते.—हरकत नाहीं; नशीबा, तुला सांवरून धरायाला हा पिलाजीराव खंबीर आहे.—धनाजीराव त्या पश्चिम खिंडींत खुशाल मरूं दे; ह्या वेळीं माझ्या हाताखालच्या सर्व सैन्याचा मारा मी प्रतापरावांवर करणार.—मोहित्यांचे पंधरा हजार सैन्य दाखल होण्याचें पूर्वी येथला सर्व कारभार आटपतों.—हंबीऱ्याला कैद करून प्रतापरावाचें शीर हातांत घेऊन माझे निवडक

घोडे विजापूराकडे निघून गेल्यावर आपल्या जांवयाच्या नावानें उर बडवून घ्यावयाला सूर्याजीराव मोहित्यांना कांचनगडच्या मैदानावर खुशाल येऊं द्या. (पडदा.)

अंक ५–प्रवेश २ रा.

स्थळ–रणभूमि.

(प्रतापराव, संताजीराव सैन्यासह प्रवेश करतात.)

प्र०—एकूण दवलतराव शत्रूचा व्यूह फोडून पार गेले म्हणावयाचे!–शत्रूला जिंकून दवलतराव पार गेले, कांचनगडचें नांव राहिलें–ते पुन्हा नवीन सेना उभी करतील आणि बादशाही बुडविण्याच्या प्रयत्नाला लागतील.–संताजीराव, तुम्ही आतां तलवार चांगली गाजविली!

सं०—आम्हीं ह्या टेकडीवर चढण्याबरोबर शत्रूच्या सैन्यांत पहा कशी एकच धांदल उडाली आहे!--हें आमचें सैन्य ह्या टेकडीकडे येत आहे तर त्याला कोणी अडथळाही करीत नाहीं. हंबीररावाच्या लोकांनीं जशी मगाशी कांहीं हालचाल केली नाहीं, त्याप्रमाणेंच मान्यांचेही लोक आतां उगीच उभे आहेत.–मोठें आश्चर्य!

प्र०—अहो, आम्हाला मुद्दाम म्हणून एके ठिकाणीं गोळा होऊं देत आहेत,–त्यांच्या मनांत आमच्यापैकीं कोणीही जीवंत राहूं नये असें असावेंसें दिसतें.

सं०—पण ह्या टेकडीवर जर सर्व आम्ही गोळा झालों, तर शत्रूला जाचणार नाहीं का?

म०—संताजीराव, आमच्या चौपट पांचपट शत्रूचें सैन्य आहे. चार पांच हजार काटक आरब रोहिले आहेत, किती तरी तोफा आहेत.—ही भिकार टेकडी आमचें किती वेळ रक्षण करणार ?—संताजीराव, आज मरण हें आम्हा सर्वांच्या कपाळीं लिहिलेलेंच आहे, पण शत्रूचा पक्का सूड उगविण्याचा सर्वांनीं निश्चय केला पाहिजे.—संताजीराव, आमची मान तुटेल, आमची हाडें चिंबून चिंबून जाऊन त्यांचा चुराडा होईल, पण संकटांना केसभरही आम्ही हार जाणार नाहीं,—हें शत्रूला आज पक्कें समजावून द्या.—म्हणजे आम्ही जीवंत राहून जें कार्य आमच्या हातून पार पडणें अशक्य आहे, तें काम आमच्या मरणानें आपोआप होईल.—आमचा काटकपणा, आमचें शौर्य, शरिरांत जीवाची धुगधुगी असे तों आमची लढण्याची हौस, हीं विजापूरच्या पादशहाला कळूं द्या, लाखो फौजेनें विजापूरास गराडा दिला असतां पादशाहास जी भीती वाटेल, त्याहून अधिक भीतीनें आमचें नाव निघण्याबरोबर पादशाहा कापूं लागेल !—विजयानगराकरितां आम्ही किती हाल सोसले,—धर्मासाठीं आम्ही आमचे प्राण कसे खर्ची घातले,—ह्याची हकीगत तुमच्या देशांत चोहोंकडे पसरूं द्या, तुमच्या प्रत्येक खेड्यांत दवलतरावासारिखे—संताजीरावासारिखे—सेनानायक जन्मास येतील,—प्रत्येक झोंपडींत ह्या माझ्यासेनेसारिखे प्राणास प्राण देणारे शूर वीर निपजतील.—तुमच्या देशभक्तीचें, तुमच्या धर्मनिष्टेचें, शत्रूविषयींच्या अस्सल सूडाचें बीज, तुम्हीं आज ह्या भूमींत आपल्या मरणानें पेरीत आहां.—वीरहो, तुम्ही आज मरावयाला जात नाहीं, तर एकाचे हजार लाख होऊन, तुमच्या शत्रूचा बीमोड करण्याकरितां जात आहां.

सं०—प्रतापराव, आपण ह्या ठिकाणीं उभे राहून पहा, शत्रूच्या आंगावर आम्ही कसे तुटून पडतों तें.—ह्या दुसऱ्या तुकडीच्या लोकांनीं टेकडी गांठली पहा !

प्र०—संताजीराव, त्यांना व ह्या जवानांनाही टेकडीच्या निरनिराळ्या भागीं नीट उभे करा.--आणि शेवटची माझी इच्छा काय आहे तें सर्वांना कळवा. (संताजीराव व लोक जातात) असले एकनिष्ठ शूर नोकर मिळणें म्हणजे मोठें भाग्यच समजलें पाहिजे.—परमेश्वरा, आज आम्हां सर्वांची कत्तल झाल्यावर माझ्या या शूर प्रामाणिक पुण्यवान सेनेला ज्या ठिकाणीं जन्मास घालशील, त्याच ठिकाणीं ह्या अभागी दुर्दैवी प्राण्यालाही पुन्हा जन्माला घाल,--अशी माझी मरणापूर्वीची प्रार्थना आहे.—माझ्या पुण्याबद्दल मला स्वर्गसुख नको, नंदनवनांतील सुखोपभोग मला नकोत,—पादशाहाचे जाचांतून विजयानगरास मुक्त करण्याचें कामीं माझें सर्व पुण्य खर्च होऊं दे.—पुढील जन्मीं पुढारी सरदार होण्याइतकें जर माझें पुण्य नसेल, तर आमचें जें सैन्य विजापूरची राखरांगोळी करील त्या सैन्यांतल्या अतिशय क्षुल्लक दरजाच्या नोकराचें जन्माला मला, देवा, घाल.—परमेश्वरा, मनुष्य कोटींत पुन्हा जन्मास घालण्याची जर माझी योग्यता नसेल, तर ज्या घोड्यावर स्वार होऊन मराठे विजापूरचा दरवाजा फोडतील, त्या घोड्याच्या तरी जन्माला मला जाऊं दे.—हा मानही पुढील जन्मीं जर मला मिळावयाचा नसेल तर, विजापूरावरील मराठ्यांच्या स्वारीची सामुग्री वाहून नेणारा बैल तरी निदान मला कर.- देवा, माझा देश स्वतंत्र करण्याचे कामीं मी कधींही केव्हांहीं कसाही उपयोगी पडूं नये, इतकें जर माझें पाप असेल, पिशाच्च योनींत जाऊन माझ्या पापाबद्दल यातना सोसण्याचें

नर माझ्या फुटक्या नशिबीं लिहिलें असेल, तर विजापूरचा मराठ्यांनीं विध्वंस केल्यावर, त्या जागीं उगवणाऱ्या निवडुंगांतून पिशाचरूपानें फिरण्याची निदान मला परवानगी असूं दे. (पडदा)

अंक ५–प्रवेश तिसरा.

स्थळ—कांचनगडच्या मैदानावरची टेकडी.

(दोन गोलंदाज येतात.)

प०—ह्या आरबांच्या व रोहिल्यांच्या पुढें आमच्या लोकांचा टिकाव फार वेळ लागेलसें वाटत नाहीं.—अरे ती पहा एक टोळी आपल्या तोफेच्या माऱ्यांत आली, दे तोफेला एकदम सरबत्ती. (तोफेचा आवाज) इतक्या वेळ तोफ बंद ठेवल्याचें कांहीं तरी सार्थक होऊं दे.

दु०—असलें मातबर युद्ध मीं कधींही पाहिलें नव्हतें.–महाराजांनीं आज जो कत्तल करण्याचा सपाटा लाविला आहे–प्रतापरावासारिखा वीर सर्व दुनियेंत नाहीं म्हणतात, तें अगदीं खरें आहे.

प०—सरकारच्या शेजारीं, त्या पहा, वयनीसाहेब लढत आहेत.—मगाशी त्या आमच्या तुकडीला येऊन मिळाल्या.—त्यांना तूं पाहिलें नाहींस?

दु०—नाहीं, मी पाहिलें नाहीं. हां–दिसल्या. अरे, धनीसाहेब ज्या बाजूला गेले त्याच बाजूला सर्व आरब लोक गोळा झाले हं!–छे, त्यांनीं फार नेटानें हल्ल्याचें काम सुरू केलें आहे.–तो पहा फेजल

रागानें प्रतापरावांच्या अंगावर चाल करीत आहे, दुष्टानें घात केला, धनीसाहेबांच्या अंगावर चांडाळानें मारली तलवार.

प्र०—शाबास वहिनीसाहेब शाबास;—धन्य वीरपत्नी, धन्य. ऐन वेळेला फेजलच्या हातावर त्यांनीं वार केला पहा !—भली खोड मोडली चोराची.—तें पहा सरकार स्वारीनें त्याचें शीर उडविलें आपल्या तरवारीनें!—जयघोष करा, दे तोफेला सरबत्ती.

(तोफेचा आवाज.)

दु०—अरेरे ! हें फार वाईट झालें. सरकार व वहिनीसाहेब आरबांच्या अंगावर चाल करून फार पुढें गेल्या !—अरेरे, आरबांचा त्यांच्या सभोंवतीं गराडा पडला.—झाला घात झाला.—कितीजणांनीं तरी त्यांच्यावर तरवारी उगारल्या ह्या! किती भाले त्यांच्यावर रोंखलेले हे! —पडले लढाईंत पडले, कांचनगडचा सूर्य मावळला, झाली अवताराची समाप्ति झाली !—धनीसाहेब, महाराज,—वीरहो, आरब त्यांना नेऊं पहात आहेत,—नेऊन तरी देऊं नका.—संताजीराव, असाच हल्ला नेटानें करा, म्हणजे आमचे सरकार, आमच्या वहिनीसाहेब, आमच्या हातीं तरी लागतील.—शाबास. संताजीरावांनीं दोघानाही उचलून अलीकडे घेतलें हें एक बरें झालें.

प०—अरे हा काय चमत्कार पाहिलास कां?—पिलाजीमान्यांच्या स्वारांनीं पळ काढिला; त्यांचें सैन्य मागें परतलें!—आरबांच्या तोंडचें पाणी पळालें! त्यांची कोण धांदल उडाली पहा!—काय बरें कारण!

दु०— हीं पहा हीं दोन्हीं बाजूनें दोन मोठीं सैन्यें ह्या जवळच्या टेकडीच्या आडून आमच्या अगदीं जवळ आलीं आहेत. उजव्या हात-

ह्या सैन्यात तर हें दवलतरावांचें निशाण आहे.

प०—हें पहा डाव्या हातच्या ह्या सैन्यानें पिलाजीमान्यांच्या स्वारांना गांठलेंच!—दोन्हीं सैन्यें आमच्याचजवळ येऊन ठेपलीं.—दवलतरावांनीं एवढें मोठें सैन्य आणिलें कोठचें?—डाव्या हातचें कोणाचें हें निशाण?

दु०—हें सूर्याजीराव मोहित्यांचें निशाण, मीं ओळखलें!—हा आमच्या सैन्याचा जय झाला!—धनीसाहेबांना घेऊन संताजीराव आलेच. परमेश्वरा, त्यांना मोठी जखम झालेली नसूंदे! (जातात.)

अंक ५—प्रवेश चौथा.

—:**:—

(संताजीराव, प्रतापराव, मोहना व इतर सरदार.)

सं०—(प्रतापरावाजवळ बसून) धनीसाहेब, सरकार, महाराज, शत्रूच्या अंगावर इतक्या आवेशानें चालून जाण्याचें काय कारण होतें?—आम्ही काय नोकर कोणी नव्हतो काय?—वाहिनीसाहेब, इतक्या जखमा अंगावर घेण्याचें काय कारण? संताजीरावावर सर्व लढाई सोंपवावयाची होती.—महाराज एक शब्द तरी मजसीं बोला.

प्र०—(सावध होऊन) लढाई—

सं०—बोलण्याची देखील शक्ति उरली नाहीं!—महाराजसर्व जखमा बांधून झाल्यावर बोलावें.

प्र०—लढाईचें काय झालें?

सं०— महाराज, दवलतराव व सूर्याजीराव मोहिते, पंधरा हजार फौज घेऊन आले, आमची फत्ते झाली सरकार.

प्र०—आतां आनंदानें मरतों.—दवलतराव कोठें आहेत?—सूर्याजीराव कोठें आहेत?—हे कोण शेजारी जवळ आहे?—माझ्या शेजारी लढत होती ती माझी लाडकी मोहना ना?

सं०— होय, महाराज, वहिनीसाहेबच ह्या.

प्र०—माझ्यानें हालवत नाहीं.—मला तिच्या जवळ न्या.—मोहने, माझ्या शेजारी उभी राहून लढण्याचा तूं आपला हट्ट अखेरीस चाल-विलासच हं!— ही शुद्धीवर नाहींका यावयाची?— मी आतां इतक्यांत मरणारच; पण मरण्यापूर्वीं ही माझ्याशीं एक शब्द तरी नाहींका हो बोलावयाची?— मोहने, काय धाडस हें!—आजच्या लढाईत तुझ्या अंगावर जितक्या जखमा झाल्या आहेत, तितक्या कोणाच्याही अंगावर झाल्या नसतील!—कशासाठीं हा हट्ट चालविलास?

मो०—(सावध होऊन) त्यांना म्हणावें—

प्र०— मोहने, मी प्रतापराव तुझ्या जवळच बसलों आहे.—तुझ्या ह्या अशा स्थितीला मी कारण झालों.-- क्षमा केली आहे म्हण—क्षणा दोन क्षणाचा मी आतां सोबती आहे; तुझ्या तोंडचे ते शब्द मरणापूर्वीं मला ऐकूं दे.

मो०—महाराज, मीच तुमच्या ह्या स्थितीला कारण झालें.--मला क्षमा म्हणा.-- मी जाते, मी आपल्या पुढें जातें. --देवलोकीं आपण आला म्हणजे आपणास आवडतो तसला प्रेमाचा बगीचा प्रेमाचा महाल बांधून ठेवण्यास मी पुढें जातें.--येतें-- (मरते.)

प्र०—गेली, माझी प्रिया माझ्या पुढें गेली.-- मोहने, मी हा तुझ्या मागोमाग आलोंच.

(हंबीरराव, यमुना, व पिलाजी, यांना पहाऱ्यांत घेऊन दवलतराव व सूर्याजी येतात.)

कोण आले हे?--दवलतराव--

द०—काय हा अनर्थ झाला!-- संताजीराव, काय झालें हें!

प्र०—दवलतराव, तुम्ही विजयी झाला फार आनंद झाला.-- माझ्याबद्दल आतां दुःख करूं नका.-संताजीराव, हा माझा मंदील दवलतरावांच्या मस्तकावर ठेवा. (संताजीराव तसें करितो.) दवलतराव, विजयानगर स्वतंत्र करण्याचा आतां सर्व बोजा तुमच्या शिरावर आहे.--दवलतराव, आम्हा सर्वांचे पुढारी म्हणून माझा राम राम घ्या.--सरदारहो, वीरहो, दवलतराव आतांपासून कटाचे मुख्य झाले, ते सांगतील तसें वागा.-हे कोण हे?-हंबीरराव!-दवलतराव यांना कडक शिक्षा करूंनका.-ही यमुना!-मोहनेचें तिजवर प्रेम होतें, यांना त्यांच्या गडावर नेऊन सोडून द्या-पिलाजीरावांचें तुम्हाला वाटेल तें करा.-मूर्याजीराव कोठें आहेत? मामासाहेब, तुमच्या मुलीला माझ्यापासून कांहीं सुख झालें नाहीं; अखेरीस तिला असें मरावें लागलें!- मोहनेवर जसें तुमचें प्रेम होतें तसें आतां माझ्या शहाजीवर ठेवा.-आणि ही जशी वीरकन्या वीरपत्नी झाली तशी वीरमाताही होऊं दे.-माझ्यानें आतां फार बोलवत नाहीं.-मी आतां जातों, मोहना माझी वाट पहात आहे.-आलों लाडके आलों.-आतां नाहीं तुला मी अंतर देणार.-राम राम मंडळी राम राम.

(मरतो.)

सू०— मोहने, प्रतापराव, मला वृद्धापकाळीं तुम्ही दुःख देऊन गेलांना! (पडदा)

समाप्त.